
# थोरोचें श्रमजीवन



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र.
REFBK-0009294

३५८३८
निबंध
११.१२.८३
१५८०

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८३८ वि: निबंध
क्रमांक ............ नों: दि: ११.१२.८३

# थोरोचें श्रमजीवन

( कांचनमुक्तीचा एक प्रयोग )

REFBK-0009294

अनुवादक

**वा. ज. कुंटे**

प रं धा म वि द्या पी ठ प्र का श न

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम सेवा मंडळ
परंधाम विद्यापीठ
पो. पवनार ( वर्धा )

आवृत्ति २ री
प्रती २०००

**किंमत ६२ नये पैसे**

१ डिसेंबर १९५७

मुद्रक :
**र. भ. निगुडकर**
प्रकाश मुद्रणालय
३९५/४ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रस्तावना

थोरो हा अमेरिकेंतील थोर तत्त्वज्ञानी प्रतिभाशाली विचारक. तु तो नुसता विचारक च नव्हता. त्याच्यापाशीं आचाराची थोरवी तितकी च होती. याचें दर्शन या विस्तृत निबंधांत मिळणारें आहे. ाचा प्रयोग पुष्कळ वर्षांमागचा आणि म्हणून नमुना या नात्यानें ें मूल्य अधिक होणार नाहीं. पण तो एक मार्गदर्शक दिवा आहे. न प्रकाश घ्यायचा आणि आपल्या रस्त्यावर आपल्या पायांनीं ली अक्कल वापरून चालायचें.

शरीरपरिश्रम आणि अपरिग्रह या दोन्ही गोष्टींचा व्यापक आणि हिक प्रयोग झाल्याशिवाय अहिंसेची जीवनयोजना अशक्य आहे. णून त्या दिशेनें अलीकडे माझें सतत चिंतन आणि समुदायासकट ोग चालू आहेत. त्या आधारावर श्री. कुंटे यांचें पुस्तक न तांच मीं त्याला प्रस्तावनेचे हे चार शब्द लिहून टाकले आहेत. माहें पुस्तक वाचून ज्यांना कांचनमुक्तीची हौस वाटेल त्यांनीं आपलें उन दनुसार पालटण्याचा प्रयत्न करावा आणि त्यासाठीं जरूर तर त्या चाललेला छोटासा प्रयोग सवडीनुसार पाहून घ्यावा अशी दे फारस आहे.

अ ल्हा सागर
अ —५१
लागला अ

विनोबा

# विषयानुक्रमणिका

अनुवादकाचे दोन शब्द .... .... ३
हेन्री डेव्हिड थोरो—परिचय .... .... १२
१ प्रास्ताविक .... .... .... १९
२ द्रव्यासाठीं अनंत यातना .... .... २१
३ माणसाच्या खऱ्या गरजा .... .... २६
४ जिवापेक्षां कपडा प्यार .... .... ३[illegible]
५ अल्पमोलांत मालकीचें घर .... .... ३७
६ माझी झोपडी .... .... .... ४३
७ घराचें खरें सौंदर्य .... .... ४८
८ शरीरश्रमांतून शिक्षण .... .... ५२
९ यांत्रिक सुधारणांतील पोचटपणा .... ५[illegible]
१० माझी शेती .... .... .... ५[illegible]
११ माणूस म्हणजे जनावरांचा नोकर .... ६०
१२ माणुसकीवरील प्रचंड थडगीं .... .... ६२
१३ माझा स्वयंपाक व आहार .... .... ६३
१४ टेबल-खुर्च्यांची अडगळ .... .... ७१
१५ पांच वर्षांच्या अनुभवाचें फळ .... .... ७४
१६ अनुकरण नको नि सहकार्य हि नको ! .... [illegible]६
१७ परोपकारासाठीं दुःखनिर्मिति .... [illegible]
१८ परोपकारांतील खांचखळगे .... .... ८१
१९ परोपकाराची उठाठेव केव्हां सुचते ? .... ८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५७३ वि: निबंध
क्रमांक ........ नों दि: १७.१२.६३

# अनुवादकाचे दोन शब्द

हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त होऊन चार वर्षें होऊन गेलीं. तरी अद्याप त्याची घडी नीट बसली नाहीं. सर्वत्र लोकांमध्यें, विशेषत: पांढरपेशा सुशिक्षित लोकांत, फार च असंतोष दिसून येतो. थोडी कोठें साखर कमी मिळाली, कोठें तलम फिनूलेचीं धोतरें महाग झालीं कीं 'हें तुमचें कॉंग्रेस सरकार !' अशी सरकारची हेटाळणी केली जाते. यापेक्षां इंग्रज च किती चांगले होते असें हि म्हटलें जातें. असले उद्‌गार सुशिक्षितांच्या तोंडून ऐकले म्हणजे त्यांच्या अज्ञानाची आणि अदूरदृष्टीची कींव येते. इंग्रजांचें राज्य चालू असतांना च बंगालमधें भुकेनें लक्षावधि लोक मेले; आणि इंग्रज शहाणे म्हणून वेळेवर निघून गेले. नाहीं तर आतांच्या परिस्थितींत हल्लींच्या एकचतुर्थांश सुद्धां व्यवस्था त्यांना राखतां आली नसती. हिंदुस्थानचें सुदैव कीं या क्रांतिकालीं साऱ्या जगाला ललामभूत व्हावींत अशीं माणसें आपलें नेतृत्व करावयास लाभलीं. पण पारतंत्र्यांत आमचें शारीरिक आणि मानसिक इतकें अध:पतन झालें आहे कीं आम्हांला कसला हि उत्पादक श्रम करवत नाहीं आणि स्वच्छ, स्वतंत्र विचार हि सुचत नाहीं. अमुक एक वस्तु मिळत नाहीं म्हणून सरकारला शिव्या देणाऱ्यांना विशेषत: पांढरपेशांना मी नेहमीं असा प्रश्न विचारीत आलों आहें कीं, 'हा जिन्नस निर्माण करण्यांत तुमचा प्रत्यक्षत: व अप्रत्यक्षत: अगदीं थोडा, शतांश किंवा सहस्रांश तरी हातभार लागला आहे का ? आणि असा लागला नसला तर तो मिळाला च पाहिजे हें म्हणण्याचा तुम्हांला कसा हक्क प्राप्त होतो ?' याचें उत्तर कोणीं हि समाधानकारक दिलें नाहीं.

पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटास त्याचा मालक दाणापाणी घालतो. पण पिंजऱ्याचें दार उघडून त्याला स्वतंत्र होण्याची मुभा देऊन मालक निघून गेल्यावर आतां आपल्यास दाणापाणी नवीन मालक करीत नाहीं म्हणून त्याच्या नांवें बोटें मोडीत बसावयाचें कीं पुरुषार्थ करून आपलें दाणापाणी आपण मिळवावयाचें ? श्रीज्ञानेश्वरांनीं नळीवर अडकून बसलेल्या पोपटाचें सुंदर वर्णन केलें आहे. तें या लोकांना तंतोतंत लागू पडतें. पण इंग्रजानें आणखी एक हुषारी केली होती. यांना पोपटाच्या एवढ्या लहानशा पिंजऱ्यांत ठेवलें नव्हतें. प्राणि-संग्रहालयांत वन्य पशुपक्ष्यांना ज्याप्रमाणें त्यांना नैसर्गिक भासेल अशा मोठ्या पिंजऱ्यांत ठेवतात त्याप्रमाणें च यांना हि पिंजऱ्याचें भान राहणार नाहीं एवढ्या मोठ्या पिंजऱ्यामध्यें ठेवलें होतें आणि त्यांच्या च हातून त्यांचा देश लुटतां यावा म्हणून त्यांची खाण्यापिण्याची हि चांगली बडदास्त ठेवली होती. असल्या विकृत प्राण्यांना आपल्या मालकाची आठवण व्हावी यांत आश्चर्य कोणतें ? इंग्रजानें गेल्या दीडशें वर्षांत येथील संपत्ति धुवून नेली, क्रमाक्रमानें उद्योगधंदे बुडविले, व्यसनें, चैन, ऐषआराम यांच्या संवयी लावल्या. हिंमतवंतांनीं त्यांना 'तुम्ही चालते व्हा म्हणून सांगितलें. तेव्हां घाबरून पण जातांना जेवढी मोडतोड करितां येईल तितकी करून ते चालते झाले. पुढाऱ्यांनीं हिंमत सोडली नाहीं. खूब शर्थीनें राज्य राखिलें, घटना घडविली आणि निवडणुका होऊन लोकांच्या हातांत सुपूर्त करण्याची व्यवस्था केली. हें 'स्व'राज्य झालें तें राखावयाची, चालवावयाची वगैरे सर्व जबाबदारी आतां 'स्व' वर आहे. त्यानें आतां दुसऱ्याच्या तोंडाकडे बघून चालायचें नाहीं.

स्वराज्य आलें कीं जबाबदारी आली. आपल्या अन्नवस्त्राची सोय आपण केली पाहिजे ती कशी करावी याचा मार्ग अमेरिकन तत्त्वज्ञानी थोरो यानें शंभर वर्षांपूर्वी स्वानुभवानें दाखवून दिला आहे. त्यानें

स्वतः घर बांधलें. धान्य पेरलें. त्याची रसोई हि आपण च केली. असा अनुभव त्यानें एक दोन दिवस नाहीं तर दोन वर्षांवर घेतला. त्यावरून तो म्हणतो, ‘ या दोन वर्षांच्या अनुभवानें मला असें आढळून आलें आहे कीं मनुष्याला केवळ जरूर तेवढें अन्न मिळविण्यासाठीं फार च थोडे कष्ट पडतात. आणि साधें गरिबीचें अन्न खाऊन हि माणूस आपलें आरोग्य आणि शक्ति उत्तम ठेवूं शकतो. ’ दुसऱ्या एका ठिकाणीं त्यानें असें लिहिलें आहे, ‘ या पृथ्वीच्या पाठीवर स्वतःच्या पोटापुरतें मिळवणें मुळीं च कठीण नाहीं. तो एक पोरखेळ आहे असें मला वाटत असे. हें माझें मत अनुभवानें दृढ झालें. अर्थात् आपण साधेपणानें आणि शहाणपणानें वागलों तर च हें शक्य आहे. पोटापुरतें मिळवायला अगदीं निढळाचा घाम च काढायची जरूरी आहे असें नाहीं. ’ ‘ मनुष्याला केवळ अन्नाकरितां फार च थोडी जमीन लागते आणि तेवढ्या जमिनींत उन्हाळ्यामध्यें सहज डाव्या हातानें देखील शेतांत काम केलें तर भागण्यासारखें आहे. ’ हे सारे अनुभवाचे बोल आहेत. पण आम्हीं पांढरपेशांनीं थोडे देखील कष्ट करायचे नाहींत असा पण च केला आहे. या वेळीं त्यांना श्रमविभागाचें अर्थशास्त्र आठवतें. सगळ्यांनीं च शेतांत राबून किंवा आपली खादी आपण सूत काढून आपण तयार करणें हा मूर्खपणा आहे असा त्यांचा सिद्धान्त आहे. मागें ‘ केरळ कोकीळ ’कर्ते श्री. आठल्ये यांनीं ‘ कामाचें वांटप ’ म्हणून एक कविता लिहिली होती. त्याची यावरून आठवण होते. सूनबाई म्हणतात, ‘ सासूबाई, तुम्ही सकाळीं लौकर उठून पारोसें काम करून चहा करा, तोंपर्यंत मी प्रातःकृत्य आटोपून चहा घ्यायला येतें. तुम्ही स्वयंपाक करा, मी जेवण करतें. ’ वगैरे. असलें सोईचें हें श्रमविभागाचें तत्त्व आहे. थोरोनें याच पुस्तकांत एके ठिकाणीं सवाल केला आहे कीं, ‘ श्रमविभागाच्या तत्त्वाला

हि कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ?' शिवाय जी वस्तु बनविण्यांत आपला कांहीं भाग नाहीं तिच्या निर्मितीला किती कष्ट पडले हें माहीत नसलें तर ती वाटेल तशी वापरली जाते. नळानें पाणी येतें तें किती बेदरकारपणें वापरलें जातें. पाणी वाहून मोरींत वाहत असलें तरी उठून तेव्हढा नळ बंद करायचे कष्ट कांहीं घेववत नाहींत. तें च विहिरींतून शेंदून काढलेलें वा लांबून नदीवरून खांद्यावरून आणलेलें पाणी किती बेतानें वापरलें जातें. मीटरनें पाणी मोजून दिलें जाऊं लागलें तरी किती फरक पडतो ! माणूस वस्तु नासूं लागला तर बनविणारा त्याला कधीं हि पुरा पडणार नाहीं. कारण—

**' न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति**
**हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते '**

तसें च गीतेनें सांगितलें कीं, '**विषयांतील जे भोग ते दुःखास चि कारण ।**'

जितके जितके म्हणून नवीन शोध लागत आहेत त्यांनीं जगांत सुखाची वृद्धि न होतां त्यानें महायुद्धें च पैदा होत आहेत. **थोरोनें** रेल्वे, तारायंत्रें वगैरे जीं आधुनिक सुधारणेचीं अंगें आहेत त्यांवर हि कोरडे ओढले आहेत.

तेव्हां पैशाच्या बंधनांतून मुक्त होणें हा च आतांच्या साऱ्या दुःखांवर उपाय आहे. **थोरोनें** तो प्रयोग शंभर वर्षांपूर्वीं व्यक्तिशः आपल्यापुरता सिद्ध केला. त्याबद्दल त्याला विक्षिप्त म्हणून घ्यावें लागलें. पण हें सारें मानवहिताकडे लक्ष देऊन च तो करीत होता. त्या काळीं त्याचें चीज झालें नाहीं; पण म. गांधीजींसारख्यांना त्याच्यापासून स्फूर्ति मिळाली. जो प्रयोग **थोरोनें** व्यक्तिशः केला, तो च आज पू. **विनोबाजी** अधिक व्यापक व शास्त्रीय पद्धतीनें करीत आहेत. तो सिद्ध झाल्यास त्यानें साऱ्या जगाचें रूप पालटून जाईल.

अध्यात्मविचारांत हिंदुस्थान अग्रेसर होता. **थोरो**वर हि त्याचा प्रभाव पडलेला होता. तो एके ठिकाणीं म्हणतो, ‘ मला हिंदी तत्त्वज्ञानाची गोडी आहे, तेव्हां त्यांच्याप्रमाणें तांदूळ खाऊन राहणें च मला आवडलें असतें. ’ तसें च ‘ गगनचुंबी गोपुरांमुळें हिंदुस्थानचें नांव प्रख्यात झालें कीं भगवद्‍गीतेमुळें ? ’ असें भगवद्‍गीतेबद्दल त्याचे उद्‍गार या च पुस्तकांत आहेत. कांहीं शिक्षित लोक पाश्चात्य सुधारणांनीं दिपले असले तरी सामान्य जनता इतकी दिपून गेलेली नाहीं. हिंदुस्थानचें वैशिष्टय खेड्यांत अजून कांहीं प्रमाणांत टिकून आहे. **थोरोनें** आपल्या निबंधांत **साधें जीवन आणि उच्च विचारसरणी** यांची सारखी तरफदारी केली आहे. त्यानें खाण्याजेवण्याचे, झोपडी बांधण्याचे जे प्रयोग म्हणून केले ते येथील खेड्यांतील जनतेच्या नित्य व्यवहारांतले आहेत. बुद्धिमान म्हणवणारे पांढरपेशे लोक त्या जीवनाला तुच्छ लेखूं लागल्यामुळें आणि दोन महायुद्धांनीं विषयलालसेचीं साधनें खेड्यांपर्यंत पोंचल्यामुळें खेड्यांतल्या हि कांहीं लोकांना मोह वाटावा हें साहजिक असलें तरी पुनर्रचनेचा प्रयत्न कोठें यशस्वी व्हावयाचा असेल तर तो येथें च होईल.

आपल्या लोकांचें जीवन किती साधें असूं शकतें व परिग्रह किती अल्प असतो याचें वर्णन **आचार्य काकासाहेब कालेलकर** यांनीं आपल्या ‘ हिमालयांतल्या यात्रा ’ या पुस्तकांत एके ठिकाणीं दिलें आहे. ‘ हिमालयांतल्या शेतकऱ्यांच्या स्वयंपाकांत अजब स्वावलंबन असतें. त्यांच्याजवळ बोहऱ्याच्या टोपीसारखें एक लोखंडाचें तसराळें असतें. त्यांत तो कणीक मळतो व दगडावर ठेवून देतो. मग तीन धोंड्यांच्या चुलींत विस्तव पेटवून तिच्यावर त्या च तसराळ्यांत रोट्या भाजून घेतो. या रोट्या हातरुमालावर ठेवून तसराळ्यांत भाजी करून घेतो. भाजी-रोटी पोटभर खाऊन तसराळें घासलें कीं पाणी प्यायला

तें च भांडें. तें च तसराळें डोक्यावर ठेवून त्यावर फेऱ्यासारखें कांहीं तरी बांधतो, म्हणजे आंब्याच्या कोयीएवढ्या गारा पडल्या तरी शिर-सलामत ! इतकी सूचक बुद्धि असून सुद्धां शहरी लोक म्हणतात 'पहाडी लोक जंगली !' होय. ते जंगली आहेत च. जंगलांत राहतात ते पंगू नसतात. आणि पंगूपणा हा तर सुधारणेचा पाया आणि शिखर सुद्धां. असंख्य साधनांवांचून ज्यांचें चालूं शकत नाहीं तो 'सुधारलेला' आणि कमींत कमी साधनांनीं काम चालविण्याची ज्याच्यांत अक्कल आहे तो 'जंगली' ही व्याख्या खरी नाहीं काय ?

तसें च त्याच्या आहाराबद्दल त्यांनीं लिहिलें आहे. 'त्यांचा आहार साधा. कोणी आजारी पडलें तर जिरें, मिरीं, लवंगा, सुंठ अशी कांहीं औषधी वापरली कीं झाला बरा. येथें मीं प्रथम तर्क बांधला कीं आपण च आपला स्वाद बिघडविण्यासाठीं व कोठ्याला जन्मभर त्रास देण्यासाठीं 'मसाला' म्हणून ज्या वस्तू खातों त्या बिचाऱ्या मुळांत अतिशय आजाराच्या प्रसंगीं औषध म्हणून वापरल्या जात होत्या. माणसाला दिसलें कीं अशा उष्ण वनस्पतींच्या योगानें अपचन नाहींसें होऊं शकतें. इतकें ज्ञान झाल्यावर संयम राखील तर तो मनुष्य कसला ? अपचन होण्यांत आपली अब्रू जाते हें तो विसरून गेला. निसर्गाशीं इमानी रहायला तो पशु थोडा च आहे ? त्याला पडण्याची मोकळीक आहे, तर पडल्यावांचून समाधान कसचें ? माणसानें फाजील खाऊन त्या च बरोबर अपचनाचें औषध खाण्याचा नियम केला आणि निसर्गाचा सूड घेतला. या औषधाची चटक लागली तेव्हां तें औषध न राहतां मसाला बनलें. मसाला खाऊन हि अपचन होऊं लागलें तेव्हां आतां काय करावें या चिंतेंत तो पडला आहे. इकडचे पहाडी लोक अजून सुधारणेमुळें इतके बिघडलेले नाहींत. मिरें, जिरें, लवंग हीं त्यांना अजून औषधी च आहेत.

आतांचें ताजें उदाहरण इन्शुलिन या औषधाचें आहे. मधुमेह झालेला माणूस आतां पथ्य न करितां रोज इन्शुलिनचें इंजेक्शन घेऊन काय वाटेल तें बडवतो. मग इन्शुलिन हि परिणाम करीनासें झालें म्हणजे काय करणार? पाश्चात्यांनीं कितीतरी रोगांवर औषधांचे शोध लावले, म्हणून त्यांचा गौरव करण्यांत येतो. पण इतके रोग मुळीं झाले च कां? ज्यांना औषधाची जरूरी च लागणार नाहीं ते च खरे सुधारलेले; पण आतांच्या व्याख्या उलट्या झाल्या आहेत.

जगांतलें एक आश्चर्य वाटणारें ‘ पिरामिड ’ हें इजिप्तच्या थोर संस्कृतीचें चिन्ह समजलें जातें. पण थोरो तें पिरामिड राष्ट्राच्या अवनतीचा पुरावा समजतो. तो म्हणतो, ‘ पिरामिडच्या भव्यतेचें मला कधीं च आश्चर्य वाटलें नाहीं. पण एका महत्त्वाकांक्षी शुंभाची कबर बांधण्याकरितां इतके लोक जन्मजन्मभर राबण्याइतके अवनत कसे झाले याचें मात्र मला आश्चर्य वाटतें. त्यापेक्षां त्याला नाईल नदीमधें बुडवून त्याचें प्रेत कोल्ह्यांकुत्र्यांना खायला टाकलें असतें तर तें अधिक मर्दपणाचें आणि शहाणपणाचें झालें असतें.’

थोरोनें स्वत: घर बांधलें त्याची हकीकत त्यानें सविस्तर दिली आहे. पण अशीं घरें स्वत: बांधणारे लोक हिंदुस्थानांत हजारों लक्षांनीं आहेत. हिंदुस्थानच्या ग्रहणकाळांत या गोष्टी ते लाचारीनें करीत होते. त्या च ते निष्ठेनें करूं लागतील तर हिंदुस्थानचा हां हां म्हणतां कायापालट होईल. म्हणून हिंदुस्थान च एक जगाचें आशास्थान आहे.

आज शाळांना इमारती नाहींत म्हणून ओरड आहे. विश्वविद्यालयाचें काम इमारतीविना अडून पडत आहे. विद्यांत विद्या जी ‘ आत्मविद्या ’ तिला कधीं बाह्योपाधींची जरूरी भासली नाहीं. हिमालयांतल्या पुरातनकालीन विद्यालयाचें वर्णन काकासाहेबांनीं वरील पुस्तकांत दिलें आहे. “ हृषीकेश येथील झाडींत साधु सुंदर झोपडी बांधतात. जंगला-

तून गवत आणतात. त्यापैकीं थोड्या गवताचे दोर बनवितात. लाकडासाठीं दूर जावें लागत च नाहीं. गंगेमधें गुळगुळीत झालेलीं कितीतरी लाकडें वहात येतात. त्यांनाच वेंठीला धरलें कीं झालें काम. एका दिवसांत एक झोपडी तयार. दहावीस झोपड्यांमधें एक व्याख्यान मंडपहि बांधलेला असतो. त्यांत एखाद्या विद्वान आचार्यांनीं बसून रोज प्रस्थानत्रयीचें विवरण करावें आणि लहानमोठ्या साधूंच्या समाजानें ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या 'चा सिद्धान्त अनेक प्रकारें समजून घ्यावा. या ठिकाणीं सारें चर्वितचर्वण च चालतें असें नाहीं. नव्या नव्या शंका उत्पन्न झाल्या कीं त्यांना उत्तर म्हणून नवे नवे युक्तिवाद पुढें येतात. कित्येक अर्धदग्धांचा पाश्चात्य विचारांचा बेढब समन्वय करण्याचा हि येथें प्रयत्न केला जातो. कुंभमेळा आला कीं अशा नव्या विचारवृद्धीचा विनिमय व्हायचा आणि शास्त्रार्थांत गोडी वाढायची. अशा रीतीनें आपल्या साधूंनीं आपलें अध्यात्मशास्त्र जितें आणि जागतें राखलें आहे." असलें विश्वविद्यालय सरकारकडे मदतीची याचना कशाला करील ? अथवा नोकर्‍यांकरितां तोंड वेंगाडील ? बलिष्ठाच्या विरोधाला हि तें भीक घालणार नाहीं. असें सांगतात कीं एक वेळ औरंगजेब आपलें सैन्य घेऊन या अध्यात्मविद्यापीठावर चाल करून आला. साधूंनीं आपल्या झोपड्या जाळून टाकल्या आणि जंगलांतील खेड्यांत ते पसार झाले. सैनिक त्यांचे मागें कोठवर धावणार ? औरंगजेब फजीत पावून परत गेला आणि तीन दिवसांत हें विद्यापीठ पुन: जमलें. **जे अपरिग्रहव्रत पाळतात ते परतंत्र किंवा पराभूत कसे होणार ?**

अपरिग्रहासंबंधीं या निबंधांत **थोरोनें** केलेलें विवेचन फार च सुंदर आहे. या निबंधाचें नांव इकॉनामी म्हणजे काटकसर असें आहे. भाषांतर करतांना आंतल्या विवेचनावरून निबंधाचें नांव च 'अपरिग्रह'

ठेवावें असें वाटलें होतें. पण सर्व निबंधांचा साकल्येंकरून विचार केल्यावर '**कांचनमुक्ति**' हें च नांव समर्पक वाटलें. पण हें नांव पू. विनोबांनीं प्रथम उपयोजिलें व त्याचे पद्धतशीर प्रयोग हि ते करीत आहेत. म्हणून '**कांचनमुक्ति**' हें नांव त्यांच्या प्रयोगांना राखून ठेवणें योग्य म्हणून '**थोरोचें श्रमजीवन**' हें च नांव या पुस्तकास अखेर निश्चित केलें.

तो म्हणतो, 'माणसाचे कपडे इतके साधे व संसार इतका सुटसुटीत असावा कीं त्याच्या शहराला शत्रूचा वेढा पडला तर मागल्या मालमत्तेची कांहीं चिंता न करतां अगदीं मोकळ्या हातानें स्थितप्रज्ञाप्रमाणें माणसाला बाहेर जातां यावें.' 'फर्निचर म्हणजे माणसाच्या कमरेच्या पट्ट्याला अडकवलेले सापळे च होत.....' कोल्हा शाहणा होता म्हणून सापळ्यांत शेपटी अडकली तेव्हां त्यानें ती तुटूं दिली. तो सांपळा शेपटीबरोबर मिरवीत बसला नाहीं. उंदीर हि पाय सापळ्यांत अडकला तर पाय कुरतडून टाकून मोकळा होतो. पण माणसाला कांहीं त्यांतून मोकळें व्हावेंसें वाटत नाहीं व तो सुखासीन झाला कीं घरांत सामान वाढूं लागतें, तें इतकें कीं त्या पायीं माणसाला घरांत वावरायला च जागा राहत नाहीं. याकरितां मधून मधून घरांत जमा होणाऱ्या आवश्यक वस्तु कचऱ्याप्रमाणें टाकून देणें आवश्यक नाहीं काय? सर्व हिंदुस्थानभर होळी हा सण आहे; तो अशा सफाईकरितां सुरू झाला काय? अमेरिकेंतल्या मुकूलास जातीच्या इंडियन लोकांमधें अशा तऱ्हेचा सण आहे. त्याचें थोरोनें वर्णन दिलें आहे. या सणाचें नांव 'बस्क' म्हणजे नव्या फळांचा दिवस. एखादें गांव हा सण साजरा करतें तेव्हां तेथील लोक नवे कपडे, नवें फर्निचर, भांडीं, धान्य वगैरेंची प्रथम तरतूद करतात. घरें, रस्ते झाडून साफ करतात. मग हा कचरा, जुने कपडे, जुनें

धान्य, साहित्य व इतर त्याज्य वस्तु एके ठिकाणीं गोळा करून त्याला आग लावून दिली जाते. नंतर सर्वजण औषध घेतात. तीन दिवस उपास करतात. मग ती आग विझविली जाते. या तीन दिवसांत कसल्या हि विषयवासना वर्ज्य असतात. सर्व आरोपितांना अपराधांची माफी मिळते. या शुद्धीकरणानंतर चौथ्या दिवशीं मुख्य गुरु गांवांतल्या मुख्य चौकांत लाकडावर लाकूड घांसून अग्नि निर्माण करतो. मग तो पवित्र अग्नि सर्व घरांना पुरविण्यांत येतो. नंतर नवीन फळें, धान्य यांची मेजवानी करून तीन दिवस नवीन उत्साहानें नाचरंग होतो.

मेक्सिकोंत हि असला एक सण आहे; तो बावन वर्षांनीं करितात. मेक्सिकोंत हिंदी संस्कृतीचे अवशेष सांपडले आहेत असें म्हणतात. तेव्हां वर जो सण वर्णन केला आहे तो होळीचा च काय? होळीचा सण मूलतः शुद्धीकरणाचा, अपरिग्रहाचा द्योतक असून चौथ्या दिवशीं जी मेजवानी वगैरे होते तो रंगपंचमीचा सण असेल काय? **आपल्या सणाचें मूळ काय तें लुप्त होऊन आंधळेपणें आपण सण साजरे करीत असतों.** त्याप्रमाणें च हा होळीचा हि मूळ शुद्धीकरणाचा अपरिग्रहाचा उद्देश लुप्त होऊन त्याला आतांचें बीभत्स रूप आलें असावें काय?

**गांधीजींच्या वर्धा शिक्षण योजनेचें बीज हि** या निबंधांत एके ठिकाणीं आलें आहे. ‘विद्यार्थ्यांनीं जर माझ्याप्रमाणें स्वतः शरीरकष्ट व उद्योग केला तर त्यांचें शिक्षण सहज होऊन जाईल. कारण या उद्योगांतून त्याला आधीं च किती तरी ज्ञान मिळालेलें असेल.’ एका विद्यार्थ्यानें अशुद्ध धातु आटवून शुद्ध करून त्याकरितां जरूर लागतील तेवढीं पुस्तकें वाचून चाकू तयार केला, आणि दुसऱ्यानें कॉलेजमधें मेटालर्जीच्या पुस्तकांची घोकंपट्टी करून ‘चाकू

कसा करावा ' याची परीक्षा दिली; मात्र बापाच्या पैशांतून रॉजर कंपनीच्या चाकू विकत घेतला आणि असा आयता मिळाल्यामुळें तो वापरण्याची अक्कल आली नाहीं म्हणून बोट कापून घेतलें. या दोन विद्यार्थ्यांपैकीं अधिक शिक्षित कोण ? हें जीवन-शिक्षण आणि आतांचें पुस्तकी शिक्षण यांमधील अन्तर किती थोड्या शब्दांत, किती मार्मिकपणें त्यानें दाखविलें आहे बरें ?

परोपकार किंवा दानधर्म यांच्या तोंडावरचा बुरखा हि **थोरोनें** काढून टाकला आहे. ' गरिबांचीं, गरजवंतांचीं दुःखें दूर करण्याकरितां जो एकीकडे जीवापाड खपत असतो तो स्वतः च बहुधा आपल्या धंद्यामुळें वा जीवनक्रमामुळें तें दुःख निर्माण करण्यास कारणीभूत असतो; अर्थात् त्याचे श्रम फुकट जातात यांत नवल कसलें ?'.... ' माणसांना गुलाम बनवून, त्यांना मरेमरेतों राबवून अफाट संपत्ति मिळवणारा माणूस त्यांना एक दिवस सुट्टी देतो म्हणून का त्याला कनवाळू म्हणायचें ?'.... ' परोपकारी माणूस म्हणजे एक दुःखी तरी, नाहीं तर पातकी असतो. तो आपल्याला झालेलें दुःख किंवा हातून घडलेलें पातक दूर करण्याकरितां दानधर्म करतो. त्या त्यानें टाकून दिलेल्या दुःखाच्या स्मृतीनें भोंवतींचें वातावरण दूषित होतें.' असें परोपकारी माणसाला **थोरोचें** शिफारसपत्र आहे. **' आपण आपलें धैर्य दुसऱ्याला द्यावें; भ्याडपणा, निराशा देऊं नये. आपलें आरोग्य, समाधान द्यावें; आजार देऊं नये '** असा दानधर्माविषयीं **थोरोचा** अभिप्राय आहे.

वरील विवेचनावरून **थोरोच्या** विचारांची आणि त्यांनीं म. गांधीजींना कां आकर्षित केलें होतें याची कल्पना येईल. एवढ्या थोर लेखकाच्या शब्दांत आपण ढवळाढवळ करूं नये म्हणून प्रथम या निबंधाचें केवळ शब्दशः भाषांतर केलें. पण **थोरो** होऊन गेला

त्याला शंभर वर्षें होऊन गेलीं. त्यामुळें भाषा जुनी. त्याची लेखन-पद्धती हि अवघड, त्यानें दिलेले दाखले अपरिचित आणि कित्येक ठिकाणीं विषयांतर. यांमुळें भाषांतर दुर्बोध झालें होतें. माझें मला च त्यामुळें समाधान झालें नव्हतें. म्हणून दुर्बोध भाग गाळून त्याचे विचार मला समजले तसे माझ्या भाषेंत या ठिकाणीं दिले आहेत. कांहीं भाग गाळला असला तरी त्याच्या विचारांचा विपर्यास कोठें हि झालेला नाहीं असा मला विश्वास वाटतो. पुस्तकांत जे कांहीं गुण आहेत ते अर्थात् थोरोचे आहेत. दोष आहेत ते माझ्या लेखणीचे आहेत.

सांगलीवाडी
६–९–१९५१

वामन जनार्दन कुंटे

# हेन्री डेव्हिड थोरो

## -परिचय-

जन्म : १८१७ मृत्यु : १८६२

अमेरिकन संन्यासी, प्राणिशास्त्रज्ञ व लेखक. संयुक्त संस्थानांपैकीं मॅसेच्युसेटस् या संस्थानांतील कंकॉर्ड गांवीं हेन्रीचा जन्म झाला. त्याचा बाप पेन्सिली तयार करण्याचा धंदा करीत असे. थोरोचे आईबाप उद्यमशील व सुस्वभावी होते. लहानपणापासून थोरोला रानावनांतून फिरण्याचा छंद लागला होता व तो आमरण टिकला. कंकॉर्डमधील सृष्टिसौंदर्याचा त्याच्या बालमनावर बराच परिणाम झाला असला पाहिजे. इ. स. १८३३ मध्यें थोरोला हारवर्ड युनिव्हर्सिटींत पाठविण्यांत आलें. त्या ठिकाणीं इमरसनची व त्याची मैत्री झाली. १८३७ सालीं थोरो पदवीधर झाला. कॉलेजांत असतांना तो फारसा प्रसिद्धीस आला नाहीं. तथापि त्याचें वाचन दांडगें होतें व रानावनांत हिंडण्याची व सर्वदा विचाराच्या तंद्रींत असण्याची त्याला पूर्वीपासून च संवय होती. इ. स. १८३८ मध्यें तो आपल्या गांवीं शिक्षकाचें काम करूं लागला होता. या सुमारास न्यू इंग्लंडमध्यें एका नवीन तत्त्वज्ञानाचा प्रसार होऊं लागला होता. या तत्त्वज्ञानाप्रमाणें वागणारांना ‘ रिॲलिस्ट ’ असें म्हणत असत. थोरोच्या गांवीं ही चळवळ सुरू झाल्यानंतर त्यानें शिक्षकाचा धंदा सोडला व तो जॉर्ज रिप्ले,

अलकॉट व इमर्सन प्रभृतींना जाऊन मिळाला. परंतु चरितार्थाकरितां त्यानें वडिलार्जित पेन्सिलीचा धंदा सुरू केला व त्यांत त्यास चांगलें यश आलें. जमिनीची मोजणी करण्याचें काम हि त्यास उत्तम येत होतें. या च सुमारास व्याख्यानें देण्यास व लेख लिहिण्यास त्यानें सुरुवात केली. इ. स. १८३८ त समाज या विषयावर त्याचें कंकॉर्डमध्यें पहिलें व्याख्यान झालें. तिशीच्या पूर्वी केलेल्या बऱ्याच कविता त्यानें जाळून टाकल्या व गद्य लेखनाकडे लक्ष वळविलें. आपले विचार तो रोजनिशींत नमूद करून ठेवीत असे. इ. स. १८४० मध्यें इमर्सननें डायल नांवाचें एक त्रैमासिक सुरू केलें व त्याची सर्व व्यवस्था थोरोकडे सोपविली. या मासिकांत थोरोचे बरेच लेख व कविता प्रसिद्ध झाल्या. १८४१ मध्यें इमर्सननें थोरोला आपल्या च घरीं बोलाविलें व तेथें तो दोन वर्षे होता. इ. स. १८४३ सालांत थोरो हा इमर्सनच्या भावाच्या घरीं शिक्षकाचें काम करण्यास जाऊन राहिला. इ. स. १८४५ मध्यें तो स्टेटन आयलंडाहून शिक्षकाची नोकरी सोडून परत आला. नंतर त्यानें कंकॉर्डपासून दक्षिणेच्या दीड मैलावर असलेल्या एका सरोवराच्या कांठीं आश्रम बांधून राहण्याचें योजिलें. आश्रमांत असतांना पहांटे उठून तलावांत रोज स्नान करणें, बागेंत सकाळीं काम करणें, माध्याह्न स्नान करून विचारमग्न होऊन राहणें व रानावनांतून सतत संचार करणें असा त्याचा दिनक्रम असे. त्याचे कपडे जाडेभरडे असत व जेवण अगदीं साधें असे. वनस्पतींचा च आहार त्यानें ठेविला होता. थोरो हा गुलामगिरीच्या अगदीं विरुद्ध होता व त्याचा आश्रम हें गुलामांचें एक

आश्रयस्थान होतें. एकदां थोरोनें कर देण्याचें नाकारलें व त्यामुळें त्यास तुरुंगांत एक दिवस राहावें लागलें होतें. तथापि त्याच्या मनाची मुळीं च चलबिचल झाली नाहीं. वॉल्डन येथील आश्रमांत दोन वर्षे काढल्यावर थोरो इ. स. १८४९ मध्यें पुन्हां कंकॉर्ड येथें जाऊन राहिला. पशुपक्षी, मासे, सर्प थोरोला अत्यंत वश असत. प्राणि-सृष्टीवर थोरोचें अत्यंत प्रेम होतें. थोरोला लहान मुलें हि फार आवडत असत.

कादंबऱ्या, मासिकें व वृत्तपत्रें हीं त्यास आवडत नसत. गीता, मनुस्मृति, पंचतंत्र यांवर त्याचें अत्यंत प्रेम होतें. सादीचे ग्रंथ व होमर, व्हर्जिल, मिल्टन, वर्डस्वर्थ, कार्लाइल इत्यादि लोकांचे ग्रंथ त्याला फार आवडत असत. रेड इंडियनच्या वाङ्मयाचा हि ह्याला फार नाद होता. १८४७ पासून थोरोचें वाङ्मयाकडे विशेष लक्ष वेधलें. त्या सालीं त्याचा कार्लाइलवरील एक लेख प्रसिद्ध झाला. १८४९ सालीं त्याचा ' सिव्हिल डिस्ओबीडियन्स ' वरील प्रसिद्ध लेख लिहिला गेला. गांधींच्या सत्याग्रह चळवळींत हा लेख हिंदुस्थानांत फार प्रसिद्धीस आला होता. ' वीक ऑन दि कंकॉर्ड अँड मेरिमॅक रिव्हर्स ' हा ग्रंथ हि त्यानें लवकर च प्रसिद्ध केला. १८५४ सालीं त्याचें ' वॉल्डन ' हें विख्यात पुस्तक प्रकाशित झालें. या पुस्तकामुळें त्याची जगभर कीर्ति झाली. सन १८४६ पासून १८६० पर्यंतच्या अवधींत त्यानें पुष्कळ पर्यटनें केलीं. बहुतेक प्रवास तो पायीं च करीत असे. १८५९ सालीं जॉन ब्राऊन नामक गृहस्थाचें कंकॉर्ड येथें गुलामगिरीविरुद्ध भाषण झालें व त्या अपराधाबद्दल त्यास देहांत

प्रायश्चित्त मिळालें होतें. थोरोनें या गोष्टीचा पूर्ण निषेध करणारें भाषण केलें व या कामीं सरकार व लोक यांची त्यानें मुळीं च पर्वा केली नाहीं. १८६० सालापासून थोरोची प्रकृति बिघडूं लागली होती; शेवटीं १८६२ सालीं वसंत ऋतूंत थोरोनें शांतपणें इहलोक सोडला.

'वॉल्डन' व 'एक्सकर्शन' या ग्रंथांमुळें थोरोची फार कीर्ति झाली. वयाच्या तीस वर्षेपर्यंत त्यानें कविता केल्या. परंतु उत्कृष्ट कवि म्हणून त्याचा फारसा लौकिक नाहीं. तत्त्वदर्शी व लेखक या दृष्टीनें हि त्याच्यांत कांहीं दोष आढळतात. तथापि सृष्टीशीं एकतानता पावून मधुर गीतें गाणारा, सृष्टीचें अचुक निरीक्षण करणारा व दिव्य आणि स्फूर्तिदायक विचार प्रकट करणारा लेखक, असा थोरोचा जगांत लौकिक आहे.

( 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' वरून )

दा. क्र.

# थोरोचें श्रमजीवन

## १ प्रास्ताविक

अमेरिकेच्या मॅसाच्युसेट या संस्थानांत कंकॉर्ड नांवाचें एक गांव आहे. त्याच्याजवळ ' वॉल्डन पाँड ' म्हणून एक तलाव आहे. त्याच्या कांठावर मीं स्वत: कोणाच्या विशेष मदतीशिवाय एक झोपडी बांधली. भोंवतींच्या जमिनींत पीक काढून माझी उपजीविका हि माझ्या स्वत:च्या परिश्रमानें च चालविली. त्या ठिकाणीं मी सुमारें दोन वर्षें दोन महिने राहिलों. आतां तें 'जंगली' जीवन सोडून परत 'सुधारलेल्या' जगांत आलों आहें. पुढील बहुतेक लिखाण मीं या ठिकाणीं लिहिलें.

मी तेथें कां राहिलों व कसा राहिलों याची जाहिरात करण्याची माझी इच्छा नव्हती. पण कोणी कांहीं थोडें सामान्य जगावेगळें वागलें कीं लोकांमधें त्याचेविषयीं कुतूहल निर्माण होऊन तो एक चर्चेचा विषय होतो. तसें कुतूहल वाटून अनेकांनीं माझ्या तेथील राहणीबद्दल विचारणा केली आहे.

मी तेथें काय खाऊन रहात होतों, तेथें मला एकलकोंडें वाटलें नाहीं का, एकटें राहतांना भय नाहीं का वाटलें, अशा तऱ्हेचे प्रश्न पुष्कळांनीं विचारले आहेत. मीं त्या काळांत जें कांहीं मिळवलें त्यांतून धर्मादायाकरितां काय राखून ठेविलें, मी तेथें किती गरीब विद्यार्थ्यांना पोशीत असें, हें हि जाणण्याची कित्येकांना उत्सुकता आहे. ज्यांना बरींच मुलें झालीं आहेत आणि त्यांचा भार दुसऱ्यावर लादण्याची

ज्यांची इच्छा आहे अशांचे हे प्रश्न असणार. तरी पण या सगळ्यांना उत्तरें देण्याचा हा माझा प्रयत्न आहे. माझ्या वैयक्तिक जीवनाबद्दल ज्यांना कांहीं कुतूहल नाहीं त्यांनीं माझ्या या उपद्व्यापाबद्दल मला क्षमा करावी.

बहुतेक पुस्तकांतील लिखाण 'प्रथम पुरुषीं' असत नाहीं. अहं-पणाचा दोष पतकरून हि मी पुढील लिखाण प्रथम पुरुषींच करणार आहें. लेखक व्यक्तिगत लिहीत नसला तरी आपल्या लिखाणांत तो वस्तुतः आपले च विचार मांडीत असतो. माझा अनुभव माझ्यापुरता च मर्यादित आहे; तेव्हां त्याविषयीं लिहावयाचें सोडून ज्या कोणाची मला कांहीं माहिती नाहीं त्यावर भरकटावें काय ? माझें तर असें म्हणणें आहे कीं, कोणा हि लेखकानें दुसऱ्या कोणाकडील ऐकीव माहिती न सांगतां आपली स्वतःची च सरळपणें सांगावी. जणू कांहीं तो आपल्या दूरदेशीं गेलेल्या प्रियजनांस आपलेकडील हकीगत प्रेमानें कळवीत आहे. अशा लिखाणांत कांहीं तरी नावीन्य असणार च आणि तें वाचतांना कोणाला हि कुतूहल आणि गोडी वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

माझें हें लिखाण गरीब विद्यार्थ्यांना कांहींसें उपयोगी पडण्यासारखें आहे. इतरांनीं त्यांना लागू असेल तेवढा भाग घ्यावा. कपडा ज्यांच्या अंगाला बसत असेल त्यांनीं च तो घालावा. दुसऱ्यांनीं घातला तर ताण पडून शिवण उसवून फाटून जावयाचा !

वाटेल तशी उधळपट्टी करून हि कधीं ज्यांना कांहीं उणें पडत नाहीं अशा पराक्रमी पुरुषांकरितां माझें हें लिखाण नाहीं. असे जे कोणी असतील ते आपलें बरें वाईट आपण पाहून घेतील. पण असे वीर पुरुष माझ्या मात्र पाहण्यांत कोणी नाहींत. ज्यांना चालू जीवनांत आनंद आणि उत्साह वाटत आहे अशा लोकांना — यांतच मी माझी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५५८:३८ वि: निबंध
नो: दि: २२-१२-८३



गणना करितों — मला कांहीं सांगावयासारखें नाहीं. पण जे करंटे सदा असंतुष्ट राहून आपल्या दैवाला दोष लावीत बसलेले आहेत किंवा ज्यांना आपण आपलें कर्तव्य चोख पार पाडलें असून हि आपल्यावर अन्याय झाला आहे असें वाटून जे इतके चिडखोर व मत्सरी बनतात कीं त्यांची समजूत पटवून देणें फार च कठीण होतें, अशा लोकांकरितां च मुख्यत: हें माझें लिखाण आहे. त्यांनीं माझे विचार काळजीपूर्वक मनन करावे. तसें च ज्याचा उपयोग कसा करावा किंवा वासलात कशी लावावी हें समजत नाहीं असलें पुष्कळ गदळ गोळा करून ज्यांनीं आपल्या पायांत सोनेरी किंवा रुपेरी बेड्या अडकविल्या आहेत असे श्रीमंत म्हणवले जाणारे पण खरे करंटे लोक हि हें लिहितांना माझ्या दृष्टीसमोर आहेत.

दा. क्र.

## २ द्रव्यासाठीं अनंत यातना

दूरच्या चीन देशाविषयीं किंवा सँडविच बेटांतल्या लोकांविषयीं लिहून काय करावयाचें आहे? मला माझ्या भोंवतालच्या तुम्हां वाचकांच्या परिस्थितीविषयीं च थोडें फार लिहिण्याची इच्छा आहे. त्यांच्या कष्टमय जीवनांतून त्यांची कधीं च सुटका होण्यासारखी नाहीं कीं ती सुधारतां येईल याचा येथें मला थोडा विचार करावयाचा आहे. या आपल्या कंकॉर्ड शहरांत मी पुष्कळ फिरलों आहें. दुकानांत, कचेऱ्यांत, शेतांत काम करणाऱ्या सर्व तऱ्हेच्या लोकांच्या जीवनाचें मीं निरीक्षण केलें आहे. त्यांचे कष्ट पाहून हे सारे लोक पूर्वजन्मीं केलेल्या पापाचें जणूं कांहीं हजारों तऱ्हांनीं प्रायश्चित्त च घेत आहेत असें मला वाटतें. हिंदुस्थानांत तपस्वी ब्राह्मण पूर्वी अनेक प्रकारची देहदंडाची तपश्चर्या करीत असें म्हणतात. कोणी आपल्या चोहों बाजूंस अग्नि पेटवून सूर्याकडे पहात बसत, कोणी खालीं जाळ लावून त्यावर

आपल्याला उलटें टांगून घेत, कोणी उलटी मान करून बसत—इतकी कीं नरड्याला पीळ पडून पाण्याशिवाय कांहीं हि पोटांत उतरणें च अशक्य व्हावें; कोणी आपल्याला झाडाच्या बुंध्याला बांधून घेत तर कोणी लोटांगणें घालीत पृथ्वीप्रदक्षिणा करीत आणि कोणी तर खांबाच्या टोकावर एका पायावर उभे राहत. पण मी जे प्रकार माझ्याभोंवतीं रोज पाहत आहें त्यांच्यापुढें स्वेच्छेनें केलेली तपश्चर्या मला अशक्य किंवा अद्भुत वाटत नाहीं. ग्रीक पौराणिक कथांमध्यें हरक्यूलीसनें ' बारा पराक्रम ' केल्याची दंतकथा आहे. ते त्याचे पराक्रम माझे शेजारी रोज करीत असलेल्या अचाट कामापुढें मला कांहीं च वाटत नाहींत.

शेतीवाडी, गाईगुरें, गोठे, औतें यांचा बोजा जन्मत: च ज्यांच्या डोक्यावर पडला आहे असे या गांवचे पुष्कळ तरुण माझ्या परिचयाचे आहेत. शेतीवाडी मिळविणें जितकें सोपें आहे, तितकें तिच्या जंजाळांतून सुटका करून घेणें सोपें नाहीं. असा बोजा ज्यांच्या डोक्यावर नाहीं ते आपल्या जीवनाचा स्वतंत्रपणें विचार करूं शकतात. पण हे जमीनदार म्हणजे जमिनीचे गुलाम. हा माणूस साठ एकर जमिनीची मशागत करीत आहे. त्याच्या पोटाकरितां लागणाऱ्या घासभर अन्नाकरितां इतकी जमीन कसायची जरूरी आहे काय ? इतकी जमीन खोदीत बसायचें म्हणजे तींत आपल्याला पुरून घेण्याकरितां खड्डा उकरण्याचा च तो उद्योग, दुसरें काय ? ज्यांच्या डोईवर असला वडिलोपार्जित बोजा नाहीं त्यांना हि हा आपला साडेतीन हात मातीचा गोळा राबवितां येत नाहीं, मग यांची काय कथा ?

पण माणसें भलत्या समजुतीनें भलत्या गोष्टीमागें धावत असतात आणि म्हणून त्यांचे सारे श्रम मातीमोल होतात. ' दैवगति ' — जिचें

लौकिक नांव 'गरज' असें आहे – ती माणसाला धनदौलत सांठविण्याच्या उद्योगांत गुंतवून टाकते. पण ती दौलत गंज चढून किंवा वाळवी लागून तरी नाश पावेल किंवा चोर दरोडेखोर तरी पळवून नेतील हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. दुर्दैव असें कीं असलें जीवन निर्बुद्धपणाचें आहे ही गोष्ट त्यांना अंतकाळ जवळ आल्याशिवाय दिसत नाहीं.

आपला हा अमेरिका देश स्वतंत्र व पुढारलेला आहे असें आपण समजतों; पण सर्वसामान्य लोक अज्ञानानें आणि मोहानें असल्या क्षुल्लक चिंतेंत गढून गेले आहेत कीं उच्च जीवन म्हणजे काय याची त्यांना कल्पना हि नाहीं. अतिपरिश्रमानें त्यांच्या बोटांतली कुशलता नाहींशी होऊन गेली आहे आणि हात कांपूं लागले आहेत. मजुरांना सचोटी बाळगावयास वा इमान राखावयास हि फुरसत मिळत नाहीं. माणसा-बरोबर माणुसकीनें वागणें हि त्यांना परवडत नाहीं. नाहीं तर त्यांच्या श्रमशक्तीची बाजारांत किंमत उतरून जाईल. तो यंत्र बनून गेला आहे. त्याच्या उन्नतीला ज्ञानाची जरूरी आहे. पण आपलें अज्ञान ओळखायला तरी त्याला फुरसत कोठें आहे ? आपण त्याच्या अन्न-वस्त्राची सोय लावून त्याच्याशीं प्रेमानें वागूं तेव्हां च त्याच्या गुणांची आपल्यास पारख करितां येईल. फुलाचा मोहोर जसा नाजुक हातानें हाताळावा लागतो त्याप्रमाणें च मनुष्याच्या सद्गुणांना हि हळुवारपणें च हाताळलें पाहिजे; पण इतक्या कोमलपणें आपण स्वतःला हि वागवीत नाहीं, तर इतरांना कसे वागविणार ?

तुम्हां वाचकांपैकीं कित्येक अत्यंत दरिद्री आहेत व त्यांना आपलें जीवन कंठणें हि कठिण झालेलें आहे. कांहींजण या जीवनकलहांत अगदीं मेटाकुटीस आलेले आहेत. कांहींना अन्नवस्त्राची हि वाण आहे आणि माझें हें पुस्तक वाचायचें म्हणजे सावकाराकडे गहाण पडलेला

आपला वेळ चोरून च. किती नीच हांजीखोर जीवन तुमच्यापैकीं पुष्कळ जण जगत आहेत हें मला उघड दिसत आहे. कारण अनुभवानें माझी दृष्टि तीक्ष्ण झाली आहे. गिऱ्हाईक मिळविण्याकरितां काय गुन्हे करण्याचें बाकी राहिलें आहे ? या गुन्ह्यांना पीनल कोडांत कैदेची शिक्षा नाहीं एवढा च काय तो फरक. असत्य, लाळघोटेपणा, केव्हां कुत्र्या-सारखे पाय चाटणें, तर केव्हां उदारतेचा आव — आणि हें सारें कशा-करितां ? तर तुमच्या शेजाऱ्यांनीं आपले जोडे, बूट किंवा टोपी, कोट किंवा गाडीघोडे तुमच्याकडून विकत घ्यावे म्हणून अथवा आपला किराणा माल तुमच्याकडून मागवावा म्हणून. हें लाचारीचें जीवित कशाकरितां घालवावयाचें ? तर पैसा मिळावा म्हणून. पैसा कशाकरितां पाहिजे ? तर अडीअडचणीला वा आजाराच्या वेळीं उपयोगी पडावा याकरितां. पण हे पैसे मिळविण्यांत च इतके श्रम करितों कीं त्या कष्टां-मुळेंच आजाराला आमंत्रण मिळावें. आणि एकदां का पैशाचा लोभ जडला कीं कसल्या हि अडीअडचणीच्या व आजाराच्या वेळीं देखील तो तिजोरीच्या वा बँकेच्या बाहेर म्हणून निघायचा नाहीं.

सामान्य लोक शांतपणें वावरतांना दिसत असले तरी खरोखर ते जिवावर उदार झाल्यासारखे च वागत असतात. त्यांच्यांत सहिष्णुता असते ती निराशेंतून उद्भवलेली असते. खेळ किंवा करमणूक देखील मनुष्याच्या मनांत त्याच्या न कळत वास करणारी निराशा झाकून ठेवण्याचें साधन. या खेळांत आनंद नाहीं. तो चालू असतांना मन गुंतलें असलें तरी तो संपल्यावर माणूस अधिक च उदास बनतो.

मनुष्याच्या जीवनाचें ध्येय काय, त्याच्या गरजा व साधनें कोणतीं, याचा विचार माणूस जर स्वतंत्रपणें करील तर त्याचे कितीतरी प्रश्न सहज सुटतील. आपल्या जीवनाचा तो स्वतः च खरा सूत्रधार असतो. पण भ्रमामुळें आपण परिस्थितिवश आहों, प्रवाहपतित, परावलंबी

आहों, अशी त्याची प्रामाणिक समजूत होऊन बसते आणि तो भलतीकडे वाहत जातो. पण चूक किती हि उशीरां उमगली तरी तत्क्षणीं सुधारण्याचा प्रयत्न करणें केव्हां हि श्रेयस्कर च. किती हि जुनी रूढी असली तरी प्रमाणावांचून तिच्यावर विश्वास ठेवणें चांगलें नाहीं. आज जें प्रत्येकजण ‘ सत्य ’ मानतो तें उद्यां खोटें ठरेल. धुरालाच आपण कधीं कधीं सृष्टीला जीवन देणारा मेघ समजतों. जुने लोक जी गोष्ट अशक्य समजतात ती प्रयत्न केल्यास शक्य आहे असें आपल्याला आढळून येईल. जुन्याबरोबर जुनें गेलें, नवीनांनीं नवीन मार्ग काढावा. जुन्या माणसांना अग्नि कसा राखून ठेवावा हें माहीत नव्हतें. आतां नवे लोक पाण्यानें भरलेल्या एका भांड्याखालीं विस्तव ठेवून माणसाला गरंकन पृथ्वीप्रदक्षिणा घडवितात. तरुणां-पासून तुम्ही जितकें शिकूं शकाल तितकें म्हाताऱ्या खोडांपासून नाहीं; कारण वयाबरोबर त्यांनीं कमावल्यापेक्षां गमावलेलें च अधिक असतें. वयाबरोबर ज्यांचें अज्ञान हि वाढत असतें असले लोक तरुणांना काय शिकविणार ? जन्माला येऊन मला तीस वर्षें होऊन गेलीं पण अजून एक हि खऱ्या मोलाचा शब्द किंवा कळकळीचा सल्ला या स्थविरांकडून मिळालेला नाहीं. बुद्धीला पटण्यासारखें त्यांनीं मला कांहीं सांगितलें नाहीं. त्यांना सांगतां येणार हि नाहीं. कारण जीवनाचा अनुभव ज्याचा त्यानें च घ्यावयाचा असतो. दुसऱ्याचा अनुभव कांहीं कोणाला च उपयोगी पडणार नाहीं. जीवनांत कांहीं उपयुक्त अनुभव मला मिळाला तेव्हां त्याबद्दल या पुराणप्रियांनीं कधीं शब्द हि काढला नव्हता असेंच मला दिसून आलें आहे.

एक बुड्ढा शेतकरी मला म्हणतो, नुसत्या वनस्पत्याहारावर माणूस जगणार नाहीं कारण हाडें बनवण्याचें द्रव्य त्यांत नाहीं. आणि म्हणून हीं हाडें बनविणारीं द्रव्यें मिळविण्याकरितां तो हाडें चघळतो. आणि

असलें खुळचट विधान तो बैलाच्या गाडींत बसून करीत आहे. बैल काय मांस खातात ? गवतानें बनलेल्या हाडांनीं च ते त्याला आणि त्याच्या खटाऱ्याला खांचखळग्यांतून सुद्धां ओढीत चाललेले आहेतच ना ?

## ३ माणसाच्या खऱ्या गरजा

या जगांत माणसाच्या मागें सारखा त्रास आणि अनेक चिंता लागलेल्या असतात. श्रीमंत असो गरीब असो, कोणाची च काळजींतून सुटका नाहीं. प्रत्येकजण कांहींतरी अडचणींत म्हणून आहे च. या अडचणी दूर करण्यांत च माणूस सारखा मग्न आहे. अडचणी नाहींशा करणें म्हणजे उणीवा भागविणें. उणीवा म्हणजे गरजा. या गरजा भागविण्याकरितां माणूस आतां जितका त्रास सोसतो आहे आणि चिंता करितो आहे, तितका त्रास सोसण्याची अथवा काळजी करीत बसण्याची खरोखर च जरूरी आहे काय ? आपण याचा थोडासा विचार करूं. माणूस सदा काळजींत आहे तो आपल्या गरजा भागत नाहींत म्हणून. आणि त्या भागविण्याकारितां तो अनेक उलाढाली करीत आहे. पण त्या गरजांना कांहीं अंत नाहीं कीं माणसाला हि उसंत नाहीं. याला कांहीं उपाय निघण्यासारखा नाहीं काय ? हा उपाय शोधण्यास माणसाच्या गरजा तरी काय याचा निश्चय झाला पाहिजे. माणूस आतां ज्या कांहीं बऱ्या वाईट अनंत वस्तु वापरीत आहे आणि ज्या मिळाल्या नाहींत म्हणून तो दुःखी व चिंताग्रस्त आहे, त्या साऱ्या 'गरजेच्या' सदरांत पडतात काय ? 'गरज' कोणती आणि 'चैन' कोणती ? आवश्यक वस्तु कोणती व अनावश्यक कोणती ? दारूचें व्यसन असणाऱ्याला दारू ही अवश्य वस्तु वाटते. अफू खाणाऱ्याला अफू अवश्य वाटते. या दोन वस्तूंना

" जीवनावश्यक वस्तू ' म्हणतां येईल काय ? व्यसनासक्त माणसाचा विचार या बाबतींत सामान्यतः प्रमाण मानतां येईल काय ? अर्थातच नाहीं. कोणत्या वस्तू जीवनाश्यक आहेत हें ठरविण्याला अलिप्तपणें व तटस्थपणें च विचार करणें जरूर आहे. ज्या वस्तूंविना मनुष्याचें जीवित च अशक्य होऊन मनुष्यजात नामशेष होईल त्यांना जीवनावश्यक म्हटलें पाहिजे. त्या कोणत्या हें ठरवावयास मध्ययुगीन रानटी माणसाच्या जीवनाचें निरीक्षण केलें पाहिजे. कारण रानटी माणसाच्या ' गरजा ' थोड्यां असल्या तरी तो अधिक कांटक व कणखर होता. तेव्हां माणसाच्या खऱ्या गरजा कोणत्या आणि त्या भागविण्यास काय उपाय केले पाहिजेत याचा शोध लावण्यास रानटी माणसाच्या जीवनाचा अनुभव आपल्यास उपयोगी पडेल. किंवा फार जुन्या काळच्या व्यापाऱ्यांच्या वह्या तपासल्या तर दुकानदार काय माल ठेवीत आणि लोक सामान्यतः काय वस्तू विकत घेत त्यावरून हि माणसाच्या ' स्थूल गरजा ' समजतील. कारण शेंकडों वर्षांच्या सुधारणांनीं हि मानवाच्या जीवनधर्मामध्यें मूलतः महत्त्वाचें अंतर पडलेलें नाहीं. आपल्या हाडांच्या सांपळ्यांत आणि आपल्या पूर्वजांच्या अस्थिपंजरांत बहुधा काडीमात्र फरक झालेला नाहीं.

अशा अनेक गोष्टींचा विचार करून मीं ' जीवनावश्यक वस्तूची ' व्याख्या अशी केली आहे ती अशी : ' जी वस्तु माणूस स्वतःच्या परिश्रमानें मिळवूं शकतो आणि अगदीं प्रथमपासून किंवा दीर्घकालाच्या सवयीनें त्याला ती इतकी महत्त्वाची होऊन बसते कीं रानटी, दरिद्री वा संन्यासी माणसाचें हि त्या वस्तूवांचून चालत नाहीं अशी वस्तु '. या व्याख्येप्रमाणें पाहतां बहुतेक सर्व प्राण्यांना पहिली जरुरीची वस्तु म्हणजे अन्न होय.

जंगलांत फिरणारा बिसॉन म्हणून रानरेडा आहे. त्याला थोडें गोडसें गवत आणि पाणी मिळालें म्हणजे बस्स झालें. त्यानंतर केव्हां तरी झाडाची किंवा टेकडीची सांवली मिळाली तर उत्तम च. जनावरांना अन्न आणि आसरा यांपेक्षां जास्ती कांहीं च लागत नाहीं. आपल्या देशाच्या हवेच्या मानानें माणसांच्या ' गरजा ' खालील चार सदरांत बसवितां येतील. अन्न, वस्त्र, घर आणि जळण. कारण एवढ्या वस्तू मिळेपर्यंत आपण जीवनाच्या दुसऱ्या प्रश्नांचा विचार हि करूं शकत नाहीं. मनुष्यानें घर व कापड यांचा शोध लावला आणि अन्न शिजविण्याची कला हि अवगत करून घेतली. विस्तवाच्या ऊबदारपणाचा सहज एकदां शोध लागल्यानंतर माणूस प्रथमतः चैनीची गोष्ट म्हणून कदाचित् त्याचा उपयोग करूं लागला. होतां होतां ती अगदीं आवश्यक गोष्ट होऊन गेली. कुत्र्यामांजरासारख्या पाळीव जनावरांना हि अशी उबेची सवय जडते असें आपल्यास दिसून येईल. योग्य आसऱ्यानें व वस्त्रानें आपण आपली शरीराची उष्णता योग्य प्रमाणांत राखतों. पण ही उष्णता वाजवीपेक्षां जास्त म्हणजे शरीरांतील उष्णतेपेक्षां बाहेरची उष्णता अधिक झाली तर आपल्यास उकडूं लागतें. उकडणें किंवा थंडी वाजणें हें सारें सवयीवर अवलंबून आहे. सुप्रसिद्ध सृष्टिशास्त्रज्ञ डार्विन संशोधकांच्या एका पार्टीबरोबर ' टेरा डेल फ्यूएगो ' येथें संशोधनाकरितां गेला होता. हें ठिकाण दक्षिण अमेरिकेच्या खालच्या टोकाजवळ आहे. तेथें थंडी भयंकर असते. त्याच्या पार्टींतल्या लोकांनीं कपड्यांवर कपडे चढविले होते आणि शेकोटी करून ते अगदीं रखरखीत विस्तवाजवळ बसले होते. तरी त्यांच्या अंगांतली थंडी कांहीं गेली नाहीं. आणि तेथले स्थानिक रहिवासी तुलनेनें अगदीं उघडेवाघडे होते आणि शेकोटीपासून दूर बसले होते, तरी हि शेकोटीची उष्णता त्यांना असह्य झाली होती व

त्यांच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या. ही आश्चर्याची गोष्ट म्हणून डार्विननें नमूद केली आहे. तसेंच न्यू हॉलंड हें हि एक असें च कडक थंडीचें ठिकाण आहे. तेथला रहिवासी जेथें खुशाल उघडा फिरूं शकतो त्या ठिकाणीं जाड व गरम कपडे घालून हि युरोपिअन माणूस कुडकुडत असतो. रानटी माणसाचा हा कांटकपणा आणि सुधारलेल्या माणसाची बुद्धिमत्ता यांचा मेळ घालतां येणार नाहीं काय? लीबेग ( Liebeg ) या शास्त्रज्ञाच्या मताप्रमाणें मनुष्याचें शरीर ही एक प्रकारची शेगडी च आहे आणि अन्न हें तींत जळणारा कोळसा आहे. हा कोळसा पोटांत जळत राहिल्यामुळें फुप्फुसांतील उष्णता कायम राहते. म्हणून च थंडीच्या दिवसांत उन्हाळ्यापेक्षां आपल्याला जेवण जास्त जातें. हें अन्नरूपी जळण पोटांत नियमितपणें जळत राहिलें म्हणजे शरीराची उष्णता योग्य प्रमाणांत राहते. तेव्हां त्याला आपण निरोगी म्हणतों. तें लौकर जळून गेलें किंवा जळण च मिळालें नाहीं अथवा पोटांत जळण भरपूर असून हि तें योग्य प्रकारें जळण्यास त्याला हवा मिळाली नाहीं तर त्याला रोग झाला, आजार झाला, असें आपण म्हणतों व विस्तव मुळीं विझून च गेला तर शरीर थंडगार पडतें म्हणजे त्याला मृत्यु येतो. या जीवनाग्नीचें खऱ्या विस्तवाशीं साम्य दाखविण्यापुरतें च वरील वर्णन घ्यावयाचें. प्रत्यक्ष अग्नीशीं त्याचा घोटाळा करावयाचा नाहीं.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं प्राणिजीवन म्हणजे प्राण्याच्या शरीरांतील अंतस्थ उष्णता. अन्न हें ती उष्णता कायम राखण्याचें जळण आणि कोळशासारखें बाहेरील जळण म्हणजे अन्न पकविण्याचें किंवा बाहेरून उष्णता देण्याचें साधन. अशा दोन प्रकारांनीं उत्पन्न झालेली उष्णता राखून ठेवण्याचें काम वस्त्र व आच्छादन करितात. तेव्हां आपल्या शरीराची महत्त्वाची गरज म्हणजे आपली

अंतस्थ उष्णता शाबूत राखणें ही होय हें उघड आहे. पण त्याकरितां म्हणजे अन्न, वस्त्र व आच्छादन प्राप्त करून घेण्याकरितां माणसाचा केवढा खटाटोप ! चिचुंद्री आपल्या बिळाच्या कडेला गवतपाल्याचा बिछाना सजविते तसा च माणूस हि आपला बिछाना सजवितो. बिछाना म्हणजे तरी काय ? रात्रीं वापरायचा एक प्रकारचा कपडा च किंवा घररूपी आवरणाखालचें आणखी एक प्रावरण. पण त्याकरितां माणूस किती पक्ष्यांचीं घरटीं किंवा पिसें लुटून आणील याचा कांहीं नेम नाहीं. कित्येक ठिकाणची हवा इतकी ऊबदार असते कीं तें ठिकाण इंद्रभुवन च वाटावें. अशा ठिकाणीं जळणाची गरज फक्त अन्न शिजविण्याकरितां. बाहेरची जरूर तेवढी ऊब त्याला सूर्यनारायण देतो. शेकोटीची जरूरी नाहीं. बरींचशीं फळें हि सूर्यकिरणांनीं च पिकतात. खाण्याचे अनेक प्रकारचे जिन्नस सहज मिळतात. आणि वस्त्राच्छादनाची आवश्यकता असली च तर अगदीं अल्प असते. अशा ठिकाणीं आधुनिक काळीं सुद्धां आणि या पुढारलेल्या जगांत हि चाकू किंवा सुरी, कुऱ्हाड, कुदळ, फावडें, पाटी किंवा घमेलें आणि व्हील बॅरो म्हणजे ढकलगाडी अशांसारखीं थोडीं अवजारें व तो अभ्यासू असेल तर थोडीं पुस्तकें, कागद, पेन्सील आणि दिवा किंवा कंदील एवढ्या च वस्तु खऱ्या गरजेच्या म्हणून म्हणतां येतील. आणि त्या अगदीं अल्प श्रमानें मिळवितां येतील असें मी स्वानुभवानें सांगतों. असें असून हि कित्येक खुळचट लोक जगाच्या दुसऱ्या टोकाला रानटी रोगट हवेंत व्यापाराकरितां दहा-दहा वीस-वीस वर्षें काढतात कां तर शेवटच्या दिवसांत आपल्याला सुखानें जगतां यावें, म्हणजे ही अंतस्थ उष्णता विनाकष्ट मिळावी, आणि शेवटीं देह आपल्या मायभूमींत पडावा म्हणून. आणि जे या व्यापारामुळें अति श्रीमंत होतात ते आपलीं शरीरें नुसतीं ऊबदार राखीत नाहींत तर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम (३२१०५४८) वि: ..नि.बंध...
क्रमांक .................... नों: दि: २२-१२-६३

सृष्टिक्रमापेक्षां जास्त गरम राखतात म्हणजे जणू कांहीं उकडून शिजवून काढतात.

हल्लीं आपण वापरीत असलेल्या पुष्कळशा चैनीच्या वस्तू किंवा सुखसाधनें अनवश्यक आहेत एवढें च नव्हे तर मनुष्याच्या उन्नतीला हानिकारक आहेत. चैनीच्या वस्तू व सुखसाधनें शाहण्या माणसांनीं, साधुसंतांनीं कधीं च वापरलीं नाहींत. गरीबांतल्या गरीबापेक्षां ते साधे राहिले. चिनी, हिंदु, पारशी, ग्रीक तत्त्वज्ञ हे ऐहिक संपत्तींत दरिद्री पण अंत:करणाच्या श्रीमंतींत यांच्याइतके कोण श्रीमंत होते? विश्व-कल्याणाच्या कार्यांत सदा निमग्न असणाऱ्या सध्यांच्या हि थोर पुरुषां-बद्दल असें च म्हणतां येईल. आपण ज्याला दारिद्य म्हणतों तें ज्यांनीं स्वेच्छेनें स्वीकारलें आहे, अशा मनुष्यांना च इतकें उच्च स्थान लाभतें कीं जेथून ते मानवी जीवनाचें समर्पक निरीक्षण अलिप्तपणें करूं शकतात.

मनुष्याच्या शरीराची अंतर्बाह्य उष्णता योग्य प्रमाणांत राहील इतकें अन्न, वस्त्र आणि आच्छादन मिळाल्यानंतर त्याला आणखी कशाची जरूरी लागणार आहे? पण माणूस जरूरीपेक्षां जास्त आणि पचायला कठीण असे पदार्थ खातो; विनाकारण मोठीं भपकेदार घरें बांधतो; कापडावर कापड चढवितो; जरूर नसतां हि धगधगीत शेगड्या वापरतो! अशा तऱ्हेनें शरीराला योग्य त्यापेक्षां जास्त उष्णता पोंचून त्यांत बिघाड उत्पन्न होतो. पोटांत जास्त अन्न जाऊन अपचन झाल्यावर उपवासानें त्याला विश्रांति देण्याऐवजीं आणखी कांहीं तरी दुसरी वस्तु खातो च. त्याला तो औषध हें नांव देतो. तें हि मग 'गरजेच्या' यादींत दाखल होतें. अशा तऱ्हेनें त्याच्या गरजांना सीमा उरत नाहीं. पण तो जर युक्ताहार-विहार असेल तर खऱ्या जरूरीपुरत्या वस्तू त्याला अल्प काळांत व अल्प श्रमांत मिळूं शकतील.

आणि उरलेला वेळ त्याला अधिक चांगल्या उद्योगाला देतां येईल. जीवनावश्यक वस्तू एकदां प्राप्त झाल्यावर त्याच वस्तूंचा अधिक संग्रह माणसानें करीत रहावें कीं कांहीं उदात्त ध्येय त्याच्यापुढें असावें ? जीवनाकाशांत त्यानें उंच भरारी मारूं नये काय ? कर्मयोगनिरत माणसाचे जीवनरूपी क्षेत्राची उत्तम मशागत होऊन राहते व योग्य वेळीं सुविचाराचें बीज पेरण्याला उत्तम वाफसा येतो. मूळ खोल गेल्यामुळें कोंब वर जोरानें फोफावतो. आंब्यासारख्या मोठ्या वृक्षाचीं मुळें जमिनींत खोल रुजून दृढ झालीं म्हणजे च त्याचा शाखा-विस्तार उंच आकाशांत फाकून त्याला सुन्दर मोहर आणि गोड फळांचा बहर येतो, तर गाजरासारखीं झाडें दोन तीन वर्षें जगण्यासारखीं असलीं तरी त्यांचें मूळ आणि फळ एकच असल्यामुळें फळ धरल्या-बरोबर त्याला छाटून टाकतात. त्याप्रमाणें च माणूस हि आपल्या ऐहिक जीवनवृक्षाचें मूळ पुण्यमय आचरणानें जितकें खोल रुजवील त्या च प्रमाणांत त्याचें पारमार्थिक जीवन हि उच्च होईल.

## ४ जिवापेक्षां कपडा प्यार

आतां दुसरी गरजेची जी वस्तु ‘ कपडा ’ तिचा थोडा विचार करूं. आपण कपडा विकत घेतों तो त्याच्या खऱ्या उपयुक्ततेचा विचार करून घेत नाहीं, तर फॅशनची किंवा नावीन्याची आवड किंवा दुसरे लोक काय म्हणतील ही भीति, या च मुख्य दोन कारणांनीं आपली पसंती ठरते. कपड्याची मुख्य जरूरी शरीराची उष्णता राखणें. हें आपण वर पाहिलें च आहे. दुसरी, सध्यांच्या प्रगत समाजांत वावरतांना आपला नग्नपणा झांकणें. याहून जास्त कपडा जमा करण्यापेक्षां तो काळ व श्रम दुसऱ्या अधिक जरूरीच्या व महत्त्वाच्या कामीं लावतां येणार नाहीं काय ? या फॅशनपायीं किंवा रूढीच्या पायीं राजे-

राण्यांना स्पेशल शिंप्याकडून शिवलेले विचित्र कपडे घालावे लागतात. त्यांना अंगाला चांगला बसणारा कपडा घालण्यांत काय सुख आहे हें समजणार नाहीं. कपड्यांची जाहिरात करण्याकरितां दुकानामध्यें माणसाच्या आकाराच्या बाहुल्या उभ्या करून त्यांना कपडे नेसवितात. त्या बाहुल्यांत आणि यांच्यांत काय फरक ? जे कपडे आपण रोज वापरतों त्यांवर आपल्या वागणुकीची व स्वभावाची छाप पडून ते हि आपल्या स्वभावाशीं एकरूप होतात आणि मग देहाचा त्याग करितांना जसा तो काळ आपण शक्य तितका लांबवीत असतों, जरूर ती औषधयोजना करितों आणि इतकें करून हि सोडावा लागला च तर अतिशय गांभीर्यानें सोडतों, त्याप्रमाणें च या आपल्याशीं एकरूप झालेल्या कपड्यांना टाकून देणें अवघड होतें. ज्याच्या कपड्याला ठिगळ लावलें आहे असा माणूस मला कधीं कमी योग्यतेचा वाटला नाहीं. पण सामान्यत: असें दिसतें कीं फॅशनेबल, स्वच्छ, नीटनेटके, ठिगळ न लावलेले कपडे घालण्याबद्दल लोक जितकी काळजी घेतात तेवढी आपलें अंत:करण शुद्ध ठेवण्याची घेत नाहींत. गुडघ्यावर ठिगळ लावलेली किंवा त्या ठिकाणीं दोन चार अधिक टिपा घातलेली पाटलोण घालावयास कोण तयार आहे, असल्या साध्या कसोट्या लावून माझ्या परिचयांतल्या अनेकांची मीं परीक्षा घेतली आहे. कोणी हि त्यांत उतरले नाहींत. अशानें आपला भाग्योदय विलयाला जाईल, आपल्या हातची संधि घालविल्यासारखें होईल, असें वाटत असल्यासारखे सर्व-जण वागले. तुटक्या विजारीपेक्षां तुटक्या पायानें शहरांत हिंडणें त्यांना अधिक सोपें वाटलें. कांहीं अपघात होऊन पाय मोडला तर तो क्षम्य आहे, चालेल; पण चुकून का पाटलोणीचा पाय तुटला कीं संपलें च; ती चालायची नाहीं. कारण खरी प्रतिष्ठा कोणती याचा तो विचार करीत नाहीं, तर कोणती मानली जाते हें तो पाहतो. आपल्याला

माणसाची ओळख होत नाहीं. त्याच्या बाहेरच्या पोषाखाशीं च आपला खरा परिचय होतो. बुजगावण्याला तुम्ही घालीत असतां तो पोषाख चढवा आणि जरा बाजूला उभे राहून मौज पहा. तुम्ही च स्वत: उभे आहांत असें समजून लोक त्या बुजगावण्याला च नमस्कार करितांना तुम्हांला दिसतील. एक कुत्रा कपडा घातलेला कोणी हि परकी माणूस घराजवळ आला कीं भूंकूं लागे. पण कपडे काढलेल्या चोरानें त्याला सहज चकवलें.

देश सुधारला म्हटलें कीं कपड्याचें प्रस्थ वाढलें च. मॅडेम पीफर ( Madame Pfeiffrs ) जगाच्या प्रवासाला निघाली होती. मागासले समजलेल्या आशिया खंडांतील देशांत नुसत्या प्रवासी पोषाखांत तिचें चाललें. पण रशियाचा पुष्कळ भाग आशिया खंडांत असला तरी तो युरोपिअन सुधारलेला देश! तेथें पोचल्याबरोबर अधिकाऱ्यांना भेटावयास जातांना कपडे बदलण्याची तिला जरूरी वाटली. कारण सुधारलेल्या जगांत माणसाची परीक्षा कपड्यांनीं च केली जाते. आपल्या या लोकशाही अमेरिका देशांत सुद्धां अवचित पैसा मिळणें व कपड्यांत व इतमामांत त्याचें प्रदर्शन करणें, यामुळें च माणसाला मानमान्यता मिळते. पण अशांना मान देणारे संख्येनें पुष्कळ असले तरी ते च खरोखर धर्मभ्रष्ट होत. आणि दूर आफ्रिकेंतल्या रानटी लोकांचा उद्धार करण्याकरितां धर्मोपदेशक मिशनरी पाठवितात त्याऐवजीं यांच्याच उद्धाराचें काम त्यांनीं प्रथम हातीं घ्यावें. शिवाय या कपड्यांच्या फॅशनमुळें शिवणकामाला सुरुवात झाली. आणि हें काम असें आहे कीं त्याला शेवट म्हणून नाहीं. स्त्रियांच्या पोषाखाच्या फॅशनला तर अंतच नाहीं.

ज्याला म्हणून खरोखर कांहीं काम करावयाचें आहे त्याला त्याकरितां कांहीं नवीन कपड्यांची जरूरी भासत नाहीं. त्याचें

जुन्या कपड्यांनीं भागतें. थोर कार्यामुळें आणि उदार वर्तनानें माणसाच्या जीवनांत जेव्हां आमूलाग्र परिवर्तन होईल आणि त्यामुळें त्याला त्याचे जुने कपडे शोभणार नाहींत तेव्हां च त्यानें नवीन कपडे करण्याचा विचार करावा. मोराचा पिसारा झडायचा जसा विशिष्ट काळ असतो, तसा च कपडे बदलण्याचा काळ म्हणजे आपल्या जीवनांतील क्रांतीचा च तो काळ असावयास पाहिजे. माणसाचे कपडे इतके साधे व संसार इतका सुटसुटीत असावा कीं त्याच्या शहराला शत्रूचा वेढा पडला तर मागल्या मालमत्तेची कांहीं चिंता न करतां अगदीं मोकळ्या हातानें स्थितप्रज्ञाप्रमाणें त्याला बाहेर निघून जातां यावें.

मीं माझ्या शिंप्याला बंडीसारखा जुन्या फॅशनचा कपडा शिवावयास सांगितला तर तो म्हणतो, आतां तसली फॅशन नाहीं. आणि तसा कांहीं फॅशनच्या बाहेरचा कपडा म्हटला कीं आपल्याला पाहिजे असलेला कपडा शिवून घेणें कठीण पडतें. कारण असला कपडा खरोखर च शिवून घेण्याइतका मी अविचारी असेन यावर त्याचा विश्वास च बसत नाहीं. त्याच्या टेपानें माझ्या गुणांचें माप कांहीं त्याला काढतां येत नाहीं. तो माझ्या खांद्याचें माप घेतो, आपला कोट त्यावर कसा दिसेल हें तो पाहतो. जणूं कांहीं माझे खांदे म्हणजे कोट टांगून ठेवायचा हँगर च. आपण कलेचे उपासक नाहीं तर फॅशनचे. ती ठरवील तितकें बारीक सूत; ती ठरवील तें डिझाइन; ती ठरवील तो कट्. पारिसमधल्या मुख्य माकडानें प्रवासी टोपी वापरली कीं अमेरिकेंतलीं हि सारीं माकडें तसली टोपी वापरूं लागतात. आपल्या वा इतर देशांत हि सौंदर्यदृष्टि आलेली नाहीं. फुटलेल्या जहाजावरून किनाऱ्यास लागलेल्या लोकांप्रमाणें जें कांहीं

हातीं लागेल तें ते वापरतात आणि काल किंवा स्थळ या दृष्टीनें थोडें दूर असलेल्या आपल्या सोंगाकडे पाहून हंसतात. प्रत्येकजण मागल्या पिढींतल्या पोषाखाला हंसतो पण तितका च अचरट नवा पोषाख वापरतो. आपल्या नव्या डिझाइनच्या कल्पना इतक्या पोरकट आणि रानटी होऊन गेल्या आहेत कीं तें डिझाईन शोधून काढायला कॅलेडोस्कोप म्हणून तीन कांचा बसवून त्यांत रंगीबेरंगी तुकडे घातलेले असतात. तें फिरवलें असतां दरवेळां नवीन डिझाईन बदलतें. तें किती वेळां तरी फिरवून पहावें तरी या पिढीला त्यांना पाहिजे असलेल्या डिझाईनचा पत्ता लागणें कठीण ! पण व्यापाऱ्यांना माहीत असतें कीं या आवडी केवळ लहरीवर अवलंबून असतात. दोन सारखे वाण पण दोन चार धाग्यांनीं पोतामध्यें किंवा किंचितसा रंगाच्या छटांमध्यें फरक असला तर एक चटकन् खपून जातें व दुसरें पडून राहतें आणि नंतर थोड्या दिवसांनीं दुसरें फॅशनेबल ठरतें व पहिल्याला कोणी विचारीत नाहीं.

लोकांकरितां गिरण्यांत कापड तयार करणेंत यावें ही पद्धति च मुळीं चांगली आहे असें मला वाटत नाहीं. अमेरिकन गिरण्यांतील मजुरांची स्थिति ही इंग्लंडमधील मजुरांच्यासारखी निकृष्ट होऊं लागली आहे. मी जें पाहतों व ऐकतों त्यावरून मला त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. लोकांना कापड आणि मजुरांना काम मिळावें या उदात्त हेतूनें कांहीं गिरण्या काढल्या जात नाहींत आपल्या फायद्याकरितां काढतात. गिरण्यांमुळें आपली कापडाची सोय झाली, कापड स्वस्त मिळूं लागलें, असें प्रथम भासलें तरी अखेर गिरण्यांमुळें लोकांना अवश्य तें कापड मिळत नाहीं. गिरण्यांचा फायदा मात्र वाढत जातो. माणूस जें ध्येय आपल्यापुढें ठेवतो तें च तो अखेर साध्य करतो.

म्हणून उच्च ध्येय चटकन साध्य होण्यासारखें नसलें तरी माणसानें आपलें ध्येय उच्च च ठेवावें.

## ५ अल्पमोलांत मालकीचें घर

आतां माणसाची तिसरी गरज घर. तिचा विचार करूं. कांहीं ठिकाणची हवा आपल्यापेक्षां हि थंड आहे. तरी तेथील लोकांना अनेक पिढ्यांपर्यंत घराची जरूरी भासली नाहीं. असें असलें तरी आपल्या समाजाला घराची आवश्यकता आहे ही गोष्ट अमान्य करतां येण्याजोगी नाहीं. घरामुळें माणसाची किती सोय होते ही गोष्ट माणसाच्या फार च लौकर लक्षांत आली असली पाहिजे, तरी पण बारा अन् बारा महिने कांहीं निवाऱ्याची खरी आवश्यकता असत नाहीं. कडक थंडीच्या आणि पावसाच्या दिवसांत काय ती घराची खरी किंमत. इतर दिवसांत एखाद्या लहानशा छत्रीनें च घराचें काम भागतें. रेड इंडियन लोकांची झोपडी--तिला विग्वॅम म्हणतात—एका दिवसांत उभी करतां येते. एका जागेवरून त्यांचा कँप हलला कीं जवळच्या एखाद्या झाडावर ते लोक रंगानें किंवा खोदून रेघ मारून ठेवीत. त्यावरून त्या ठिकाणीं किती वेळां कँप पडला हें ओळखतां येई. अफाट अवकाशाचा उपयोग करून घेण्याइतके माणसांचे अवयव बळकट नाहींत. म्हणून त्यानें आपलें जग लहानसें करून घेतलें व आपल्याला पुरेल इतक्या जागेला भिंती घालून घेतल्या. मूलतः तो वस्त्रहीन आणि गृहहीन च होता. हें त्याचें जीवन वसंत ऋतूच्या समशीतोष्ण काळांत आणि दिवसाच्या वेळीं सुखाचें असलें तरी बर्फ पडेल इतक्या कडक हिवाळ्यांत किंवा धो धो पाऊस पडतो अशा वर्षा ऋतूंत किंवा जेथें उन्हाळा भयंकर असतो तेथें उन्हाळ्याकरितां माणसानें घरासारख्या कांहीं आच्छादनाचा लवकर शोध लावला नसता तर मनुष्यजात कधीं च

नामशेष होऊन गेली असती. कापडाचा शोध लावण्यापूर्वी आदिमानव लतामंडपांचा तरी उपयोग करीत च. आदिमानवांतील एखाद्या उद्योगी व्यक्तीनें प्रथम खडकांत बनलेल्या गुहेचा शोध लावला असावा अशी आपण कल्पना करूं शकतों. गुहेनंतर आपली प्रगति ताडामाडाचीं पानें, झाडाच्या डहाळ्या व साली, पुढें तंबूवजा ताणून बांधलेला कपडा, नंतर गवत, मग फळ्या, लाकडें, दगड व कौलें अशी घराचे बाबतींत इतकी प्रगति होत गेली कीं उघड्यामध्यें राहणें म्हणजे काय हें हि आपण विसरून गेलों आहों. आपलें जीवन कल्पनातीत ‘ घरगुती ’ बनून गेलें आहे. आणि घर आणि रान यांमधील अंतर भलतें च वाढून बसलें आहे. वस्तुतः आकाशांतील तारकांच्या आणि आपल्यामध्यें कांहीं आडपडदा नाहीं असे जितके दिवस व रात्री आपल्याला घालवितां येतील तितकें चांगलें. कवींना स्फूर्ति घराच्या छपराखालीं येत नाहीं. साधुसंत त्याच्या छायेचा उपयोग फार काळ करीत नाहींत. पक्षी गुहांमध्यें गात नाहींत कीं कबुतरें आपल्या खुराड्यांत मोठीं सुखी असत नाहींत.

असें असलें तरी घर जरूर आहे. पण तें बांधतांना थोडी अक्कल वापरली पाहिजे. नाहीं तर एखादी बंदीशाळा च बांधली जायची. किंवा कशाचा च थांगपत्ता लागणार नाहीं असा चक्रव्यूह, पदार्थ-संग्रहालय किंवा धर्मशाळा अथवा सुन्दर प्रशस्त कबरस्थान च बनलें जायचें.

जुन्या काळीं थोडक्यांत सोईस्कर घरें कशीं बांधलीं जात याचा थोडा इतिहास आपण येथें पाहूं. मॅसाचुसेटच्या इंडियन वसाहतीचा सुपरिंटेंडंट गूकिन ( Gookin ) सन १६७४ सालच्या आपल्या एका लेखांत म्हणतो, ‘ झाडांच्या साली काढून त्या ओल्या असतांना सपाट करून त्यांवर वजन ठेवीत. मग असे तयार झालेले तक्ते

छपरावर पक्के बसवून बनविलेलीं घरें फार च चांगलीं ऊबदार असत. दुय्यम प्रतीच्या घरांवर मोठ्या जातीच्या लव्हाळ्याच्या चटया बसवीत. हीं घरें वरच्यापेक्षां कमी ऊबदार असत. साठ ते शंभर फूट लांब आणि तीस फूट रुंद अशीं घरें मीं पाहिलीं आहेत. मीं त्यांच्या विग्वॅममध्यें राहिलों हि आहें. या विग्वॅम झोपड्या उत्तम इंग्लिश घराइतक्या ऊबदार व सोईस्कर मला वाटल्या.' तो पुढें म्हणतो, 'यांमध्यें जमिनीवर सतरंज्या किंवा बैठकी अंथरलेल्या असत आणि भिंतींना वेलबुटीदार चटयांचें लायनिंग असे. छपरांत झरोका राखून त्यावर बसविलेली चटई दोरीनें कमी जास्त हलवून हवी तेवढी हवा घेण्याची सोय हि यामध्यें असे, इतकी प्रगति या विग्वॅममध्यें झाली होती. असें घर बनवायला एक ते दोन दिवस लागत. उतरून पुनः उभारायला कांहीं तास च पुरे होत. आणि असलें घर किंवा त्या घरांतली एखादी खोली तरी प्रत्येक कुटुंबाच्या मालकीची असे.

माणूस रानटी स्थितींत होता तेव्हां त्याच्या साध्यासुध्या गरजा भागविण्याइतपत घर प्रत्येक कुटुंबाच्या मालकीचें असे. पक्ष्यांना स्वतःचीं घरटीं असतात, कोल्ह्यांना बिळें असतात, रानटी माणसांना झोपड्या असतात, पण या सुधारलेल्या जगांत बहुसंख्य कुटुंबांना स्वतःच्या मालकीचें घर असत नाहीं. मोठ्या शहरांत स्वतःचें घर असलेले अगदीं च थोडे. बाकीचे या घराकरितां, म्हणजे या बाह्य आच्छादनाकरितां, इतका कर भरतात कीं त्यांचें दारिद्र्य कधीं जन्मांत संपत नाहीं. त्यांनीं निर्धारानें साधें रहायचें ठरविलें तर तेवढ्या पैशांत त्यांना 'विगवॅम'चे गांवचे गांव खरेदी करितां आले असते. भाड्याच्या घरांची आणि मालकीच्या घरांची मी येथें तुलना करीत नाहीं. पण एवढी गोष्ट उघड आहे कीं, जंगली माणसाच्या घराची किंमत अगदीं थोडी. म्हणून त्यांना तें स्वतःच्या मालकीचें मिळूं शकतें आणि

सुधारलेल्या माणसाला घर बांधणें परवडत नाहीं. म्हणून तो तें भाड्यानें घेतो आणि दूरवर विचार करितां हें भाडें हि त्याला परवडत नाहीं. यावर कोणीं म्हणतील कीं, थोड्याशा भाड्यानें च सुधारलेला माणूस ज्या घरांत राहतो तें घर रानटी माणसाच्या झोपडीच्या मानानें राजवाडा च म्हटलें पाहिजे. शेकडों वर्षांच्या अनेक सुधारणांचा फायदा त्याला विनाआयास मिळतो. पण या सर्व आधुनिक सुखसोई उपभोगणारा माणूस सुधारलेल्या जगांत दरिद्री गणला जातो. या सुधारणांनीं मनुष्याच्या परिस्थितींत प्रगति घडवून आणली असें जर ठाम विधान करावयाचें असेल तर हीं सुधारलेलीं घरें पूर्वींच्या किंमतींत च बांधून दाखविलीं पाहिजेत. पण सध्यां एखादा भांडवलदार शास्त्रज्ञांच्या साहाय्यानें एखादी नवीन चीज बनवतो व जाहिरातबाजी करून ती कांहीं लोकांच्या गळ्यांत बांधतो. मग इतरांना हि त्या वस्तूशिवाय आपलें चालणार नाहीं असें वाटूं लागतें आणि परवडत नसून हि तो ती घेऊं लागतो व त्याचें जीवन उत्तरोत्तर निकृष्ट होऊं लागतें. या घराच्या बाबतींत तर स्वतः घर बांधायला गेलेला माणूस फसल्याशिवाय क्वचित् च राहतो.

लोक आपल्या जीवनाचा प्रश्न अशा साधनांनीं सोडवूं पहात आहेत कीं तीं साधनें च प्रत्यक्ष जीवनापेक्षां अवघड आणि घोटाळ्याचीं आहेत. सुखसमाधान आणि स्वातंत्र्य पकडायला तो जणूं कांहीं मोठ्या कौशल्यानें सांपळा लावून ठेवतो. पण बिचाऱ्याचा स्वतःचा पाय मात्र त्यांत अडकतो. सुधारलेल्या जगांत आपल्याभोंवतीं चैनीच्या वस्तू जरी खच्चून भरल्या आहेत तरी खऱ्या जरूरीच्या गरजा व सुखसोई ज्या रानटी माणसांला सहज उपलब्ध होत्या त्यांची मात्र आपल्याला वाण आहे.

मोठ्या खटपटीनें एखाद्यानें घर बांधलें च तर त्यामुळें त्याची श्रीमंती वाढली असें न होतां तो एक बोजा च त्याच्या डोकीवर बसतो आणि त्यानें घर बांधलें असें म्हणण्यापेक्षां तो आतां घरांत अडकला असें च म्हणणें योग्य. 'मिनर्व्हा'नें घर घेतलें त्या वेळीं तिचा पति 'मोमस'नें वाईट शेजार टाळायला फिरतें घर हवें, हें तसें नाहीं, अशी त्यांत खोड काढली अशी ग्रीक पुराणांत कथा आहे. त्याची तक्रार योग्य होती असें मला वाटतें. घर हि अशी हालवायला कठीण (Unwieldy) मालमत्ता आहे कीं आपण त्यांत राहतों म्हणण्यापेक्षां त्या जेलखान्यांत अडकतों असें म्हणणें च अधिक युक्त. एक दोन उदाहरणें माझ्या पक्कीं माहितीचीं आहेत कीं त्यांना आपलीं घरें विकून दुसरीकडे जावयाचें होतें, पण तें कांहीं त्यांना शक्य झालें नाहीं. मृत्यूनें च त्यांची त्यामधून सुटका व्हावयाची !

घटकाभर आपण असें गृहीत धरूं कीं बहुसंख्य लोकांना आधुनिक सुखसोईंनीं युक्त घरें भाड्यानें किंवा मालकी हक्कानें मिळूं शकलीं. घरें सुधारलीं खरीं पण त्यांत राहणारे लोक जर सुधारले नाहींत तर त्यांचा काय उपयोग ? राजवाडे बांधले, पण त्यांत राहण्यायोग्य राजासारखे उदार लोक कोठें आहेत ? या सुधारलेल्या माणसाचे उद्योग रानटी माणसापेक्षां कांहीं उच्च नाहींत. त्यांचा सर्व काळ देहाचे चोचले पुरविण्यांत आणि विषयसेवनांत च व्यतीत होत असला तर त्यांना जंगली माणसांपेक्षां चांगलीं घरें पाहिजेत च कशाला ?

पण गरीब लोकांची काय अवस्था आहे ? कांहीं लोक बाह्य परिस्थितीमधें रानटी लोकांपेक्षां जेवढे उन्नत झाले आहेत त्या च प्रमाणांत दुसरे कांहीं लोक रानटी माणसांपेक्षां हि अवनत झाले आहेत. एकीकडे जितकी चैनबाजी आहे तितकी च दुसरीकडे

कंगाली आहे. कांहींना रहायला राजवाड्यासारख्या इमारती, तर दुसऱ्यांच्या वांट्याला फूटपाथ. इजिप्तमधें फाराओ म्हणून राजे होते त्यांचीं थडगीं ज्या ‘ पिरामिड ’ नांवाच्या प्रचंड इमारतीमध्यें आहेत त्या इमारती ज्या असंख्य मजुरांनीं बांधल्या त्यांना खायला कोरडे तुकडे हि मिळत नसत आणि मेल्यावर योग्य प्रकारें त्यांचें दफन हि झालें नसेल. राजवाड्याची कार्नीस घडविणाऱ्या गवंड्याला स्वतःला विग्वॅम इतपत झोंपडी हि असत नाहीं.

बहुतेक सर्व लोक घर म्हणजे काय आणि तें कशाकरितां पाहिजे याचा विचार हि करीत नाहींत. आपल्या शेजाऱ्याचें जसलें घर आहे तसलें आपल्याला हि पाहिजे, एवढ्याकरितां कांहीं कारण नसतांना माणसें राबत असतात आणि सारें आयुष्य दारिद्र्यांत कंठीत असतात. सहज मिळूं शकणाऱ्या व मस्तकाचें उन्हावाऱ्यापासून संरक्षण करणाऱ्या साध्या टोप्या फेंकून देऊन आपल्याला राजमुकुट मिळत नाहीं म्हणून कुरकूर करीत बसण्यासारखी त्यांची अवस्था आहे. चैनीच्या नवनव्या वस्तू संपादन करणें एवढी च का माणसाच्या उद्योगाची इतिकर्तव्यता ? आणि केव्हां त्या मिळाल्या नाहींत तर समाधान मानून घ्यावयास त्यानें शिकूं नये काय ?

युरोपमधून अमेरिकेंत जे पाहिले वसाहतवाले आले ते प्रथम घरें बांधण्याच्या भानगडींत पडले नाहींत. प्रथम त्यांनीं आपलें सारें लक्ष शेतीमधें च घातलें. तरी पण पहिले वर्षीचें पीक इतकें थोडें आलें कीं कित्येक महिने त्यांना अर्धपोटीं च कंठावे लागले. ज्या शेतकऱ्यांना आपल्या मनासारखीं घरें बांधण्याची शक्ति व ऐपत नव्हती, ते जमिनींत तळघरासारखा खड्डा करून घर बनवीत. भिंतीच्या बाजूंना लाकडें उभीं करून त्यांवर झाडाच्या साली बसवून लायनिंग तयार करीत.

जमिनीवर फळ्या अंथरीत तसें सीलिंग हि फळ्यांचें च करीत. त्या वेळीं अमेरिकेंत मोठ्या झाडांच्या सालीची मुळीं च वाण नव्हती. पहिलीं तीन तीन चार चार वर्षें हि त्यांनीं असल्या घरांत काढलीं. न्यू इंग्लंड-मध्यें जे श्रीमंत वसाहतवाले आले ते हि पण असल्याच घरांत राहिले. कारण त्यांनीं जर स्वतःपुरतीं उत्तम घरें बांधलीं असतीं व मजुरांना मात्र असलीं घरें दिलीं असतीं, तर कोणी मजूर त्यांचेबरोबर यायला तयार च झाले नसते. दुसरें असें कीं, त्यांनीं प्रथम शेतीची खटपट न करितां जर ते घर बांधीत बसले असते तर त्यांच्या खाण्याची काय सोय झाली असती? तीन चार वर्षांनीं जेव्हां जमिनींतून चांगलें पीक येऊं लागलें तेव्हां च त्यांनीं हजारों रुपये खर्चून चांगलीं घरें बांधलीं. यांत आपल्या वाडवडिलांनीं अत्यंत जरूरीच्या गोष्टी प्रथम संपादन करण्यांत शहाणपण च वापरलें. आतां हें तात्त्विक विवेचन पुरें करून 'वॉल्डन पाँड'जवळच्या जंगलांत मीं घर बांधलें त्याची थोडी हकीकत सांगतों.

## ६ माझी झोपडी

सन १८४५ च्या मार्च महिन्याचे अखेरीस मीं एक कुऱ्हाड उसनी घेतली आणि वॉल्डन सरोवराजवळच्या जंगलाचा रस्ता धरला. घराकरितां एक सोईस्कर जागा पाहून त्या ठिकाणचीं झोंपडीला उपयोगी पडतील अशीं उंच सरळ व्हाईट पाईनचीं झाडें तोडावयास सुरुवात केली. असें कांहीं उसने घेतल्याशिवाय म्हणजे लोकांचे कांहीं उपकार घेतल्याशिवाय कामाला सुरुवात करणें कठीण आहे. शिवाय त्यामुळें तुमच्या उद्योगाकडे लोकांचें लक्ष वेधायला हि त्याचा उपयोग होतो. ती कुऱ्हाड देतांना मालक म्हणाला, 'ती मला अगदीं जीव कीं प्राण आहे; संभाळून वापरा.' पण मीं परत करतांना उत्तम

स्थितींत च केवळ नव्हे तर अधिक धार लागलेली त्याला परत केली. मी काम करीत होतों ती जागा मोठी आनंददायी होती. पाईन झाडांची अगदीं दाट गर्दी होती व त्यांमधून सरोवराचा देखावा मोठा सुंदर दिसे. तळ्यांतलें सर्व बर्फ अजून वितळलें नव्हतें. पण जेथें वितळून गेलें होतें त्या ठिकाणीं स्वच्छ निळें पाणी दृष्टीस पडे. मी काम करीत असतांना त्या बर्फावरून येणारा वारा अंगाला अगदीं झोंबून जाई. मी परत फिरलों कीं रस्त्याचे बाजूचे पिवळ्या वाळूचे ढीग भोंवतींच्या धुंद वातावरणांत उठून दिसत आणि सूर्यकिरणांत चकाकूं लागत. तसें च चंडोल वगैरे पक्षी आपल्या किलबिलाटानें वसंतागम जवळ आल्याचें सूचित करीत. वसंताच्या सुखकर आगमनानें माणसाच्या मनांतलें असमाधानाचें बर्फ वितळूं लागतें तसें च बधिर होऊन गेलेलें या भूभागावरचें जीवन हि हळूं हळूं जणूं कांहीं आळोखे पिळोखे देऊं लागलें होतें. एके दिवशीं कुऱ्हाडीचा दांडा निसटला म्हणून लांकडाची पाचर दगडानें ठोकून ती फुगून घट्ट बसण्याकरितां पाण्यांत टाकून बसलों होतों. इतक्यांत एक पट्टेदार साप पाण्यांत शिरला आणि मी तेथें होतों तोंपर्यंत म्हणजे सुमारें पंधरा मिनिटें आराम पडून राहिला. कारण त्याच्या अंगांत थंडीनें आलेला जडपणा अद्याप गेला नव्हता. मला वाटतें या च कारणाकरितां, म्हणजे मनुष्याच्या अंगांतला जडपणा गेलेला नाहीं म्हणून, ते या अवनत स्थितीला आले आहेत. वसंतोद्‌गमानें जर त्यांच्या अंगांत चैतन्य उत्पन्न झालें तर ते उल्हसित होऊन उच्च जीवन गांठतील. बर्फानें गारठून अगदीं निर्जीव झालेले साप सूर्याच्या किरणांनीं बर्फ वितळल्यावर अंग मोकळें व्हावें म्हणून उघड्यांत येऊन पडलेले फिरावयास जातांना मला अनेक वेळां दिसले आहेत. एप्रिलच्या एक तारखेस पाऊस पडला आणि सारें

बर्फ वितळून गेलें. सकाळीं धुकें मात्र दाट होतें, त्यामुळें तळ्यांत गेलेलें एक बदक बिचारें केविलवाणें ओरडत होतें.

अशा तऱ्हेनें कांहीं दिवस लाकडें तोडून, कापून तयार करण्यांत गेले. खांब वगैरे मुख्य लाकडें हमचौक सहा इंच जाडीचीं काढलीं. लगी फक्त दोन बाजूंनीं तासल्या आणि वासे व तक्तपोशीचीं लांकडें एकाच बाजूनें तासून साफ केलीं. कांहीं ठिकाणची साल तशीच ठेवून दिली त्यामुळें तीं कापल्या लाकडापेक्षां अधिक बळकट राहिलीं. एवढ्या काळांत आणखी हि कांहीं हत्यारें मीं पैदा केलीं होतीं. आणि सगळ्या ठिकाणचे लाकडांचे जोड चांगले सुतारासारखे बनवले होते. माझें काम संथपणें चाललें होतें. कामांत फार वेळ घालवीत नसें तरी पण खाण्यासाठीं पाव लोणी बरोबर घेऊन जात असें. त्या तोडलेल्या झाडावर बसून पाव खाईं आणि त्यावर गुंडाळलेलें वर्तमानपत्र वाचीत बसें. तोडलेल्या झाडांचा चीक हाताला लागल्यामुळें पावाला हि त्याचा एक प्रकारचा चांगला स्वाद येई. मीं जरी कांहीं पाईन झाडें तोडलीं होतीं तरी आतां त्यांचा मला चांगला परिचय होऊन मी त्यांचा मित्र बनलों होतों. माझ्या तोडण्याचा आवाज ऐकून एखाद्या भटक्याचें लक्ष्य वेधून तो माझेकडे येई व मग आम्ही मौजेनें गप्पा मारीत बसत असूं. काम झटकन संपवून टाकायची मला गडबड नव्हती तर उलट तें कसें लांबेल हें च मी पहात होतों. त्यामुळें एप्रिलच्या मध्यापर्यंत जेमतेम झोपडीचा सांगाडा तयार झाला. तक्ते पाहिजे होते म्हणून जवळच्या फिचबर्ग रेल्वेवर काम करणाऱ्या जेम्स कॉलिन्स नांवाच्या आयरिश माणसाची झोपडी मीं खरेदी केली. ती झोंपडी पहावयास मी गेलों तेव्हां तो घरीं नव्हता. घराची खिडकी उंचावर होती त्यामुळें आंतल्या माणसांच्या दृष्टीस न पडतां प्रथम मी ती बाहेरून पाहून घेतली. झोपडी लहानशी च होती व तिचें छप्पर निमुळतें उंच

होतें. यापेक्षां कांहीं पाहण्यासारखें नव्हतें च. छपराचे तक्ते कांहींसे तिप्पड व उन्हानें कडकडीत झाले होते. दाराला उंबरा नव्हता तेव्हां दाराच्या झडपाखालून आंत जायला कोंबड्यांना राजमार्ग मिळाला होता. कॉलिन्स-बाईनीं दारांत येऊन घर आंतून पाहणेस सांगितलें. मी जवळ आल्यामुळें कोंबड्या बुजून घरांत धांवल्या. आंत अंधार होता. घरांत केर भरपूर आणि जमिनीवरच्या फळ्या ओलसर असल्यामुळें पाय घसरून पडण्याची चांगली सोय होती. त्या काढल्या तर कांहीं उपयोगाला येण्याजोग्या नव्हत्या. आंतली बाजू दाखवायला तिनें दिवा लावला. आंतून छप्पर व भिंती दाखविल्या. खाटेखालपर्यंत तक्तपोशी होती. त्यावर पाय न देण्याबद्दल बजावलें कारण तेथें तळघर होतें. तळघर म्हणजे दोन फूट खोल खड्डा. त्यांत हि केराशिवाय कांहीं नव्हतें. तिच्या शब्दांत घराचें वर्णन करावयाचें म्हणजे छपराचे व भिंतीचे तक्ते अगदीं सर्व उत्तम आहेत शिवाय एक खिडकी. ती खिडकी म्हणजे मांजर जाईल एवढीं दोन चौकोनी भोकें. घरांत एक चूल, एक बिछाना, बसायचा कट्टा, तिथेंच जन्मलेलें एक लहान मूल, बायकांची रेशमी छत्री, गिलीटाच्या चौकटीचा आरसा आणि ओकच्या फळीला बसविलेलें कॉफी दळण्याचें यंत्र. एवढी एकूण सामुग्री होती. इतक्यांत जेम्स हि आला आणि चार डॉलर पंचवीस सेंटला सौदा ठरला व घर दुसरे दिवशीं सकाळीं पांच वाजतां मोकळें करून देण्याचें त्यानें कबूल केलें. मी सहा वाजतां तिकडे निघालों तों तो बाडबिछाना घेऊन गांवाकडे निघालेला वाटेंत च भेटला. बिछाना, कॉफी दळण्याचें यंत्र, आरसा, कोंबड्या वगैरे सर्व कांहीं एका बोजांत मावलें होतें. लगें च खिळे काढून तें घर मीं उतरलें आणि गाडींतून माझ्या झोंपडीच्या जागेवर नेऊन तक्ते सरळ होण्याकरितां उन्हांत पसरून ठेवले.

टेकडीच्या उतारावर रानकोंबडयानें जमीन उकरून आपलें घर बनवलें होतें. तेथें मी माझें तळघर खोदलें. झाडाच्या मुळया उकरून टाकल्या आणि कसलीं च मुळें जाणार नाहींत इतका म्हणजे सात फूट खोल व सहा फूट हमचौक खड्डा खणला. खड्डयाच्या बाजूला दगड रचले नव्हते, पण पायऱ्या सोडल्या होत्या, त्यामुळें बाजवा ढासळत नव्हत्या.

मे महिन्याच्या सुरुवातीला कांहीं शेजाऱ्यांच्या साहाय्यानें झोपडीचा सांगडा उभा केला. शेजाऱ्यांच्या मदतीची जरूरी होती असें नाहीं पण या महत्त्वाच्या प्रसंगाला त्यांच्या उपस्थितीमुळें शोभा आली. त्यांनीं हा माझा मोठा च सन्मान केला आणि माझा असा विश्वास आहे कीं, याहून उच्च इमले बांधण्यास सहायभूत होण्याची संधि केव्हां तरी त्यांना मिळेल च. छपराचे तक्ते चांगले जोड करून पाणी न गळण्याइतके पक्के बसविल्यावर जुलैच्या चार तारखेपासून मी त्या घरांत राहूं लागलों पण तक्ते मारण्याचें काम पुरें होण्यापूर्वीं च मी तळ्याजवळच्या टेकडीवरून हातांतून च जवळ जवळ दोन गाडया भरतील इतके दगड आणून धुराडयाचा पाया भरून ठेवला आणि खोली ऊबदार राखण्याची जरूरी पडण्यापूर्वीं च धुराडयाचें काम पुरें केलें. तोंपर्यंत रसोईचें काम जमिनीवर उघडयावर च उरकून घेत असें. अशी स्वयंपाक करण्याची पद्धति चालू पद्धतीपेक्षां कांहीं बाबतींत अधिक सोईस्कर आणि सुखाची आहे. भाकरी भाजून होण्यापूर्वीं जर पावसाची सर आली तर तक्त्यांचा आडोसा करून त्याखालीं भाकरी भाजतांना पहात बसें. असे आनंदाचे अनेक तास मीं घालविले आहेत. माझे हातांत जेव्हां काम फार होतें तेव्हां वाचन फार च थोडें झालें, पण कोणत्या हि कारणानें जे कांहीं कागदाचे कपटे खोलींत जमत ते वाचून इलियड काव्य वाचल्याइतकी करमणूक होई.

घर बांधतांना जितक्या गोष्टींचा मीं विचार केला त्यापेक्षां अधिक गोष्टींचा विचार करणें जरूर आहे. दरवाजा, खिडकी, तळघर, माळा या सर्वांचें मानवी जीवनांत स्थान कोणतें ? आणि केवळ ऐहिक गरजेपेक्षां जास्त महत्त्वाचें कारण मिळाल्याशिवाय मुळीं घर बांधायचें च कशाला ? पक्ष्यांनीं स्वत:करितां घरटें बांधणें जितकें योग्य तितकें च माणसानें घर बांधणें योग्य. माणसांनीं आपलीं घरें स्वत:च्या हातांनीं बांधलीं आणि आपलें व आपल्या कुटुंबाचें अन्न हि स्वत: उत्पादन केलें तर कोणीं सांगावें मनुष्यांतली काव्यशक्ति जागृत होऊन ते पक्ष्या-प्रमाणें गाऊं लागणार नाहींत म्हणून ? पण अरेरे ! आपलीं अंडीं दुसऱ्याच्या घरट्यांत ठेवून दुसऱ्याकडून त्यांची जोपासना करणाऱ्या Cowbird आणि कोकिळा यांची च बेसूर किलबिल आम्हांला आवडते. गृहनिर्मितीचा आनंद आपण धंदेवाईक सुताराला कायमचा च देऊन टाकावा काय ? श्रमविभागाचे तत्त्वाला हि कोठें शेवट आहे कीं नाहीं ? आणि त्यापासून अखेरीस निष्पन्न तरी काय होतें ? दुसऱ्यानें माझ्यासंबंधीं विचार करावा याबद्दल माझी हरकत नाहीं पण तो तज्ज्ञ माझ्याविषयीं विचार करीत आहे म्हणून मीं स्वत:संबंधीं कांहीं विचार च करितां कामा नये हें मात्र मुळीं च योग्य नाहीं.

## ७ घराचें खरें सौंदर्य

बाह्य सौंदर्याविषयीं लिहितांना माझ्या माहितींतल्या एका आर्कि-टेक्टची मला आठवण होते. त्याचें म्हणणें असें कीं, घर सजविण्यांत सत्याचा अंश आवश्यक आहे. त्याचें म्हणणें त्याच्या दृष्टीनें बरोबर असेल पण मला त्यांत विशेष वाटत नाहीं. कारण घराची शोभा सजविण्यास त्यानें कार्निसपासून सुरुवात केली, पायापासून नाहीं. खरें म्हणजे घरांत राहणाऱ्याच्या अंतर्बाह्य वागणुकीनें च घराचें अंतर्बाह्य सौंदर्य खुलणार

आहे. कलाकुसर ही बाहेरून आणून घालावयाची वस्तु आहे असें कोणत्या शहाण्या माणसाला वाटेल बरें ? ब्रॉडवेच्या नागरिकांनीं ट्रिनिटी चर्च बांधायचें कंत्राट दिलें त्याप्रमाणें कासवानें आपली ठिपकेदार पाठ किंवा मोतीमाशानें आपलें मोत्यांचें आवरण कोणाला कंत्राट देऊन का बनवून घेतलें ? कासवाला ज्याप्रमाणें आपल्या पाठीवरच्या ठिपक्यांची चिंता करावी लागत नाहीं त्याप्रमाणें माणसानें हि आपल्या घराचें आर्किटेक्चर म्हणजे बाह्यसौंदर्य व कलाकुसर कोणत्या स्टाईलची असावी याची चिंता करूं नये. शूर शिपायाला आपल्या शौर्याचा रंग निशाणावर लावून त्याची जाहिरात करावी लागत नाहीं. त्याच्या शत्रूला त्याची खरी पारख होते. नाहीं तर परीक्षेची वेळ येईल त्या वेळीं तो रंग फिका पडून जाईल. खरें कलाकुसरीचें जें सौंदर्य घराला प्राप्त होतें तें घरांत राहणाऱ्या व्यक्तींच्या थोर व उदार आचरणानें हळू हळू विकसित होतें. पण तें लोकांना कसें दिसेल याची चिंता त्यांच्या मनांत हि कधीं आलेली असत नाहीं. बहुतेक कलाकुसर ही कित्येक वेळां अक्षरशः पोकळ किंवा बाहेरून डकवलेली तकलुपी असते. जरा सोसाट्याचा वारा आला कीं ती मोडून पडते. मागून आणलेलीं मोराचीं पिसें गळून पडलीं म्हणून डोमकावळ्याच्या शरीराला कांहीं इजा होत नाहीं, त्याप्रमाणें या कार्निसी मोडून गेल्यामुळें मुख्य घराला कांहीं धक्का लागत नाहीं. चर्च किंवा मंदिर बांधणारे आर्किटेक्ट त्याची कार्नीस किंवा गलथा कसा असावा याचा जेवढा ऊहापोह करीत बसतात तेवढी चिकित्सा वाङ्मयांत कोणते अलंकार असावे, धर्मशास्त्रग्रंथ-नीतिग्रंथ लिहिण्यांत कोणती काळजी घ्यावी याबद्दल विचार करतील तर अधिक बरें नाहीं का होणार ? खरोखर पाहतां माणसाच्या झोपडीच्या चिवाट्या उभ्या मारल्या काय किंवा आडव्या मारल्या काय, किंवा त्याला ठेवावयाच्या पेटिकेचा

रंग कसला हि दिला तर बिघडलें कोठें? त्या चिवाऱ्या त्यानें स्वत: काळजीपूर्वक मारल्या आणि रंग हि आस्थापूर्वक दिला तर त्यांत कांहीं तरी अर्थ आहे. पण घरांत राहणाऱ्याच्या जीवांत च जर कांहीं चैतन्य नसेल तर घर बांधणें हें ' कॉफिन ' म्हणजे ' शवपेटिका ' बनवण्यासारखें वा समाधीवरची कुसर घडविण्यासारखें आहे. असलें निर्जीव काम करणाऱ्या सुताराला सुतार म्हणण्यापेक्षां शवपेटिका बनविणारा म्हणणें अधिक शोभेल. कार्पेंटर म्हणजे कॉफिन मेकर. जीवनांत उदास, निराश झालेला एक माणूस म्हणतो, " कोठें रंगाची यातायात करतां ! पायांखालची मूठभर माती घेऊन सारवून टाका. " हें म्हणतांना त्याचें तें शेवटचें अरुंद लहान घर नव्हतें ना त्याला अभिप्रेत ? मग तेथें विश्रांति च विश्रांति. घर रंगवायला माती तरी कशाला ? तुमच्या वर्तनाचा रंग त्यावर चढूं द्या. तुमचें शौर्य किंवा लाज त्यावर उमटूं द्या.

हिवाळ्यापूर्वी चिमणी बांधून झाली. भिंतींच्या बाजू साफ करून सारवून टाकल्या. झाडांच्या साली काढून त्यांच्या कोरा रंध्यानें साफ करून त्या भिंतींवर बसवून टाकल्या. त्यामुळें घरांत पाऊस येण्याची भीति राहिली नाहीं. अशा प्रकारें पंधरा फूट लांब, दहा रुंद आणि खांबापाशीं आठ फूट उंच असें टुमदार घर तयार झालें. घराला एक माळा, एक कपाट, प्रत्येक भिंतींत एक मोठी खिडकी, दोन लहान आणि एक मोठें दार आणि त्याचे समोरच्या भिंतींत चुलवण होतें. मजुरीनें केलें जाणारें बहुतेक काम मीं स्वत:च केलें. तेव्हां तो खर्च सोडून फक्त वापरल्या गेलेल्या मालाची बाजारभावानें किंमत धरून खालीं दिलेल्या तपशिलाप्रमाणें खर्च आला. घराला खर्च किती लागतो हें फार थोड्यांना माहीत असतें. आणि वेगवेगळ्या आयटेमवर किती लागतें हें समजणारे विरळा च.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम (५६) ... वि: निबंध
क्रमांक ........ नों दि: १२-१०-६८

-: खर्चाचा तपशील :-

| | | डॉलर | सेंट |
|---|---|---|---|
| (१) | फळ्या ( विकत घेतलेल्या झोपडीच्या ) | ८ | ३॥ |
| (२) | छप्पर व भिंतींचे तक्ते | ४ | ० |
| (३) | कामऱ्या व रिपा | १ | २५ |
| (४) | कांचेच्या दोन खिडक्या ( सेकंडहँड ) | २ | ४३ |
| (५) | जुन्या विटा १ हजार | ४ | ० |
| (६) | चुन्याचीं पिंपें २ नग | २ | ४० |
| (७) | गिलाव्याकरितां उंटाचे केस व गवत | ० | ३१ |
| (८) | शेगडीची जाळी | ० | १५ |
| (९) | खिळे मोळे | ३ | ९० |
| (१०) | स्क्रू व बिजागऱ्या | ० | १४ |
| (११) | कडी कोयंडा | ० | १० |
| (१२) | चॉक चुना | ० | १ |
| (१३) | वाहतूक (बराच माल मींच वाहिला तो सोडून) | १ | ४० |
| | एकूण | २८ | १२॥ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ०२८४

वरील मालांत लाकडें, दगड आणि वाळू यांचा समावेश नाहीं. ही सार्वजनिक जागा ज्या हक्कानें मी वापरूं लागलों त्या च दडपेगिरीच्या (Squatter) अधिकारांत या वस्तू हि मीं जंगलांतून मोफत घेतल्या. घर बांधून उरलेल्या लाकडांतून जळणाकरितां एक लहानशी झोपडी हि बांधली. आतां माझ्या मनांत येईल त्या वेळीं शहरांतल्या मुख्य राजमार्गावरील मुख्य ऐषआरामी घराला हि मागें सारील असें एक घर मी बांधणार आहें. त्याला खर्च मात्र यापेक्षां जास्त येणार नाहीं.

या माझ्या प्रयोगावरून मला असें आढळून आलें कीं विद्यार्थि

आपल्या खोलीकरितां दरवर्षी जेवढें भाडें भरतो तेवढ्यांत त्याला जन्मभर पुरेल असें कायमचें घर मिळूं शकेल. मी ही उगाच प्रौढी मिरवितों आहें असें कोणाला वाटेल. पण माझी ही सारी बडबड माझ्या स्वत:करितां नसून मनुष्यमात्राच्या हिताकरितां आहे. माझ्यांत दोष किंवा विसंगतपणा असेल पण त्यामुळें माझ्या विधानाच्या खरेपणाला बाध येत नाहीं. माझ्यांत मानभावीपणा व ढोंग पुष्कळ आहे हें मला माहीत आहे. त्याबद्दल मला वाईट हि वाटतें. पण माझ्यांतील चांगुलपणापासून तें मला वेगळें काढतां येत नाहीं. म्हणून ज्या बाबतींत मला अनुभव आहे व जें लोकांच्या कल्याणाचें आहे याची मला खात्री आहे त्या बाबतींत विनयामुळें किंवा भिडस्तपणामुळें सत्य कधीं दडपून टाकायचें नाहीं असा माझा निश्चय आहे. सत्याकरितां मला किती हि त्रास सोसावा लागला तरी तो सोसायची माझी तयारी आहे. केंब्रिज कॉलेजच्या वसतिगृहांतली खोली माझ्या खोलीपेक्षां थोडीशी च मोठी आहे. पण तिचें वर्षाचें भाडें तीस डॉलर आहे. शिवाय गजबजीच्या शेजाराचा त्रास आणि खोली एखादे वेळीं चौथ्या मजल्यावरची मिळावयाची ! आपण जर या बाबतींत थोडा शहाणपणा वापरला तर शिक्षणाला असा जवळ जवळ कांहीं खर्च च पडूं नये.

## ८ शरीरश्रमांतून शिक्षण

ओघानें आलें आहे म्हणून शिक्षणाबद्दल थोडें लिहितों. विद्यार्थ्यांनीं जर माझ्याप्रमणें स्वत: शरीरकष्ट व उद्योग केला तर त्यांचें शिक्षण सहज होऊन जाईल कारण या उद्योगांतून त्यांना आधीं च कितीतरी ज्ञान मिळालेलें असेल आणि त्यामुळें शिक्षणाकरितां करावा लागणारा खर्च किती तरी प्रमाणांत कमी येईल. केंब्रिजमध्यें किंवा तशा दुसऱ्या ठिकाणीं ज्या सुखसोई असतात त्यांकरितां त्याला किंवा

त्याच्याकरितां दुसऱ्या कोणाला जो खर्च करावा लागतो तो योग्य प्रकारें व्यवस्थितपणें केला तर आतांच्या खर्चाच्या दहाव्या हिश्शांत भागून जाईल. ज्या गोष्टींकरितां पैशाची मागणी होते त्यांची विद्यार्थ्याला मुळीं च गरज नसते. उदाहरणार्थ टयूशन फी म्हणजे शिक्षणाची फी ही एक मोठी खर्चाची बाब आहे पण त्यापासून त्याला अगदीं च अल्प लाभ होतो. थोरांमोठ्यांची संगत लाभते, त्याबदल त्याला कांहीं च द्यावें लागत नाहीं. कॉलेज स्थापन करायची सध्यांची रीत अशी आहे कीं प्रथम वर्गणी गोळा करायची व मग श्रमविभागाच्या तत्त्वाला अनुसरून कोणा कंत्राटदाराला इमारतीचें काम देऊन टाकावयाचें. वस्तुत: श्रमविभागाचें तत्त्व फार विचारपूर्वक सावधगिरीनें च वापरलें पाहिजे. तो कंत्राटदार दरिद्री भुकेबंगाल बिगारी गोळा करून कॉलेजचा पाया भरतो, आणि त्या वेळीं त्या कॉलेजांत प्रवेश मिळविण्याची तयारी विद्यार्थि दुसरीकडे कोठें करीत असतो म्हणे! या विचित्रपणाचा परिणाम पिढ्यानुपिढ्या भोगावा लागतो. माझ्या मतें विद्यार्थ्यांनीं किंवा त्या कॉलेजपासून जे कोणी लाभ घेऊं इच्छितात त्यांनीं स्वत: च कॉलेजचा पाया भरला तर अधिक बरें असें मला वाटतें. जीवनाला आवश्यक असणारे परिश्रम पद्धतशीरपणें टाळून जी फुरसद आणि कामांतून सुटका विद्यार्थ्याला लाभते ती अगदीं अधम व नीचपणाची असते. लगेच एकजण विचारतो, 'म्हणजे विद्यार्थ्यांनीं डोक्याचें बौद्धिक काम सोडून हातानें काम करावें कीं काय?' माझें अगदीं तसें म्हणणें नाहीं; पण जवळ जवळ तसें च आहे. मी तर ठामपणें असें म्हणतों कीं विद्यार्थ्यांच्या खर्चिक खेळाचा बोजा समाज उचलीत असतांना त्यांनीं आपल्या जीवनाचा खेळ करूं नये किंवा नुसतें त्याचें संशोधन करीत बसूं नये. तर आरंभापासून अखेरपर्यंत तें आस्थापूर्वक जगावें. पाण्यांत पडल्याशिवाय जसें

पोहायला येणार नाहीं तसें जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला त्यांनीं ताबडतोब सुरुवात केली नाहीं तर त्यांना जीवन म्हणजे काय समजणार तरी कसें? आणि त्यांत सुधारणा तरी ते कसे करणार? एखाद्या विद्यार्थ्याला आर्ट किंवा सायन्स म्हणजे कला किंवा विज्ञान खरोखर शिकावयाचें असेल तर त्याला रूढ मार्गाप्रमाणें कांहीं मी त्याला कॉलेजांत पाठविणार नाहीं. कारण तेथें जीवनाच्या कलेशिवाय इतर गोष्टींचा च आचार-विचार-प्रचार चालतो! ते दुर्बिणींतून किंवा सूक्ष्मदर्शक यंत्रांतून जगाचें निरीक्षण करूं पाहतील, पण साध्या डोळ्यानें आजूबाजूला जवळ असणाऱ्या वस्तू कांहीं त्यांना दिसत नाहींत आणि तें पाहणार हि नाहींत. रसायनशास्त्राचा अभ्यास करतील पण भाकरी कशी करावी हें त्यांना येणार नाहीं; मेक्यानिक्स शिकतील पण भाकरी कशी मिळते हें कांहीं त्यांना समजणार नाहीं. नेपच्यूनच्या भोंवतीं फिरणाऱ्या उपग्रहांचा ते शोध करतील पण ते स्वतः कोणत्या सोद्याच्या भोंवतीं लाळघोटेपणा करीत फिरत आहेत हें त्यांना दिसणार नाहीं. आंबेच्या एका थेंबामधें किती भयंकर जंतू—बॅक्टिरिया—आहेत हें ते पहात बसतील पण स्वतः त्यांच्याभोंवतीं किती भयंकर राक्षस त्यांचा ग्रास करून टाकायला जमले आहेत हें त्यांना दिसत नाहीं. एका विद्यार्थ्यानें अशोधित धातू आटवून शुद्ध करून त्याकरितां जरूर लागतील तेवढीं त्या विषयांचीं पुस्तकें वाचून आपला चाकू तयार केला आणि दुसऱ्यानें कॉलेजमधें मेटालर्जीच्या पुस्तकांची घोकंपट्टी करून चाकू कसा करावा याची परीक्षा दिली; मात्र बापाच्या पैशांतून रॉजर कंपनीचा चाकू विकत घेतला आणि असा आयता मिळाल्यामुळें तो वापरण्याची हि अक्कल आली नाहीं म्हणून बोट हि कापून घेतलें. या दोन विद्यार्थ्यांपैकीं अधिक शिक्षित, अधिक ज्ञानवान कोण? मीं कॉलेज सोडलें तेव्हां मला नॅव्हिगेशनची म्हणजे नौकानयन विद्येची पदवी

मिळाली. पदवी देणारांचें मला कौतुक वाटलें. या पुस्तकी ज्ञानापेक्षां बंदरावर एक चक्कर टाकली असती तर मला नौकानयनाचें किती तरी अधिक ज्ञान मिळालें असतें. अर्थहीन गरीब विद्यार्थि अभ्यास करतो आणि त्याला शिकवितात म्हणे अर्थशास्त्र ! पण जीवनाचें शास्त्र–याला च दुसरें नांव अध्यात्मज्ञान किंवा तत्त्वज्ञान आहे–शिकवण्याचा ते दावा हि करूं शकत नाहींत. परिणाम असा होतो कीं विद्यार्थी कॉलेजमधें ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, से (Say) यांच्या संपत्तिशास्त्राचे धडे पाठ करीत असतो आणि त्या पायीं तिकडे त्याच्या बापाच्या डोक्यावर असह्य कर्जाचा डोंगर चढत असतो.

## ९ यांत्रिक सुधारणांतील पोंचटपणा

या कॉलेज शिक्षणासारखी च आधुनिक सुधारणांची गोष्ट आहे. या सुधारणेनें खरी प्रगति होत नाहीं पण झाल्याचा भ्रम मात्र निर्माण होतो. त्यांच्या निर्मितीमधें सैतानाचें भांडवल फार मोठें असतें आणि जरूर तसें पुढें हि तो आणखी गुंतवीत असतो. मात्र तें चक्रवाढ-व्याजासह वसूल केल्याशिवाय तो राहत नाहीं. आमचे नवीन शोध वयानें वाढलेल्या मुलांचीं सुंदरशीं खेळणीं च असतात. त्यांच्यामुळें महत्त्वाच्या गंभीर वास्तविक विषयापासून माणसाचें मन विचलित होतें एवढा च त्याचा उपयोग. अध:पतन हें काय अवघड ध्येय आहे ? डोंगरावरून नुसतें अंग सोडून दिलें तर घरंगळत खालीं पोंचायला होईल. यापेक्षां जास्ती श्रमाची आवश्यकता नाहीं. असलें सोपें न सुधारलेलें ध्येय साध्य करण्याचें सुधारलेलें साधन यापेक्षां त्याची जास्त किंमत नाहीं. ‘ मेन ’ शहरापासून ‘ टेक्सास ’ शहराला जोडणारी तारायंत्राची लाईन तयार करण्याची आपल्याला कोण गडबड ! पण या दोन शहरांना एकमेकांना कांहीं सांगायसारखें

महत्त्वाचें कांहीं च असणार नाहीं. एका सुप्रसिद्ध थोर बहिऱ्या स्त्रीची ओळख करून घ्यावी म्हणून एक गृहस्थ कोण आतुर झाले होते. आणि दैवयोगानें त्यांना तशी संधि मिळाली पण तिच्या कानांतली नळी जेव्हां त्यांच्या हातांत दिली तेव्हां तिच्याशीं बोलायचें तरी काय अशी त्यांना पंचाईत पडली. तशी स्थिति या दोन शहरांची व्हावयाची. अटलांटिक समुद्राखालून बोगदा बांधून युरोपचा प्रवास कांहीं आठवड्यांनीं कमी करण्याची आमची खटपट आहे. पण एवढ्या खटाटोपानंतर युरोपमधून पहिलें महत्त्वाचें वृत्त ऐकायला येईल तें म्हणजे राजकन्या ॲडेलेडला डांग्या खोकला झाला आहे ही ! जलद धावणाऱ्या स्वाराजवळ कांहीं महत्त्वाची बातमी असते च असें नाहीं.

एकजण मला म्हणाला, ‘ तुम्हांला प्रवास करणें आवडतें. थोडे पैसे सांठवून देश पाहण्याकरितां आगगाडीनें फिचबर्ग शहराला कां जात नाहीं ? ’ पण आगगाडीने प्रवास करण्याइतका कांहीं मी खुळा नाहीं. मला अनुभवानें असें समजून चुकलें आहे कीं पायीं प्रवास करणारा माणूस च सर्वांच्या पुढें जातो. मी मित्राला म्हणालों, ‘ आपण कोण आधीं जातो त्याची पैज लावूं. फिचबर्गचें येथून अंतर आहे तीस मैल गाडीचें भाडें आहे नव्वद सेंट, म्हणजे एक ते दीड दिवसाची मजुरी. या रस्त्यावर काम करणाऱ्यांची मजुरी साठ सेंट च होती असें मला आठवतें. मी सकाळीं निघालों तर रात्र पडण्यापूर्वीं तेथें पोचेन. मी या वेगानें आठवडेन् आठवडे चाललों आहें. एवढ्या वेळांत सारा दिवस राबल्यावर तुला भाड्यापुरते पैसे मिळणार अन् वेळेवर गाडी मिळाली तर रात्रीं, नाहीं तर दुसरे दिवशीं तूं तेथें पोचणार आणि तें हि नशिबानें काम मिळालें तर ! आणि एखादे वेळीं असें हि होईल कीं पतकरलेलें काम वेळेवर पुरें झालें नाहीं तर फिचबर्गला जाण्याऐवजीं

येथेंच राबत असलेला तूं दिसशील. आणि याप्रमाणें रेल्वे गाडी जरी सर्व पृथ्वीभोंवतीं फिरलेली असली तरी पायानें मी नेहमीं तुझ्या पुढें च असणार. आणि देश पहायचा आणि अनुभव घ्यायचा म्हटलें तर तुझी संगत च मला सोडून दिली पाहिजे. कारण चालत जाणाराला जी सृष्टिशोभा दिसेल व जो अनुभव मिळेल तो आगगाडीनें प्रवास करणाराला कधीं च मिळणार नाहीं.'

सर्व मनुष्यामात्राला आगगाडीचा उपयोग करितां येईल अशी रेल्वे बांधावयाची म्हणजे पृथ्वीचा सारा च पृष्ठभाग सपाट केला पाहिजे. लोकांची अशी भोळी समजूत झालेली दिसते कीं कंपनी काढली व तिनें भरावाचें काम सुरू केलें कीं अखेरीला सर्वांना आगगाडीनें अगदीं जलद आणि जवळ जवळ फुकट च कोठें तरी जायला मिळेल. पण सध्यां काय स्थिति आहे ? लोक स्टेशनवर गर्दी करून उभे आहेत. गर्दींतून गाडींत घुसायचा प्रयत्न करीत आहेत. गार्ड सिग्नल देतो. ड्रायव्हर शिटी देऊन गाडी चालू करितो. त्या वेळीं काय आढळून येतें ? कांहीं थोड्यांना मात्र आंत जागा मिळाली आहे आणि बाकीचे बिचारे गाडीखालीं सांपडून खलास झाले आहेत. 'अरेरे ! दुर्दैवी घटना !' एवढे उद्‌गार काढून जनता तें सारें विसरून जाईल. बाकीचे कांहीं बिचारे गाडी निघून गेलेली पाहत उभे राहिलेले दिसतील. हें प्रत्यक्ष दृश्य पहावयास मिळतें च, पण ज्यांनीं आगगाडी पाहिलेली नाहीं पण तिच्यांतून प्रवास करण्याची ईर्षा मात्र धरली असे किती तरी लोक बिचारे प्रवासाचें भाडें सांठविण्याकरितां कोठें तरी जन्मभर मरेमरेतों काम करीत मरून च गेले असतील. ज्यांनीं रेल्वेचें भाडें देण्याइतके पैसे सांठविले असतील अशा कांहीं थोड्यांना रेल्वेचा प्रवास घडेल यांत शंका नाहीं; पण तोंपर्यंत त्यांची प्रवास करण्याची उमेद च बहुधा संपुष्टांत आलेली

असेल. ऐन उमेदीच्या काळांत पैसा सांठविण्याकरितां मरमर मरावयाचें. कां? तर म्हणे म्हातारपणीं म्हणजे आयुष्याच्या अगदीं निरुपयोगी काळीं कामांतून सुटका मिळावी म्हणून. यावरून मला एका इंग्रजाची आठवण होते. कवीसारखें स्वच्छंदी जीवन जगतां यावें म्हणून तो हिंदुस्थानांत नोकरी धरून गेला. पारतंत्र्य स्वीकारून का स्वातंत्र्य लाभतें? तो त्या नोकरींत कायमचा च जखडला गेला. त्याला खरोखर कवि व्हावयाचें होतें, तर त्यानें स्फूर्ति आल्याबरोबर कसला हि विचार न करितां तिसऱ्या मजल्यावरील अडगळीची जागा कां होईना पण एकान्ताची जागा गांठायला पाहिजे होती. रेल्वेच्या कडेनें झोपड्या बांधून राहिलेले रेल्वेवर काम करणारे आयरिश कामकरी या माझ्या रेल्वेच्या निंदेमुळें ओरडून म्हणतील, 'ही आम्हीं जी रेल्वे बांधली ती वाईट वस्तु आहे कीं काय?' मी त्यांना उत्तर देईन, 'या हि पेक्षां कांहीं भलतें वाईट करून ठेवलें असतें त्या मानानें पाहतां वरी आहे. पण तुम्ही माझे बांधव आहां, त्यामुळें मला आपलें वाटतें कीं तुम्ही जे या मातींत खणीत बसलां आहां त्यापेक्षां कांहीं अधिक चांगल्या उद्योगांत तुम्हांला आपला वेळ घालवितां आला असता.'

## १० माझी शेती

माझें घर बांधून पुरें होण्यापूर्वीं च रोजच्या अन्नखर्चाशिवाय इतर कामाला लागणारे दहा बारा डॉलर माझ्या हातून सहज होण्यासारख्या प्रामाणिक मार्गानें मिळवावे म्हणून मी झोपडीजवळच्या सुमारें अडीच एकर जमिनींत मुख्यतः घेवडा, कांहीं बटाटे, वाटाणे आणि कलिंगडें लावलीं. ती जमीन अगदीं हलकी, रेताड होती. तो सर्व प्लॉट अकरा एकरांचा आहे. त्यांत मुख्यतः पाइन व हिकरीचीं झाडें उगवतात. आणि गेल्या मोसममधें दर एकरीं आठ डॉलर व आठ सेंट या दरानें

त्यांतील कांहीं भाग विकला हि गेला होता. एक शेतकरी म्हणाला होता, ' ही अगदीं च निकामी जमीन आहे. फक्त चिवचिवणाऱ्या खारोट्या मात्र त्यावर जगतील. ' तरी मीं त्यांत खत वगैरे घातलें नाहीं. कारण मी त्या शेताचा मालक नव्हतों. केवळ दडपेगिरीच्या हक्कानें तें मी वापरीत होतों आणि इतकें रान पुनः पेरण्याची इच्छा हि नव्हती म्हणून एकदां हि सबंध खांदलें नाहीं. नांगरतांना झाडाच्या मुळ्या कांहीं ठिकाणीं निघाल्या त्या पुष्कळ दिवस सरपणाला उपयोगी पडल्या, अशीं मुळें काढून टाकलेल्या ठिकाणीं जमीन अधिक सुपीक झाली आणि उन्हाळ्यांत पीक आलें त्या वेळीं या जागीं भरघोस पीक येऊन त्या जागा अगदीं उठून दिसत होत्या. माझ्या झोपडीच्या भोंवतीं विकला न जाण्यासारखा लाकूडफाटा होता. तसेंच तळ्यांत हि कांड्याकुड्या सांपडत तेवढ्यानें माझें जळणाचें काम भागलें. नांगरण्यासाठीं बैलजोडी मिळवावी लागली. पण नांगर मीं स्वतः धरला. शेतीच्या कामाकरितां आऊतें, बीं आणि मजुरी वगैरेकरितां १४ डॉलर ७२॥ सेंट खर्च आला. मक्याचें बीं फुकट मिळालें. आणि आपल्या जरूरीपेक्षां जास्त पेरायचें नसेल तर त्याला फार किंमत हि पडणार नाहीं. बारा मण घेवडा, अठरा मण बटाटे, कांहीं थोडे वाटाणे आणि मक्याचीं कणसें एवढें पीक पदरांत पडलें व शेतीचें उत्पन्न २३ डॉलर ४४ सेंट आलें. खर्च वजा जातां ८ डॉलर ७१॥ सेंट उरले. अशा परिश्रमानें होणारी आत्म्याची उन्नति, माझ्या प्रयोगाचा अल्प काळ आणि अस्थिरता वगैरे गोष्टी लक्षांत घेतल्या तर गांवांतल्या कोणत्या हि शेतकऱ्यापेक्षां हें पीक बरें झालें असें म्हणावयास हरकत नाहीं.

दुसऱ्या वर्षीं यापेक्षां प्रगति अधिक झाली कारण मला जरूर होती तेवढी म्हणजे सुमारें $\frac{1}{3}$ एकर जमीन मीं खांदून टाकली. या माझ्या दोन वर्षांच्या अनुभवानें मी कांहीं सिद्धान्त बसवले आहेत.

पहिला ठोकताळा असा कीं मनुष्याला स्वत:स लागेल एवढें च अन्नधान्य त्यानें पिकवलें, उगीच जास्त पिकवून तें विकून बिन-जरूरीच्या ऐषआरामी वस्तू जर त्यानें घेतल्या नाहींत, तर त्याला दोन चार गुंठ्यांपेक्षां जास्त जमीन लागत नाहीं. दुसरा असा कीं एवढी थोडी जमीन बैलांच्या वा घोड्यांच्या साहाय्यानें नांगरण्यापेक्षां स्वत: खांदणें चांगलें. एवढ्या जमिनींत उन्हाळ्यामध्यें सहज डाव्या हातानें देखील शेतांत काम केलें, राबलें तरी भागण्यासारखें आहे. अशा प्रकारें स्वत: काम केलें तर बैल, घोडा, गाय, डुकर अशा जनावरां-वर इतरांना जसें अवलंबून रहावें लागतें तसें त्याला राहवें लागणार नाहीं. चालू सामाजिक वा अर्थशास्त्रीय जीवन यशस्वी आहे कीं अयशस्वी याचा ऊहापोह करण्याकरितां कांहीं मी हें लिहीत नाहीं. माझ्या प्रयोगांतून उत्पन्न होणारे प्रश्न मी केवळ प्रांजलपणें अगदीं तटस्थतेनें मांडीत आहें. गांवांतील कोणा हि शेतकऱ्यापेक्षां मी पूर्ण स्वतंत्र होतों. घर किंवा गोठा कशाचें च मला बंधन नव्हतें. माझ्या बुद्धीप्रमाणें—जी मोठी विचित्र आहे—वागण्यास मी मोकळा होतों. माझें घर जळून गेलें असतें किंवा पीक बुडालें असतें तरी माझें कांहीं च बिघडलें नसतें. कारण सुरुवातीस माझेजवळ कांहीं च नव्हतें त्यापेक्षां कांहीं माझी संपत्ति कमी झाली नसती. हा त्यांच्या-पेक्षां माझा विशेष आहे.

## ११ माणूस म्हणजे जनावरांचा नोकर

मला आपलें नेहमीं वाटतें कीं माणसें जनावरांना बाळगीत नाहींत तर जनावरें माणसांना बाळगतात. कारण जनावरें माणसांपेक्षां अधिक स्वतंत्र असतात. माणसें बैलांची सेवा करितात आणि बैल माणसांना उपयोगी पडतात. म्हणजे माणसें व बैल एकमेकांकरितां राबतात.

पण केवळ जरूरीच्या वस्तूंचा म्हणजे दोघांना लागणाऱ्या अन्नाचा विचार केला तर माणसाच्या धान्याकरितां जितकें शेत लागतें त्यापेक्षां कितीतरी जास्ती बैलाच्या गवताकरितां लागतें. तेव्हां बैला-पेक्षां माणूस च त्याच्याकरितां अधिक राबत नाहीं काय? बैलाकरितां गवत कापून आणावयाचें हें कांहीं कमी कष्टाचें नाहीं. साधा राहणारा देश म्हणजे तत्त्वज्ञांचें राष्ट्र जनावरांचे श्रम उपयोगांत आणण्याची भयंकर चूक कधीं च करणार नाहीं. केवळ तत्त्वज्ञानी च ज्याचे रहिवासी असतील असा देश कोठें पूर्वीं असल्याचें ऐकिवांत नाहीं व पुढें हि थोड्या काळांत होण्याचा संभव नाहीं. आणि तसा असणें चांगलें कीं वाईट याविषयीं हि माझी खात्री नाहीं. पण मीं स्वतः मात्र कामाकरितां बैल किंवा घोडा माणसाळून त्याला कामाला जुंपलें नसतें. नाहीं तर घोडेवाला, मोतद्दार किंवा धनगर यांच्याइतका अज्ञानी बनून गेलों असतों. बैल-घोड्यांच्या साहाय्यानें समाजाचा फायदा झाला आहे असें समजतात. पण एकाचा फायदा तें दुसऱ्याचें नुकसान नाहीं अशी आपली खात्री आहे काय? घोड्यावर स्वार होणाऱ्या मालकाला घोड्यापासून समाधान असतें, तसें त्याला खरारा करणाऱ्या मोतद्दाराला असतें काय? कांहीं मोठीं सार्वजनिक कामें जनावरांच्या मदतीशिवाय झालीं नसतीं हें मी मान्य करितों, आणि जनावरांच्या त्या कर्तबगारीबद्दल माणसानें हि फुशारकी मिरवावी. पण यावरून माणसानें यापेक्षां अधिक उच्च कामें केलीं नसतीं किंवा तो करूं शकला नसता हें कसें सिद्ध होतें? माणसें जेव्हां जनावरांच्या मदतीनें बिनजरूरीचीं, कारागिरीचीं, ऐषआरामी रिकामपणचीं कामें करून घेऊं लागलीं तेव्हां कांहीं थोड्या च लोकांनीं हीं जनावरांचीं कामें करणें अपरिहार्य झालें. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे अधिक बलवान माणसांचे ते गुलाम बनले. या प्रकारें माणूस

आपल्यांत जी पशुवृत्ति आहे तिच्यासाठीं राबतो एवढें च नाहीं तर त्याचें प्रतीक म्हणून प्रत्यक्ष पशूसाठीं हि राबतो. शेतकऱ्याची सुबत्ता त्याच्या मजबूत वाड्यावरून मोजली जात नाहीं, तर त्याच्याजवळ गुरें किती आहेत आणि त्याचें कोठार किती मोठें आहे यावरून गणली जाते.

## १२ माणुसकीवरील प्रचंड थडगीं

या आपल्या कंकार्ड शहरांत बैल, गाई, घोडे यांच्याकरितां मोठाले गोठे आहेत. सार्वजनिक इमारतींत हि तें मागें नाहीं. पण स्वतंत्र आचारविचारांना मात्र तेथें स्थान नाहीं ! जगांत आपलें नांव गाजविण्याकरितां सुंदर, भव्य कारागिरीच्या इमारती बांधणें च आवश्यक आहे काय ? आपल्या गहन थोर विचारसंपदेनें राष्ट्राचें नांव अधिक उज्ज्वल होत नाहीं काय ? भव्य, उंच व सुंदर नक्षीच्या गगनचुंबी गोपुरांमुळें हिंदुस्थानचें नांव जगांत प्रख्यात झालें कीं भगवद्गीतेमुळें ? मनोरे आणि मंदिरें विलासी राजांच्या चैनींतून निर्माण होतात. पण निरपेक्ष माणूस राजाच्या हुकुमाप्रमाणें नाचणार नाहीं कीं बादशहाचा किंवा त्याच्या सोन्यारुप्यासारख्या भौतिक संपत्तीचा आश्रित होऊन राहणार नाहीं. तो स्वतंत्र च राहील. घडविलेल्या दगडाच्या अनंत राशीनें आपला लौकिक वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें राष्ट्रें हि झपाटलीं जातात. पण त्यापेक्षां आपलें वर्तन मधुर, सभ्य व विनयसंपन्न करण्यांत इतके च श्रम घेशील तर अधिक बरें होणार नाहीं काय ? चंद्राला किंवा आकाशाला भिडणाऱ्या भव्य स्मारकांपेक्षां एखादी च खरी शहाणपणाची गोष्ट अधिक संस्मरणीय नाहीं काय ? उकरून काढून घडवून दुसरीकडे कोठें तरी बसविलेल्या दगडापेक्षां आपल्या नैसर्गिक जागीं असलेला दगड मला अधिक सुंदर

दिसतो. थीब्सच्या मंदिराची भव्यता मला अगदीं च अडाणीपणाची वाटते. खऱ्या जीवनापासून दूर गेलेल्या थीबच्या शंभर दारांच्या स्मारकापेक्षां एका प्रामाणिक सज्जनाच्या शेताभोंवतीं लहानशी कुंपणाची भिंत बांधणें अधिक सुज्ञपणाचें आहे. रानटी अधर्मी असंस्कृत लोक वैभवशाली इमारती उभारतात. खऱ्या धर्माला त्यांची जरूरी नाहीं. जीं राष्ट्रें अहंकाराचें प्रदर्शन करण्याकरितां दगड घडवीत बसतात त्यांची समाधि बांधायला मात्र ते उपयोगी पडतात. त्या दगडांच्या खालीं राष्ट्र गाडलें जातें. पिरामिडच्या भव्यतेचें मला कधीं च आश्चर्य वाटलें नाहीं. पण एका महत्त्वाकांक्षी शुंभाची कबर बांधण्याकरितां इतके लोक जन्म-जन्मभर राबण्याइतके अवनत कसे झाले याचें मात्र मला आश्चर्य वाटतें ! यापेक्षां त्याला नाईल नदीमध्यें बुडवून त्याचें प्रेत कोल्ह्यांकुत्र्यांना खायला टाकलें असतें तर तें अधिक मर्दपणाचें व शहाणपणाचें काम झालें असतें. इजिप्तमधील मंदिर बांधणारांची धर्मबुद्धि असो किंवा अमेरिकेच्या सरकारी बँक बांधणारांची कलाप्रियता असो, दोन्हींचें मूळ एक च. तें म्हणजे पोकळ दिमाख किंवा अहंकाराचें प्रदर्शन आणि त्याच्या मदतीला अर्धपोटी लोकांची अन्नासाठीं धडपड. एका माणसानें जमिनींत भोंक पाडून थेट चीनपर्यंत जाण्याचा उद्योग आरंभला होता. तो सांगे कीं आपलें विवर इतक्या खोलपर्यंत गेलें आहे कीं चीनमधलीं भांडीं वाजल्याचा आवाज हि ऐकायला येऊं लागला आहे. या माणसाला वेड्यांत काढून आपण हंसतों पण उंच उंच मनोरे बांधून आकाशांत निघालेल्यांना काय म्हणावें ?

## १३ माझा स्वयंपाक व आहार

पण ही चर्चा सोडून माझ्या हकीकतेकडे वळूं. मला अनेक धंदे

येतात त्यांपैकीं सर्व्हेइंग, सुतारी किंवा केवळ रोजमजुरी कधीं कधीं करून मीं १३ डॉलर १४ सेंट कमाई केली. मी या झोपडींत सुमारें दोन वर्षें राहिलों पण तारीख चार जुलैपासून मार्च एक तारखेपर्यंत म्हणजे सुमारें आठ महिन्यांचा मीं हिशेब ठेवला आहे. या काळांत मला खालीं दिल्याप्रमाणें अन्नखर्च लागला. यांत माझ्या शेतांतले बटाटे, थोडीं मक्याचीं कणसें व घेवडा तसेंच त्या दिवशीं जें कांहीं घरीं शिल्लक होतें त्याचा समावेश नाहीं.

| | डॉलर सेंट | |
|---|---|---|
| तांदूळ | १ – ७३॥ | |
| मोलासीस किंवा गूळ | १ – ७३ | साखरेचा अगदीं स्वस्त प्रकार |
| राय मील | १ – ४ ३/४ | एक प्रकारचें धान्य |
| इंडियन मील | १ – ९९ ३/४ | रायपेक्षां स्वस्त धान्य |
| पोर्क ( डुकराचें मांस ) | ० – २२ | |
| आटा | ० – ८८ | पैसा व त्रास लक्षांत घेतां राय व इंडियन मीलपेक्षां महाग |
| साखर | ० – ८० | |
| लार्ड ( चरबी ) | ० – ६५ | |
| ॲपल फळें | ० – २५ | हें सर्व प्रयोगवजा होतें व ते सर्व प्रयोग फसले. |
| सुकीं फळें | ० – २२ | |
| रताळीं | ० – ११ | |
| एक भोंपळा | ० – ६ | |
| एक कलिंगड | ० – २ | |
| मीठ | ० – ३ | |
| एकूण | ८ – ७४ | |

होय ! माझ्या खाण्याकरितां मीं आठ डॉलर आणि चौऱ्याहत्तर सेंट फस्त केले. मी माझा हा अपराध इतक्या निर्लज्जपणें जाहीर केला नसता पण मला माहीत आहे कीं माझ्याइतके च माझे बहुतेक वाचक हि अपराधी आहेत. आणि त्यांचें कृत्य हि छापलें तर माझ्यापेक्षां कांहीं अधिक बरें दिसणारें नाहीं. दुसऱ्या वर्षीं मी कधीं एखादे वेळीं तळ्यांतले मासे पकडून आणीं. आणि एकदां तर माझ्या घेवड्याच्या शेतांत नासधूस करणाऱ्या रानकोंबड्याला हि पकडून त्याला गटम करून टाकलें ! त्याला कसला तरी वास येत होता; तरी त्या वेळीं खातांना बरें वाटलें ! तो खाण्यांत माझी प्रयोगाची हि दृष्टि होती. पण धंदेवाल्या खाटकानें जरी त्याला कापून पिसें वगैरे काढून अगदीं तयार करून आणला तरी खाण्यायोग्य हा पदार्थ नाहीं असें च मला आढळून आलें.

कपडे व इतर प्रासंगिक व नैमित्तिक खर्च या कालावधींत ८ डॉलर ४०$\frac{३}{४}$ सेंट लागला. अर्थात् यावरून कांहीं सिद्धान्त निघण्याजोगा नाहीं. तरी येथें नमूद करून ठेवतों. तेल व कांहीं घरगुती भांड्यांकरितां दोन डॉलर लागले. कांहीं दुरुस्ती व कपडे धुणें मीं बाहेरून करून घेतलें, त्यांचीं बिलें देणेचीं आहेत. तेवढीं वगळून माझा खर्च खालीलप्रमाणें झाला:—

| | डॉलर | सेंट |
|---|---|---|
| (१) घर | २८ | १२॥ |
| (२) शेतीचा खर्च ( १ वर्षाचा ) | १४ | ७२॥ |
| (३) जेवण ( ८ महिने ) | ८ | ७४ |
| (४) कपडे वगैरे | ८ | ४०$\frac{३}{४}$ |
| (५) तेल व कांहीं भांडीं | २ | ० |
| एकूण | ६१ | ९९$\frac{३}{४}$ |

एवढ्या च बाबींवर माणसाचा मुख्यतः खर्च होतो.

ज्यांना आपलें अन्न, वस्त्र कसें मिळवावें याची चिंता पडली आहे त्यांना उद्देशून मुख्यतः माझें हें लिखाण आहे. या तपशिलावरून त्यांना कांहीं उपयोग होईल अशी मी आशा करितों.

जमेच्या बाबी खालीलप्रमाणें आहेत.

| | डॉलर सेंट |
|---|---|
| (१) शेतीचें उत्पन्न, धान्य वगैरे विकून | २३–४४ |
| (२) मजुरीनें मिळालें तें | १३–३४ |
| एकूण | ३६–७८ |

हे वजा केले म्हणजे बाकी २५–२१$\frac{3}{4}$ उरतें. ही रक्कम माझ्या सुरुवातीच्या भांडवलाइतकी च जवळ जवळ आहे. पण एवढ्यांत मोकळा वेळ, स्वातंत्र्य, आरोग्य आणि मला वाटेल तितके दिवस राहतां येईल असें सोईस्कर घर एवढें मिळालें ! योजना ठरवून कांहीं मीं हे आंकडे गोळा केलेले नाहींत. असल्या आकस्मिक आंकड्यांवरून कांहीं च निष्कर्ष निघणार नाहीं असें कोणी म्हणतील. पण कांहीं अंशीं ते पूर्ण असल्यामुळें त्यांतून हि कांहीं थोडा बोध मिळेल असें मला वाटतें. ज्याबद्दल मीं कांहीं तरी श्रम केले नाहींत असें कांहीं हि फुकट मीं आणलें नाहीं.

वरच्या आंकड्यांवरून दिसून येईल कीं केवळ खाण्याकरितां मला आठवड्याला सत्तावीस सेंट म्हणजे सुमारें तेरा आणे रोख लागले. पुढें दोन वर्षे राय, इंडियन मील, बटाटे, तांदूळ, अगदीं थोडें खारें पोर्क, काकवी, मीठ आणि प्यायला पाणी एवढें च माझें जेवण होतें. मला हिंदी तत्त्वज्ञानाची गोडी आहे; तेव्हां फक्त तांदळावर च राहणें मला आवडलें असतें. मी या अवधींत केव्हां

केव्हां बाहेर जेवायास गेलों आहें असा कोणी आक्षेप काढतील. पण याप्रमाणें पूर्वीं हि जात असें व पुढें हि जाण्याचा संभव आहे. पण या परान्नानें कांहीं फायदा न होतां माझ्या नेहमींच्या गृहव्यवस्थेंत बिघाड च झाला आहे. मी असा बाहेर जेवणास जाणें ही नेहमींची च परिस्थिति असल्यामुळें या तुलनेला कांहीं बाध येत नाहीं.

या दोन वर्षांच्या अनुभवानें मला असें आढळून आलें आहे कीं मनुष्याला केवळ जरूर तेवढें अन्न मिळविण्याला फार च थोडे कष्ट पडतात. आणि साधें व गरिबीचें अन्न खाऊन हि माणूस आपलें आरोग्य आणि शक्ति उत्तम ठेवूं शकतो. माझ्या शेतांत आपोआप उगवलेला घोळीचा ( Portulaca oleracea ) पाला उकडून थोडें मीठ घालून बनविलेली भाजी अनेक दृष्टींनीं समाधानकारक आहे असें मला आढळून आलें आहे. तो कांहीं तरी मोठा पदार्थ दिसावा म्हणून मुद्दाम च मीं त्या भाजीचें लॅटिन म्हणजे शास्त्रीय नांव दिलें आहे. मक्याचीं कणसें थोडा पाला ठेवून उकडलीं व थोडें मीठ घालून भरपूर खायला मिळालीं तर समंजस माणसाला आणखी काय लागेल ? मीं जेवणांत जे कांहीं विविध प्रकार केले ते शरीराला जरूर म्हणून केले नाहींत तर जिभेचे चोचले पुरविण्याकरितां केले आणि परिस्थिति अशी झाली आहे कीं माणसें जरूरीच्या वस्तू मिळत नाहींत म्हणून नव्हे तर चैनीच्या वस्तू मिळत नाहींत म्हणून उपाशी राहतात. आपल्या मुलाला प्यायला दारू मिळाली नाहीं त्यामुळें तो मेला असें च माझ्या एका ओळखीच्या बाईला वाटतें.

मी या विषयाचें प्रतिपादन आहारशास्त्राच्या दृष्टीनें करीत नसून काटकसरीच्या, स्वावलंबनाच्या दृष्टींनें करीत आहें ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत आली च असेल. तेव्हां कोणाला जर माझ्यासारखे अल्पाहाराचे

प्रयोग करायचे असतील तर त्यानें मात्र आपल्या फडताळांत खाण्याचे पदार्थ आधीं भरपूर भरून ठेवून मग च हें धाडस करावें !

फक्त इंडियन मीलची मीठ घालून मी ब्रेड बनवीं. घर बांधतांना लाकडाच्या काटक्या राहिल्या होत्या, त्यांच्या टोकावर थापून घराबाहेर च विस्तव पेटवून त्यावर ब्रेड भाजून काढीत असें. अशा भाजतांना त्या बहुधा धुरकटत आणि पाइन झाडाचा त्यांना वास हि लागे. आस्याच्या ब्रेड बनवून पाहिल्या पण राय आणि इंडियन मील यांच्या मिश्रणाच्या भाकरी अधिक चवदार होतात असें मला आढळून आलें. थंडीच्या दिवसांत विस्तवाशेजारीं एकामागून एक लहान लहान ब्रेड भाजीत बसणें मोठें सुखाचें असे.

जे कांहीं आधारग्रंथ मिळाले ते पाहून या ब्रेड बनविण्याच्या पुरातन कलेचा मीं अभ्यास केला. ब्रेड बनविणें हा माणसाचा पुरातन काळांतला फार मोठा शोध होय. या शोधापूर्वीं माणूस रानटी फळें व कच्चें मांस खाणारा जंगली प्राणी होता. या शोधामुळें तो सात्त्विक आणि सुसंस्कृत बनला. पुढें ब्रेडकरितां कालवून मळून ठेवलेलें पीठ चुकून तसें च राहिलें व आंबलें, निरुपायानें त्याची च ब्रेड करून पाहिली, त्यावरून यीस्ट म्हणजे आंबवण याचा शोध लागला. त्यानंतर माणसानें संशोधन करून त्यांत चांगली च प्रगति केली. आणि आतां युरोप-अमेरिकेंत यीस्ट-आंबवण म्हणजे ब्रेडचा जीव समजलें जातें. आणि तें अगदीं अग्निहोत्रासारखें धार्मिक बुद्धीनें संभाळलें जातें ! अमेरिकेंत आलेल्या पहिल्या वसाहतवाल्यांनीं मेफ्लॉवरहून जी पहिली आंबवणाची बाटली आणली तींतून अमेरिकेंत या यीस्टचा प्रसार झाला आणि तिचें महत्त्व सारखें वाढत च आहे. इतकें कीं आंबवणाशिवाय ब्रेड होणार च नाहीं अशी समजूत होऊन गेली आहे. त्यामुळें गांवांतून तें मी न चुकतां घेऊन येत असें. अखेर एके दिवशीं

वापरण्यांत चूक होऊन तें जळून गेलें. त्यामुळें त्याशिवाय च मला ब्रेड बनवावी लागली. या आकस्मिक गोष्टीनें आंबवणाची जरूरी नाहीं, त्याशिवाय हि ब्रेड बनूं शकते, हा परत शोध लागला आणि तेव्हां-पासून मीं तें पुनः वापरलें नाहीं. आंबवणाशिवाय ब्रेड चांगली व्हायची नाहीं, तें वापरायला चुकूं नकोस, असें सुगरिणींनीं मला कळकळीनें सांगितलें आणि बुड्ढ्या खोडांनीं हा असल्या विक्षिप्तपणानें फार दिवस कांहीं जगत नाहीं असें भाकित करून टाकलें. पण एक वर्षभर तें न वापरतां हि मी अजून या च जगांत सुखानें कालक्रमणा करीत आहें. यामुळें भरलेली बाटली खिशांत बागवायची आपत्ति टळली. ती बाटली केव्हां केव्हां खिशांतून बाहेर येऊन त्यांतलें यीस्ट अंगा-वर सांडून माझी चांगली फजिती होई ती वांचली.

इतर प्राण्यांपेक्षां माणसाची शरीररचना अधिक चिवट आहे. ती सर्व तऱ्हेच्या हवेला आणि परिस्थितीला जुळवून घेते. सोडा, मीठ, अल्कली, ॲसिड हीं मी माझ्या ब्रेडमधें घालीत नसें. ही अगदीं जीवनाचा आधार समजली जाणारी ब्रेड देखील मी नेहमीं खात होतों असें नाहीं. एकदां तर खिशांत पैसे नव्हते म्हणून महिनाभर ती माझ्या दृष्टीस पडली नव्हती च.

अमेरिका म्हणजे राय आणि इंडियन मील पिकवणारा देश. तेथें प्रत्येकाला आपल्या ब्रेडपुरतें धान्य सहज पिकवतां येईल. आणि मग त्याला परदेशांतल्या चढउतार होणाऱ्या बाजारभावावर अवलंबून रहावें लागणार नाहीं. पण आपण इतके परावलंबी बनलों आहों कीं आपल्या या गांवांत ताजी गोड ब्रेड दुकानामधें कधीं च मिळत नाहीं. आणि होमिनी आणि कणसें हीं कदान्न समजून कोणी वापरीत नाहीं. शेतकरी आपण पिकविलेलें धान्य गुरांढोरांना, डुकरांना खायला घालतो आणि

भारी किंमत देऊन दुकानांतून आटा विकत घेतो. आटा शरीराला अधिक हितकारक आहे असें नाहीं. मला असें दिसून आलें कीं मला लागणारे मण दोन मण राय व इंडियन कॉर्न मी सहज पिकवूं शकेन. राय वाटेल तसल्या नापीक जमिनींत पिकतो आणि इंडियन कॉर्नला हि कांहीं विशेष चांगली जमीन लागते असें नाहीं. हातजात्यावर दळून पीठ केलें कीं तांदूळ अथवा पोर्कची जरूरी नाहीं. तोंडीं लावायला कांहीं गोड पदार्थ पाहिजे असेल तर तांबडा भोपळा किंवा बीट यापासून काकवी किंवा रायतें सहज बनवितां येतें. शेवटीं राहिलें मीठ. तें आणायला समुद्रावर चक्कर मारायचा सुयोग येई आणि तें मुळीं वापरलें च नाहीं म्हणून कांहीं बिघडणार नाहीं. उलट पाणी कमी प्यालें तरी चालेल. रेड इंडियन्स कधीं मीठ वापरीत नाहींत. त्यांच्यामागें ही ब्याद कधीं च लागली नाहीं.

या प्रकारें माझे खाद्यपदार्थ मिळवायला मला बाजाराची किंवा देवघेवीची जरूरी राहिली नाहीं. कित्येक अश्रद्ध लोक मला विचारतात, 'तुम्ही नुसत्या वनस्पत्याहारावर राहूं शकतां काय?' मुळावर च घाव घालायचा म्हणजे मी त्यांना उत्तर देतों कीं 'वनस्पतीवर च कां? दगड खाऊन हि मी राहूं शकेन.' हें माझें उत्तर जर त्यांना समजलें नाहीं तर माझें कांहीं च म्हणणें त्यांना समजण्यासारखें नाहीं. एक माणूस मक्याचीं कच्चीं कणसें नुसतीं दांतांनीं खाऊन पंधरा दिवस राहिला होता. असले प्रयोग कोणीं केले तर तें मला आवडतें. खारोटीनें हा प्रयोग केला व ती यशस्वी हि झाली. मानवजातीला असल्या प्रयोगांची आवश्यकता आहे. पिठाच्या गिरण्यांचे शेअरमध्यें ज्यांनीं पैसे गुंतवले आहेत किंवा ज्यांचे दांत पडून ज्यांना चावायला येत नाहीं असल्या बुढ्या बाया मात्र या प्रयोगांनीं घाबरून जायच्या!

## १४ टेबल-खुर्च्यांची अडगळ

खाट, टेबल, डेस्क, तीन खुर्च्या, तीन इंच व्यासाचा एक आरसा, चिमटा, किटली, तवा, पळी, हात धुण्याचें भांडें, दोन सुऱ्या, कांटे, तीन थाळ्या, एक कप, एक चमचा, तेलाचें भांडें, काकवीची बरणी आणि एक कंदील, एवढें माझें फर्निचर होतें. यांतलें बरेंचसें मीं बनवलें. उरलेलें कांहीं मोबदला देऊन घेतलें. यापेक्षां जास्त वस्तूंची मला आवश्यकता भासली नाहीं. परमेश्वराची कृपा च कीं फर्निचर कारखान्याची मला जरूरी नाहीं. फर्निचर म्हणजे माणसाच्या कमरेच्या पट्ट्याला अडकवलेले सांपळे च होत. आणि ज्या रस्त्यानें आपल्याला जायचें आहे तो रस्ता खडबडीत असला तरी हा सांपळा बरोबर घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कोल्हा शहाणा म्हणून सांपळ्यांत शेपटी अडकली तेव्हां त्यानें शेपटी तुटूं दिली. तो सांपळा शेपटीबरोबर मिरवीत बसला नाहीं. उंदीर हि एक पाय सांपळ्यांत अडकला तर पाय कुरतुडून टाकून मोकळा होतो. पण या फर्निचरच्या सांपळ्यांत अडकल्यामुळें माणसाच्या अंगचा लवचिकपणा नाहींसा झाला आहे यांत आश्चर्य कसलें ? माणूस किती वेळां तरी यांतून सुटण्याचा निश्चय करितो पण त्याला कांहीं तें शक्य होत नाहीं. जणू कांहीं त्याला या कचऱ्याच्या खटाऱ्याला जुंपून च टाकलें आहे. आणि हा खटारा तो आपल्या शक्तीप्रमाणें कसाबसा ओढीत च असतो. एखादा टाकठीक दिसणारा माणूस आपल्या फर्निचरचा विमा उतरला आहे कीं नाहीं याची चौकशी करूं लागतो तेव्हां मला त्याची कींव येते. कुठें तरी जायचें झालें कीं फर्निचरचें काय करायचें ही बिचाऱ्याला चिंता. इंग्लंडमध्यें घरोघर इतकें फर्निचर असतें कीं मोकळेपणानें वावरायला हि जागा राहत नाहीं. एखादा म्हातारा माणूस खूपसें 'लगेज' सामान घेऊन प्रवासाला चाललेल्या माणसासारखें इंग्लंड

मला दिसतें. हें सामान नीटपणें कसें ठेवलें जाईल या काळजीखालीं त्याचा पिट्टा पडतो. पुष्कळ दिवस एके ठिकाणीं ऐषारामांत गेल्यामुळें त्याच्या घरीं हा सामानाचा कचरा हळूं हळूं इतका वाढला आहे कीं त्याला स्वत:ला च रहायला जागा उरली नाहीं, तरी तो कचरा जाळायचा त्याला कांहीं धीर होत नाहीं. परदेशांतून अमेरिकेंत स्थायिक होण्याकरितां आलेले प्रवासी लोक बरोबर आणलेल्या ओझ्याखालीं वांकून गेलेले पाहिले म्हणजे मला त्यांची कींव येते. त्याची सारी जिनगी एवढी च काय ती म्हणून नव्हे, तर एवढा मोठा बोजा त्याला कशाला पाहिजे म्हणून. आपला खोडा बरोबर वाहणें जर आवश्यक च असेल तर तो शक्य तितका हलका असणें बरें नाहीं का? पण सांपळ्यांत पाय अडकूं न देणें हें च सर्वांत शहाणपणाचें आहे.

माझ्या खिडक्यांना पडदे लावण्याची जरूरी नव्हती हें सांगायला नको च. त्या खिडक्यांतून आंत कोण डोकावून बघणार म्हणून ते लावायचे? चंद्र सूर्याचा प्रकाश काय तो आंत येणार. त्यानें तर यावें च ही माझी इच्छा. चांदण्यानें दूध नासण्याची किंवा मांस कुजून जाण्याची भीति नव्हती कीं उन्हानें फर्निचरचें पॉलिश बिघडण्याचें किंवा गालीच्याचा रंग विटून जाण्यानें भय नव्हतें. उन्हामुळें घरांत फार उकडूं लागलें तर बाहेर झाडाच्या शीतल छायेखालीं मी जाऊन बसत असें. म्हणून फर्निचरच्या यादींत पडद्यांची भर मीं घातली नाहीं. एकदां माझ्या ओळखीच्या एका बाईनें मला एक काथ्याचें पायपुसणें देऊं केलें. पण तें ठेवायला माझ्या घरांत जागा नव्हती, किंवा बाहेर न्या, झटका, पुन्हां आंत आणून पसरा, असला उपद्व्याप करायला मला वेळ हि नव्हता. म्हणून मीं तें नाकारलें. बरा-

बाहेरच्या गवतावर पाय पुसून माझें काम भागत होतें. चिखल लागल्यावर तो धूत बसण्यापेक्षां तो लागूं न देणें च चांगलें. तसें पाप करून त्याचें प्रायश्चित्त घेत बसण्यापेक्षां प्रथमपासून च त्यापासून दूर राहणें बरें.

कांहीं रानटी लोकांत दरवर्षी जुन्या निरुपयोगी जिन्नसांची होळी करण्याची चाल आहे. तिचें अनुकरण आपण हि केलें तर किती चांगलें होईल. 'मुक्कास' जातीच्या इंडियन लोकांमध्यें 'बस्क' म्हणजे 'नव्या फळांचा दिवस' म्हणून एक सण आहे. त्याचें बर्टराम यानें पुढें दिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे: "एखादें गांव हा सण साजरा करतें तेव्हां तेथील लोक नवे कपडे, भांडीं, फर्निचर, धान्य वगैरेंची प्रथम तरतूद करतात. मग जुने कपडे व इतर त्याज्य वस्तू जमा करतात. घरें, रस्ते, चौक झाडून स्वच्छ करतात. हे जुने कपडे, हा जुना कचरा, जुनें धान्य व साहित्य एके ठिकाणीं गोळा करून त्याला आग लावून दिली जाते. नंतर सर्वजण शौचाचें औषध घेतात व तीन दिवस कडकडीत उपास करतात; मग ती होळी विझविली जाते. या तीन दिवसांत कसल्या हि, कोणत्या हि इंद्रियवासना वर्ज्य असतात. सर्व आरोपितांना अपराधांची माफी पुकारण्यांत येते. गुन्हेगारांना हि या शुद्धीकरणानंतर गांवांत राहण्यास मुभा मिळते. चौथ्या दिवशीं मुख्य गुरु गांवांतल्या प्रमुख चौकांत लाकडावर लाकूड घासून अग्नि निर्माण करतो; मग त्यांतून सर्व घरांना हा नवा पवित्र अग्नि पुरविण्यांत येतो. नंतर नवीन धान्य, फळें यांची मेजवानी करून तीन दिवस नवीन उल्हासानें नाचरंग होतो. त्यानंतरचे चार दिवस शेजारच्या दुसऱ्या गांवच्या लोकांनीं हि याप्रमाणें सण साजरा केलेला असतो. त्यांच्या प्रेमानें गांठीभेटी घेण्यास जातात."

मेक्सिकोंतले लोक हि अशा च तऱ्हेचा शुद्धीकरणविधि दर

बावन्न वर्षांनीं करतात. एवढ्या वेळांत प्रलय होऊन जगाचा अंत होतो अशी त्यांची समजूत आहे.

## १५ पांच वर्षांच्या अनुभवाचें फळ

पांच वर्षांपेक्षां अधिक काळ याप्रमाणें केवळ माझ्या स्वतःच्या कष्टानें माझी उपजीविका केली. यावरून मला असें आढळून आलें कीं वर्षांतून सुमारें सहा आठवडे काम केलें कीं माझ्या जीवनाचा खर्च भागून जाई व बाकीचा सर्व वेळ मला अभ्यासाला मोकळा राही. बौद्धिक उद्योग हि कांहीं केले. प्रथम शिक्षकाचा धंदा करून पाहिला. त्यांत अर्थात् साध्या मजुरीपेक्षां प्राप्ति जास्त होती. पण खर्च प्राप्तीहून जास्त वाढला कारण मग इतरांच्यासारखें राहिलें पाहिजे, कपडे केले पाहिजेत, त्यांच्यासारखे च विचार आणि भावना हि अंगीं बाणवून घेतल्या पाहिजेत. त्यांतून कांहीं लोकहित केल्याचें समाधान मिळालें असतें तर चाललें असतें; पण पोटार्थी भाडोत्री माणूस लोककल्याणार्थ तें काय करणार ? म्हणून मीं तो धंदा सोडून दिला. व्यापार करून पाहिला; पण जम बसायला च दहा बारा वर्षें लागायचीं व तोंपर्यंत त्या मार्गानें नरकाची वाट हि बरीच चालून गेलेली असायची. लोकांच्या दृष्टीनें माझा धंदा चांगला चालला होता; पण त्यांतून सुटका कशी करून घ्यावी याची मला चिंता लागली होती. व्यापार च करायचा तर जंगलांत जाऊन हकलबेरी म्हणजे रानबोरें वेंचायचें काम हातीं घ्यावें असें माझ्या मनांत येई. या धंद्याला भांडवल नको. व्यापारांतलें खोटेंनाटें नको आणि मनाला कसली टोंचणी नको. फायदा कमी असला तरी मला पुरण्यासारखा होता. कारण माझ्या अंगांत एक मोठें कौशल्य आहे. तें म्हणजे माझें अगदीं थोडक्यांत भागतें. माझ्या गरजा अगदीं अल्प. डोंगरांतून

स्वच्छंदपणें हिंडावें; सांपडतील तीं बोरें वेंचावीं आणि कसली घासाघीस न करतां मागतील त्या किंमतीला देऊन टाकावीं. केव्हां जंगली औषधें किंवा नेहमीं हिरवीं राहणारीं झाडें गोळा करून ज्यांना पाहिजे असतील त्या लोकांना गाड्या भरभरून पोचवावीं असें हि केव्हां मला स्वप्न पडत असे; पण त्यानंतर मला असें आढळून आलें कीं व्यापाराचा हात लागला कीं कसल्या हि चांगल्या गोष्टीचें वाटोळें झाल्याशिवाय राहत नाहीं. स्वर्गप्राप्तीकरितां धर्माचा व्यापार सुरू होतो; मग ऐहिक व्यापारांतले सगळे दोष त्यांत हि शिरतात च.

इतर माणसांना ज्या गोष्टी लागतात त्यांपेक्षां वेगळ्या वस्तूंची मला गरज भासते. त्यांतली पहिली गरज स्वातंत्र्य. कोणाचें मिंधेपण नको कीं कोणावर अवलंबून रहायला नको. धोपटमार्ग सोडल्यामुळें श्रम अधिक पडले तर समाधान हि तितकें अधिक मिळतें. त्यामुळें श्रीमंती गालिचे, नाजुक फर्निचर, सुंदर भांडीं, टुमदार घर, असलें ऐश्वर्य संपादन करण्यांत मीं माझा वेळ दवडला नाहीं. ज्या कोणाला हें मिळविण्यांत सुख वाटतें आणि मिळाल्यानंतर या वस्तू कशा वापरायच्या हें ज्यांना माहीत आहे त्यांच्यासाठीं हा उद्योग मीं राखून ठेवला आहे. कांहीं लोक मोठे उद्योगी असतात. कांहींना श्रमांची आवड म्हणून किंवा रिकाम्या डोक्यांत सैतानाचा वास होऊं नये म्हणून ते आपल्या मागें कांहीं काम लावून घेतात. अशा लोकांना तूर्त मला कांहीं सांगायचें नाहीं. पण ज्यांना कांहीं काम करून हि वेळ रहातो व त्याचें काय करावें अशी चिंता लागलेली असते, त्यांना मी सांगेन कीं फुरसतीच्या वेळीं हि दुप्पट काम करा पण गुलाम राहूं नका. माझ्यापुरतें म्हणायचें झालें तर रोजावर काम करणाऱ्या मजुरांचा धंदा मला आवडतो. त्यांत इतर धंद्यांसारखें बांधलेंपण नाहीं. वर्षांतून तीस ते चाळीस दिवस रोजगार केला कीं

पुरे होतें. संध्याकाळ झाली कीं तो मोकळा. नंतरचा वेळ त्यानें खुशाल मन मानेल त्या आवडीच्या उद्योगांत घालवावा. त्याला कामाला लावणाऱ्या मालकाच्या मनांत मात्र चोवीस तास धंद्याचे च विचार. महिन्यामहिन्यांतून किंवा वर्षावर्षांतून हि त्याला कधीं सुटका नाहीं.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे या पृथ्वीच्या पाठीवर स्वतःच्या पोटापुरतें मिळविणें मुळीं च कठीण नाहीं. तो तर एक पोरखेळ आहे असें मला वाटत असे. हें माझें मत अनुभवानें दृढ झालें. अर्थात् आपण साधेपणानें आणि शहाणपणानें वागलों तर च हें शक्य आहे. पोटापुरतें मिळवायला अगदीं निढळाचा घाम च काढायची जरूरी आहे असें नाहीं. माझ्यापेक्षां त्याला चटकन् घाम फुटत असेल तर गोष्ट वेगळी.

## १६ अनुकरण नको नि सहकार्य हि नको !

माझा एक तरुण मित्र आहे. घरचा चांगला सधन आहे. वडिलार्जित जमीन हि बरी च आहे. तो मला म्हणाला, ' मला साधेल तर तुमच्यासारखें राहावें असें माझ्या हि मनांत येतें. ' पण माझ्या जीवन-मार्गाचें दुसऱ्या कोणीं अंध अनुकरण करावें हें मला कधीं च आवडणार नाहीं. कारण मी कसा वागतों हें तो शिकूं लागेपर्यंत मीं कांहीं तरी नवा च मार्ग काढलेला असायचा ! जगांत जितके विविध लोक आहेत तितके विविध मार्ग हि असणें चांगलें असें मला वाटतें. प्रत्येकानें आपला मार्ग स्वतंत्रपणें शोधून त्या मार्गानें जावें. वाडवडिलांचा वा शेजारीपाजारी ज्या मार्गानें जातात तो धोपट मार्ग त्याला उपयोगाचा नाहीं. निर्बुद्धपणें तो आचरल्यामुळें तो अधःपतनाची—नरकाची च—वाट दाखवितो. स्वतःच्या इच्छेप्रमाणें कोणी इंजिनिअर, शेतकरी वा खलाशी कांहीं हि व्हावें. त्याच्या मार्गांत कोणीं अडथळा आणूं नये म्हणजे

झालें. उत्तर ध्रुवावर लक्ष ठेवून खलाशी त्याप्रमाणें दिशा ठरवतो, त्याप्रमाणें आपलें जीवनाचें कांहीं निश्चित कालांत ध्येय ठरवून माणसानें चालूं लागावें. कांहीं निश्चित कालांत तें ध्येय जरी गांठलें गेलें नाहीं तरी तो भलतीकडे वाहवत जाणार नाहीं. एकाच्या धाडसी प्रयत्नानें हजारोंना स्फूर्ति मिळेल. मोठें घर लहान घराच्या प्रमाणांत महाग असत नाहीं. कारण एका छपराखालीं दोन मजले होऊं शकतात आणि एका भिंतीनें कित्येक खोल्या वेगळ्या करितां येतात. तरी पण स्वतंत्र सुटें घर मला अधिक आवडतें. आणि आपलें घर स्वतंत्रपणें बांधणें केव्हां हि फायद्याचें च; कारण सहकार्यानें बांधणें म्हणजे उभयतांना हि किती फायद्याचें आहे हें दुसऱ्याला पटवीत बसलें पाहिजे. आणि स्वस्त करायचें तर दोघांमधली भिंत जितकी अरुंद असेल तितकें चांगलें. पण एखादे वेळीं शेजारी च वाईट भेटायचा आणि भिंतीची आपली बाजू नीट दुरुस्त राखायचा नाहीं. शेजाऱ्याकडून सहकार्य मिळेल तें एकतर्फी आणि केवळ दिखाऊ असायचें ! खरें सहकार्य आंतरिक असणार, त्याचा गाजावाजा वा जाहिरात होणार नाहीं. मनुष्य सरळ असला तर तो सर्वांशीं सरळपणें च वागेल. आणि संशयी असला तर तो सज्जन माणसाशीं हि संशयानें च वागेल. सारें जग सध्यां असें चाललें आहे. उच्च वा सामान्य कोणत्या हि अर्थानें पाहिलें तरी सहकार्य याचा अर्थ एकत्र जीवनयात्रा चालविणें. पण ज्या दोघांच्या स्वभावांत फरक, संपत्तींत फरक, सवयी वेगळ्या, वागणूक वेगळी, अशा दोघांमधें किती वेळ सहकार्य होईल ? माझ्या ऐकिवांत दोघां तरुणांची एक गोष्ट आहे. त्या दोघांनीं जगभर एकत्र मिळून प्रवास करायचें ठरविलें. एकाजवळ पैसा नव्हता. त्यानें जातां जातां मोलमजुरी करून, शेती करून वा खलाशाची नोकरी पत्करून प्रवासापुरते पैसे मिळवीत प्रवास करावयाचा आणि दुसऱ्या-

जवळ भरपूर पैसा होता त्यानें कांहीं काम न करितां फक्त आपल्या खिशांत कोठें हि वटवितां येईल असें चेकबुक ठेवावयाचें. हें उघड दिसण्यासारखें आहे कीं ते दोघे फार वेळ सोबती राहूं शकले नाहींत किंवा सहकार्य करूं शकले नाहींत. कारण सह-कार्य करायला एकजण मुळीं कांहीं कार्य च करीत नव्हता, मग दोघांचें जुळायचें कसें ? मौजेचा हि कांहीं बरावाईट प्रसंग येतां च त्यांची संगत सुटेल. याचा अर्थ एवढा च कीं एकटें जायचें ठरविलें कीं माणूस मनांत येतां च ताबडतोब निघूं शकेल. कोणाबरोबर जायचें म्हटलें कीं दुसऱ्याची प्रवासाची सिद्धता, तयारी होईपर्यंत थांबलें पाहिजे. तोंपर्यंत याची कांहीं अडचण उपस्थित व्हायची. असें होत होत दोघांना हि निघायला उशीर व्हायचा !

## १७ परोपकारासाठीं दुःखनिर्मिति !

हा माझा जीवनक्रम केवळ स्वार्थी आहे असें कांहींजण म्हणतात. मला हा आरोप मान्य केला पाहिजे. परोपकाराच्या महत्कार्याचा आनंद मीं चाखलेला नाहीं. कर्तव्य म्हणून कांहीं त्याग मीं केला आहे; पण कित्येक वेळां त्या आनंदाचा हि मीं त्याग केला आहे. गांवांतल्या कांहीं गरीब कुटुंबांचा सांभाळ मीं करावा म्हणून कित्येकांनीं मला भीड घालण्यांत आपलें सारें कौशल्य खर्च केलें. मला दुसरा कांहीं उद्योग नसता व मी पूर्ण रिकामा असतों, तर असला कांहीं खेळ करायचा मीं प्रयत्न केला असता. कारण रिकाम्या डोक्यांत सैतान घर करतो. परंतु या बाबतींत कांहीं करायचा जेव्हां मीं विचार केला आणि मी जितक्या चैनींत, आरामांत राहतों तितक्या च आरामांत कांहीं गरीब माणसांचा सांभाळ करून त्यांच्यावर उप-कारांचें ओझें लादायचें ठरविलें— एवढेंच नाहीं तर तशी माझी तयारी

आहे असें सांगण्याचें धाडस हि केलें; तेव्हां प्रत्येकानें मीं पुढें केलेला हात झिडकारून दरिद्री राहण्याचें च अधिक पसंत केलें. शहरांतले पुष्कळ स्त्री-पुरुष आपल्या सोबत्यांचें अनेक मार्गांनीं हित साधण्यांत मग्न आहेत, तेव्हां सामान्य कमी दर्जाच्या कामाकरितां माझ्यासारख्या एखाद्याला मोकळा ठेवणें बरें असें मला वाटतें. परोपकार करावयाच्या कामाला हि इतर कांहीं कुशल कामासारखी विशेष योग्यता लागते च. सत्कार्य करण्याच्या धंद्यांत फार च अधिक लोक पडलेले आहेत. आतां नवीन माणसाला त्यांत वाव नाहीं! शिवाय तो करण्याचा मीं प्रयत्न करून पाहिला आहे. पण तो माझ्या पिंडाला जमण्यासारखा नाहीं, असें मला आढळून आलें. यांत कोणाला आश्चर्य वाटत असेल तर वाटो. कांहींना वाटतें कीं मीं परोपकार केला नाहीं तर जगाचें फार वाकडें होईल; तरी हि पण स्वेच्छेनें स्वीकारलेला माझ्या हातांतला उद्योग मी सोडणार नाहीं. खरें म्हटलें तर अशा च पण अपार स्थित-प्रज्ञतेमुळेंच जगाची धारणा होत आहे. कोणाचा हि बुद्धिभेद मी करूं इच्छीत नाहीं. हें काम मी करीत नाहीं म्हणून दुसऱ्यानें हि तें करूं नये असें माझें म्हणणें नाहीं; उलट मी त्याला म्हणेन कीं तूं मनापासून जें काम अंगिकारिलें आहेस त्याविरुद्ध सारें जग असलें तरी सोडून देऊं नकोस. कारण लोक काय, कशाला हि नावें ठेवतात च. लोक म्हणतात, 'परोपकार करा. लोकांवर दया करा.' मी म्हणेन, 'आधीं स्वतःवर दया करून चांगलें होण्याचा—सज्जन होण्याचा—प्रयत्न करा; मग त्यामुळें दुसऱ्याचें हि कांहीं बरें होणार असेल तर होवो!'

सूर्यनारायण सकाळीं उगवतो तेव्हां त्याचे कोवळे किरण गुलाबी थंडींत किती आल्हाददायी असतात! त्यांची ऊब हळू हळू वाढत जाऊन दुपारीं त्याचें तेज इतकें प्रखर होतें कीं आपल्याला त्याच्याकडे पाहणें हि अशक्य होतें. नंतर ती प्रखरता क्रमाक्रमानें संध्याकाळ-

पर्यंत कमी होत जाते. हा त्याचा नियत मार्ग तो कधीं हि सोडीत नाहीं. त्याची अशी अखंड लोकसेवा चालू असते. सूर्य याप्रमाणें वागला नाहीं आणि खिडक्यांमधून डोकावून अजून आळशी, मूर्ख लोक निजले आहेत त्यांना जागें करण्याकरितां शोधूं लागला; कोठला अंधार आपल्याला दूर करावयाचा आहे त्याचा तपास करूं लागला; असा लोकांच्यावर उपकार करण्याचा हेतु धरून तो जर इकडे तिकडे हिंडूं लागला तर काय अवस्था होईल ?

ग्रीक पुराणांत एक गोष्ट आहे. फेटन ( Phaeton ) नांवाचा एक राजा होता. आपला जन्म दैवी आहे हें सिद्ध करण्याकरितां त्यानें मोठा दानधर्म केला. त्या पुण्यानें त्याला एक दिवसापुरता सूर्याचा रथ मिळाला. तेव्हां त्याच्या दैवी जन्माबद्दल जे लोक शंका घेत होते त्यांना आपला बडेजाव दाखविण्याकरितां सूर्याचा नियत मार्ग सोडून तो मनमानेल तसा रथ हाकूं लागला. त्यामुळें कोण हाहा:कार उडून गेला ! स्वर्गांतलीं खालच्या बाजूचीं कित्येक घरें जळून भस्म होऊन गेलीं. पृथ्वीचा पृष्ठभाग जळून गेला. सर्व तळीं, पाण्याचे झरे आटून जाऊन साहाराचें मैदान निर्माण झालें. असे भयंकर उत्पात झालेले पाहून परमेश्वरानें त्याचा रथ काढून घेऊन त्याला धाडकन खालीं उलटा ढकलून दिला.

साधुपणा कलंकित झाला तर त्याला इतकी भयंकर दुर्गंधी सुटते कीं त्यासारखी दुसरी नाहीं. मला जर समजलें कीं कोणी माणूस माझें भलें करण्याच्या उद्देशानें मजकडे येणार आहे तर मी जीव बचावयाला पळून जाईन. ‘ सिमून ’ नांवाचीं आफ्रिकेंत रेताड मैदानें आहेत. त्यांत सुटणाऱ्या कोरड्या होरपळणाऱ्या वाऱ्यानें उसळणाऱ्या धुळीनें नाक, तोंड, कान भरून गुदमरायला होतें. तशी कोणी माझें भलें

करायला आला तर माझी स्थिति होऊन जाईल. छे ! छे ! असें भलें करून घेण्यापेक्षां प्रारब्धीं आलेलें संकट माझें मी च स्वाभाविक रीतीनें सोशीन. मी उपाशी असलों तर मला खायला देईल, थंडीनें कुडकुडत असलों तर ऊबदार कपडा देईल, खड्ड्यांत पडलों तर हात देऊन वर काढील असा माणूस कांहीं विलक्षण मोठा आहे असें मला वाटत नाहीं. इतकें सगळें करणारा कुत्रा मी तुम्हांला न्यू फाऊंडलंडमधून आणून देईन. परोपकार-दयाबुद्धि याचें जीवनांत थोडें फार स्थान आहे हें खरें. पण हे भौतिक परोपकार आध्यात्मिक गरजेला पुरेसे नाहींत.

## १८ परोपकारांतील खांचखळगे

गरजवंताला मदत करतांना त्याला खरोखर कशाची जरूरी आहे याची खात्री करून घेऊन मग च मदत करावी. मग ती मदत केवळ तुमच्या सद्वर्तनानें लाभणाऱ्या उत्तेजनाची असली तरी पुरे. पैसा द्यायचा असला तर नुसता फेकून देऊं नका. तुम्ही स्वत: हि त्याबरोबर खपा. केव्हां केव्हां आपल्या हातून असले परोपकार करण्यांत विचित्र चुका होतात. भिकारी जितका घाणेरडा, लक्तरें नेसलेला आणि बीभत्स असतो तितका तो भुकेला किंवा थंडीवाऱ्यानें कुडकुडलेला असत नाहीं. असल्या घाणरडेपणाची त्याला दुष्ट संवय च जडते. आपत्ति म्हणून तो कांहीं तसा घाणेरडा असत नाहीं. त्याला कांहीं पैसा दिलात तर तो आणखी तसलीं च लक्तरें घेण्यांत खर्च करील. तळ्यांत बर्फ फोडण्याचें काम करणाऱ्या आयरिश कामकऱ्यांचीं भिकार लक्तरें पाहून आणि त्या मानानें अधिक नीटनेटके सभ्य कपडे घातलेले असून हि मला अगदीं कुडकुडण्याइतकी थंडी वाजत होती. त्यामुळें मला त्यांची कींव येई. एके दिवशीं त्यांचेपैकीं एकजण पाय घसरून पाण्यांत पडला. त्या दिवशीं थंडी रोजच्यापेक्षां जास्त च

कडक होती. दुसऱ्यांनीं त्याला बाहेर काढून त्याला माझ्या शेकोटी-जवळ आणला. ओले भिजलेले कपडे काढूं लागले तर एकावर एक तीन पाटलोणी आणि दोन मोजे त्यानें घातले असल्याचें आढळून आलें. ते कपडे घाणेरडे आणि फाटके होते खरे पण त्याच्या अंगावरचे हे कपडे निघायला असें बुडण्याची च जरूरी होती. नाहीं तर किती दिवस निघाले नसते देव जाणे ! हें दृश्य पाहून मात्र मला माझी च कींव आली आणि वाटलें कीं त्याला तयार कपड्यांचें दुकान देण्यापेक्षां आपल्याला च एखादा फ्लॅनेलचा शर्ट करवणें हाच खरा दानधर्म होईल. पाप नाहींसें करण्याकरितां पापवृक्षाच्या शाखांवर कुऱ्हाड चालवूं पाहणारे हजारों असतात. मुळावर च घाव घालणारा एखादा च निघतो. गरिबांचीं—गरजवंतांचीं दुःखें दूर करण्याकरितां जो एकीकडे जिवापाड खपत असतो व त्याकरितां लागेल तितका वेळ व पैसा खर्च करण्यास मागें पुढें पहात नाहीं तो स्वतः च बहुधा आपल्या धंद्यामुळें वा जीवनक्रमामुळें तें दुःख निर्माण करण्यास कारणीभूत असतो. अर्थात् पोटांत झालेल्या रोगाला औषध न देतां नुसते वर वर केलेले उपचार जसे फुकट जातात तसे त्याचे सारे परिश्रम व्यर्थ जातात यांत नवल कसलें ? माणसांना गुलाम बनवून त्यांना मरेमरेतों राबवून अफाट संपत्ति मिळवणारा माणूस त्यांना एक दिवस सुट्टी देतो म्हणून का त्याला उदार, कनवाळू, धार्मिक म्हणायचें ? श्रीमंतांना वाटतें कीं आपण स्वतः काम केलें तर गरिबांना काम कसें मिळेल ? आणि म्हणून आपलीं उष्टींखरकटीं भांडीं घासून घेण्याचें काम कवडीमोलानें त्यांच्याकडून करवून घेऊन आपण त्यांच्यावर केवढा मोठा उपकार केला अशा भ्रमांत मशगुल असतात ! त्यांना मला अशी विनंति करायची आहे कीं एवढें परोपकारांचें ओझें त्यांच्यावर लादूं नका. तें त्यांना झेपण्याजोगें नाहीं. गरिबांवरचा हा भार तुम्ही

स्वतः वाहूं लागलांत तर मात्र तें त्यांच्यावर अनंत उपकार केल्यासारखें होईल. कांहीं लोक आपल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा दानधर्मांत खर्च करितात आणि त्यामुळें आपण किती धार्मिक व किती दयाशील आहों याची बढाई मारतात. पण हें उत्पन्न त्यांच्याजवळ आलें कुठून? चोरीच्या मालापैकीं दहावा भाग परत केला म्हणून उरलेले नऊ भाग ठेवून घेण्याचा हक्क त्यांना कसा प्राप्त होतो? ते नऊ भाग हि देऊन टाकून त्यांनीं मोकळें कां होऊं नये? त्यांच्या दानधर्मामुळें समाजाला फक्त दहावा भाग च परत मिळतो; बाकीचा जो त्यांच्याजवळ राहतो तो त्यांच्या परोपकारबुद्धीमुळें कीं अधिकाऱ्यांच्या ढिलाईमुळें आणि गाफीलपणामुळें?

परोपकार हा च काय तो सद्गुण असा आहे कीं ज्याच्या गुणाची किंमत लोकांना वाजवीपेक्षां जास्त वाटते. खरोखर पाहतां आपल्या स्वार्थामुळें आपण ही किंमत भलती च चढवून ठेवतों. लोक साधुसंतांपेक्षां त्यांच्याकडून कांहीं द्रव्याचा लाभ होण्याचा संभव अशा काका-मामांना च मान देतात. एका धर्मोपदेशकाचें इंग्लंडसंबंधीं झालेलें व्याख्यान ऐकायला गेलों होतों. शेक्सपीअर, बेकन, क्रॉमवेल, मिल्टन, न्यूटन वगैरे बुद्धिमान्, विद्वान् आणि वाङ्मय, विज्ञान व राजकीय विषयांत ज्यांनीं नांव कमविलें त्यांची थोडक्यांत माहिती सांगितली; पण या सर्वांपेक्षां कांहीं ख्रिस्ती धर्मवीरांची त्यानें अफाट स्तुति केली. त्यांच्या धंद्याकरितां तसें करणें जणूं कांहीं भाग च होतें. हे धर्मवीर कोण? पेन, हॉवर्ड आणि मिसेस् फ्राय. या विधानाचें मिथ्यात्व आणि मानभावीपणा कोणाला हि उघड दिसण्यासारखा आहे. या लोकांनीं कोठल्यातरी संस्थेला थोडा दानधर्म केला म्हणून ते का इंग्लंडचे थोर पुरुष झाले?

परोपकाराच्या स्तुतीला मी कमी लेखीत नाहीं. पण ज्यांच्या जीवनामुळें मानवसमाज धन्य झाला त्यांच्या गुणांचें चीज झालें पाहिजे अशी माझी मागणी आहे. थोडा सभ्यपणा व दयाबुद्धि एवढीं च कांहीं मोठेपणाचीं लक्षणें मी मानीत नाहीं. हे गुण म्हणजे झाडाचें खोड आणि पानें यांसारखीं आहेत. हीं पानें वाळलीं म्हणजे त्यांचा काढा करून आजाऱ्याला देतात. हा त्या झाडाचा उपयोग अगदीं च कमी प्रतीचा. आशिक्षित वैदूंच्या च काय तो कामाचा. मला मोहर आणि फळ पाहिजे. माणसाचा मोठेपणा संकुचित आणि क्षणिक असून उपयोगी नाहीं. त्याचा चांगुलपणा सतत भरून ओसंडत असला पाहिजे. पण त्याला स्वतःला मात्र त्याची दाद हि असून उपयोगी नाहीं. परोपकारी माणूस म्हणजे एक दुःखी तरी, नाहीं तर पातकी असतो. तो आपल्याला झालेलें दुःख किंवा हातून घडलेलें पाप दूर करण्याकरितां दानधर्म करितो. या त्यानें टाकून दिलेल्या दुःखाच्या स्मृतीनें भोंवतींचें वातावरण दूषित होतें. पण तो त्याला सहानुभूति हें गोंडस नांव देतो. आपण आपलें धैर्य दुसऱ्याला द्यावें. भ्याडपणा, निराशा देऊं नये. आपलें आरोग्य व समाधान द्यावें. आजार देऊं नये. आणि तो संसर्गानें पसरणार नाहीं याची हि काळजी घ्यावी.

## १९ परोपकाराची उठाठेव केव्हां सुचते ?

मनुष्याचें पोट हें सहानुभूति वाटण्याचें, कळवळा येण्याचें स्थान आहे. अपचनानें तें जेव्हां दुखूं लागतें तेव्हां माणूस बेचैन होतो. त्याला कांहीं सुचत नाहींसें होतें. त्याच्या हातून रोजचीं कामें हि होऊं शकत नाहींत; तेव्हां तो आपल्यास सुधारण्याऐवजीं जग सुधारूं पाहतो. आणि मग त्याला परोपकारबुद्धि सुचते. आणि मग कोणत्या देशांत धर्महीन माणसें आहेत कीं ज्यांना सद्धर्माचा प्रकाश देणें जरूर

आहे ? तो कोण दारुड्या, निर्दय माणूस आहे कीं ज्याला आपण त्या व्यसनापासून मुक्त केलें पाहिजे ? याचा तो शोध करूं लागतो. एस्किमो व पॅटागोनियन लोकांना सुधारूं पाहतो. दाट वस्तीच्या चिनी व हिंदी खेड्यांतील लोकांना औषधोपचार करायला धावतो. अशा कांहीं थोड्या वर्षांच्या परोपकाराच्या परिश्रमानें त्याचा अपचनाचा रोग दूर होतो. दरम्यान तो ज्या देशाचा रहिवासी असतो तो देश त्याच्या या परोपकाराचा उपयोग आपलीं साम्राज्यें वाढविण्यास करून घेतो. युरोपांतल्या परोपकाराचें हें पर्यवसान आहे.

माणूस किती हि धार्मिक असला तरी त्याला स्वतःच्या दुःखानें जेवढा त्रास होतो, तितका त्याला आपले बांधव संकटांत, विपत्तींत सांपडलेले पाहून होत नाहीं. ही स्थिति दुरुस्त झाली च पाहिजे. मनुष्याच्या जीवनांत वसंत ऋतूचा उत्साह अवतरला पाहिजे आणि या दानशूर मित्रांचा सहवास लाभण्याचा प्रसंग कधीं येऊं नये अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे. दानधर्म करण्याची तुमच्यावर पाळी आली च तर उजव्या हातानें काय केलें तें डाव्या हाताला समजूं देऊं नका. कारण ही गोष्ट उघड करण्यासारखी नाहीं च मुळीं.

गुलिस्तान म्हणजे फुलबाग या नांवाचा शिराज गांवच्या सुप्रसिद्ध शेख सादीचा एक ग्रंथ आहे. त्यांतील खालील गोष्ट माझ्या वाचनांत आली. लोकांनीं पंडिताला विचारलें, " ईश्वरानें उंच आणि पुष्कळ सावली देणारे अनेक वृक्ष निर्मिले पण त्यांपैकीं कोणाला ' अझाद ' म्हणत नाहींत. पण सुरूच्या झाडाला सावली नाहीं कीं फळ नाहीं, तरी त्याला ' अझाद ' म्हणतात हें काय गूढ आहे ? " पंडितानें उत्तर केलें, " इतर सर्व झाडें योग्य काळीं आणि नियत ऋतूंतच तेवढीं ताजीं आणि टवटवीत असतात. तो ऋतु बदलला कीं वाळून सुकून जातात.

सुरुचें झाड सर्व काळीं सर्व ऋतूंत टवटवीत असतें. अझाद म्हणजे स्वतंत्र वृत्तीचे लोक सुरुच्या झाडाच्या वर्गांत पडतात. शासनकर्ते धर्मगुरु खलीफ यांचें कुळ लयाला गेलें तरी तैग्रीस नदी बगदाद-जवळ वाहत च राहील. तसे च ते हि शाश्वत आनंदांत तल्लीन राहतील. संपत्तिमान असाल तर खजुराच्या झाडाप्रमाणें उदार व्हा. तसें कांहीं देण्यासारखें नसेल तर सुरुच्या झाडाप्रमाणें अझाद व्हा, स्वतंत्र व्हा."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता. क.
मराठी ग्रंथ सं. ालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35538 वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: 11.12.63
REFBK-0009294